महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक


# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शनिवार, दि. ०७ मार्च २०२६

(समर्थ गांवकरी)

मुंबई- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राचा 7,69,467 कोटींचा 2026–27 आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प विधानसभेत सादर केला. 40,552 कोटींच्या महसूली तूटीचा हा अर्थसंकल्प आहे. ही महसूली तूट 2025-26 मध्ये 37056 कोटी होती. आता तुटीत वाढ झालेली दिसून येत आहे. अर्थसंकल्पात राजकोषीय तूट 1,50,491 कोटी आहे. ही वित्तीय तूट राज्य उत्पन्नाच्या 3 टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यात राज्य सरकारला यश आलं आहे. राज्याच्या एकूण कर्जाच्या आकड्यात वाढ होऊन तो 11,02,654 कोटींवर पोहोचला आहे. मागील वर्षी हा आकडा 9,73,989 कोटी इतका होता. अर्थमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर देवेंद्र फडणवीस यांनी हा अर्थसंकल्प मांडला. अर्थसंकल्प मांडणारे ते पहिले मुख्यमंत्री ठरले आहेत. हा अर्थसंकल्प दिवंगत अर्थमंत्री अजित पवार यांना समर्पित करत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसे स्मारक उभारणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलं. याचबरोबर फडणवीस यांनी विधानसभेत यांनी अनेक महत्त्वपूर्ण घोषणा केल्या आहेत. शेतकऱ्यांसाठी मोठी घोषणा करत, 30 सप्टेंबर 2025 पर्यंत पीककर्ज थकीत असलेल्या, पात्र शेतकऱ्यांचे 2 लाखांपर्यंतचे कर्ज माफ केले जाणार आहे. तसेच नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून 50 हजारांचे अनुदान देण्यात येणार आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेअंतर्गत ही मदत केली जाणार आहे. यासाठी सरकारवर साधारण 35 हजार कोटींचा बोजा सरकारवर येऊ शकतो, असा अंदाज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. कर्जमाफी आणि प्रोत्साहन अनुदान योजनेची प्रभावी अंमलबजावणी तसेच शेतकऱ्यांना कायमस्वरूपी कर्जमुक्त करण्यासाठी बँकिंग यंत्रणा सक्षम करण्यावर सरकार भर देणार आहे. यासंदर्भात समितीच्या शिफारशींनुसार कार्यवाही केली जाणार असल्याची घोषणा करण्यात आली. शेतकऱ्यांना दिवसा मोफत वीज देण्याची व्यवस्था करण्यात येणार असून यंदा 14 हजार मेगावॅट वीज निर्मिती क्षमता वाढवण्याचं उद्दिष्ट असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.



## अर्थसंकल्पातून काय स्वस्त

मधुमेहावरील उपचार, कर्करोगवरील औषधं, क्रीडा साहित्य, वैद्यकीय उपकरणे, सौर पॅनल

## काय महाग झालं?

दारु, सिगारेट, तंबाखूजन्य पदार्थ



# महाराष्ट्राचा अर्थसंकल्प सादर

## महसूल वाढवण्यासाठी पायाभूत सुविधांवर भर

## जुन्या वाहनांवर वाढणार पर्यावरण कर

## दंडाची रक्कम १ लाख रुपयांपर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव

## शेतकऱ्यांसाठी दोन लाखांपर्यंत कर्जमाफी जाहीर

### दादांच्या नावाने पुरस्कार

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली म्हणून राज्य शासन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसे स्मारक उभारणार असून अजित पवार यांच्या नावे गतिमान नागरी सेवा पुरस्कार देणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

**मुंबई :** (समर्थ गांवकरी)

राज्याच्या सर्वांगीण, सर्वसमावेशक आणि दीर्घकालीन विकासाला गती देण्याच्या उद्देशाने सादर करण्यात आलेला 2026-27 वर्षाचा 7.69 लाख कोटींचा अर्थसंकल्प 'विकसित महाराष्ट्र' या ध्येयावर आधारित असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. प्रगतीशील विकास, शाश्वतता, सर्वसमावेशकता आणि सुशासन या चार स्तंभांवर आधारित हा अर्थसंकल्प राज्याच्या आर्थिक, सामाजिक आणि पायाभूत विकासाला नवी दिशा देणारा ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी करीत शेतकऱ्यांना दिलासा देणारा कर्जमाफीचा निर्णय जाहीर केला.

विधानसभेत राज्याचा अर्थसंकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह मंत्रीमंडळ सदस्य, विधानसभा सदस्य उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याची अर्थव्यवस्था पुढील काही वर्षांत एक ट्रिलियन डॉलरच्या टप्प्यावर पोहोचवण्याचे लक्ष्य असल्याचे सांगितले. या उद्दिष्टासाठी पायाभूत सुविधा, उद्योग, शेती, शिक्षण आणि डिजिटल तंत्रज्ञान या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' जाहीर करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत 30 सप्टेंबर 2025 रोजी पीककर्ज थकित असलेल्या पात्र शेतकऱ्यांना 2 लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात येणार आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना 50 हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर लाभ देण्यासोबतच बँकिंग यंत्रणा सक्षम करण्यासाठी, तसेच शेतकऱ्यांना कायमस्वरुपी कर्जमुक्त करण्यासाठी समितीच्या शिफारसींनुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. शेतीमालाला जागतिक बाजारपेठ देण्यासाठी 10 ते 15 पिकांची एकात्मिक मूल्यसाखळी निर्माण करण्यात येईल. जानेवारी 2026 पर्यंत 1 कोटी 31 लाख फार्मर्स आयडी तयार करण्यात आले आहेत. आता त्यात आदिवासी वनपट्टेधारक शेतकरी समाविष्ट करणार असून कृषी समृद्धी योजनेंतर्गत 2026-27 पासून 4 वर्षांत भांडवली गुंतवणूक वाढवणार आहे. तसेच नवीन प्राकृतिक शेती अभियानात 5 लाख हेक्टर क्षेत्र प्राकृतिक शेतीखाली आणण्यात येईल.



### नवीन मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना

राज्य आणि जिल्हा योजनांचे एकत्रिकरण करुन पशुधनात स्वयंपूर्णता, रोजगारनिर्मितीवर भर देण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्षानिमित्त गो-पालक, कुक्कुटपालक व शेळीपालक यांच्यासाठी विशेष कार्यक्रम सुरु करणार असून मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेमध्ये प्रतिवर्षी 1240 कोटी रुपये देण्यात येणार आहे,त्याचा 20,594 मासेमारांना लाभ मिळेल. मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना सुरु राहणार असून यासाठी यंदा सुमारे 20,000 कोटींची तरतूद असून फेब्रुवारी 2026 पर्यंत 32,756 कोटी रुपये दिले आहेत. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना 2.0 मध्ये 16 हजार मे.वॅ. ऊर्जाक्षमता स्थापित करण्याचे उद्दिष्ट असून, यातून 100 टक्के कृषीपंपांना दिवसा वीजपुरवठा तसेच डिसेंबर 2026 पर्यंत 10 हजार मे.वॅ. क्षमता स्थापित होणार आहे. सध्या 3349 मे.वॅ. क्षमता स्थापित आहे.तर मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेत आतापर्यंत 6,63,324 सौर कृषीपंप दिले असून सौर कृषीपंप अंमलबजावणीत महाराष्ट्र प्रथम क्रमांकवर असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. शेती क्षेत्र अधिक आधुनिक आणि तंत्रज्ञानाधारित करण्यासाठी अ‍ॅग्रीस्टॅक, महावेध, क्रॉपसॅप, महाडीबीटी यांसारख्या डिजिटल प्रणालींच्या माध्यमातून एकात्मिक डिजिटल कृषी व्यवस्था उभारली जाणार आहे. राज्यातील चार कृषी विद्यापीठांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित नवोपक्रम केंद्रे सुरू करण्यात येणार असून त्यामुळे शेती उत्पादन खर्चात लक्षणीय घट होण्याची अपेक्षा आहे.

महात्मा ज्योतिबा फुले यांची 200 वी जयंती 11 एप्रिल 2026 यावर्षी आहे.

त्यासाठी एक समिती स्थापन करुन विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात येईल, त्यासाठी निधी देणार असून महात्मा फुले यांचे जन्मगाव मौजे कटगुण, जिल्हा सातारा येथे भव्य स्मारक उभारणार आहे. तसेच ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव नायगाव, जिल्हा सातारा येथे स्मारक आणि महिला प्रशिक्षण केंद्र आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महाड, चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त पायाभूत सोयीसुविधांचा विकास आराखडा तयार करणार आहे. त्याचप्रमाणे संत गाडगेबाबा यांच्या 150 व्या जयंतीवर्षानिमित्त त्यांचे जन्मस्थळ, कर्मभूमी, अंतिम श्रद्धास्थान यांना एकत्रित करुन संत गाडगेबाबा तीर्थक्षेत्र सर्किट विकसित करण्यात येणार आहे. राज्यस्तरीय अभियाने एकत्र करुन संत गाडगेबाबा ग्राम समृद्धी अभियान राबविण्यात येणार आहे. 75 गावांत 'एआय'च्या सहाय्याने नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी पथदर्शी प्रकल्प राबविणार असून महात्मा फुले, संत गाडगेबाबा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिंचे विशेष वर्ष म्हणून 2026-27 हे 'सामाजिक समता आणि समरसता वर्ष' म्हणून साजरे करणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. जगदगुरु तुकाराम महाराजांचे देहू येथील घर आणि जन्मस्थानाचे जतन, संवर्धनासाठी आराखडा तयार करण्यात येणार आहे. नवरगाव, रामटेक येथे राज्यातील तिसरी चित्रनगरी विकसित करण्यात येणार आहे. नव्यापिढीला महाकवी कालिदास यांच्या साहित्याची ओळख व्हावी, त्यांचे जीवनचरित्र नव्या पिढ्यांना कळण्यासाठी चित्रपट निर्मिती करणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. रामटेक विकास आराखडा टप्पा-2 ची कामे करणार असून पंढरपूर मंदिर विकास आराखड्यातील पुढील कामे हाती घेणार असून 5 ज्योतिर्लिंग विकासाची कामे सुरु असून महानुभाव पंथीय विविध धार्मिक स्थळांच्या ठिकाणी सुविधांसाठी निधी देणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. परदेशी नोकऱ्यांसाठी आवश्यक भाषा, कौशल्य प्रशिक्षण, आर्थिक मार्गदर्शन यासाठी 'महिमा' संस्थेतून मार्गदर्शन करण्यात येईल.तसेच समुपदेशन सेवा विस्तार आणि अधिक संघटित व्यवस्थेसाठी 36 नवदिशा केंद्र स्थापन करण्यात येईल.

पुढील 5 वर्षांत 1.25 लाख उद्योजक घडवणार, 50 हजार स्टार्टअपला बळ देणार असून मुख्यमंत्री उद्योजकता महाफंडमधून स्टार्टअप्सना थेट आर्थिक मदत देण्यात येणार असून , सर्वोत्तम 50 स्टार्टअप्सना नाविन्यपूर्ण प्रकल्प शासनात राबविण्यासाठी 25 लाखांपर्यंतच्या शासकीय कामाचे थेट वर्कऑर्डर्स मिळतील. अ‍ॅथलेटिक्स, बॅडमिंटन, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग, हॉकी, कुस्ती, आर्चरी, शूटिंग, रोईंग, सेलिंग, लॉनटेनिस, टेबल टेनिस या 12 खेळांचे राज्य स्तरावर 8 हायपरफॉर्मन्स सेंटर्स सुरु असून आता आणखी 4 केंद्र सुरु करणार असून विभागीय स्तरावर 25 क्रीडा उत्कृष्टता केंद्र आणि जिल्हा स्तरावर 96 क्रीडा गुणवत्ता विकास केंद्र सुरु करणार आहोत, यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. सामाजिक न्यायाच्या योजनांसाठी मोठी तरतूद करण्यात आली असून अनुसूचित जातींसाठी 23,150 कोटी रुपये, तर आदिवासी घटकांसाठी 21,723 कोटी रुपये निधी देण्यात आला आहे.

आरोग्य क्षेत्रात नागपूर येथे 'महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य संस्था' स्थापन करण्यात येणार असून ग्रामीण भागातील गंभीर आजारांच्या निदानासाठी 4,500 कोटी रुपयांची योजना राबविण्यात येणार आहे. ओबीसी, धनगर, गोवारी घटकांसाठी भरीव तरतूद केली असून सारथी, बार्टी, आर्टी, टीआरटीआय, महाज्योती, वनार्टी, अमृत, मार्टी या संस्थांसाठी भरीव तरतूद केली आहे. दिव्यांगांसाठी सर्व सुविधा एका ठिकाणी आणण्यासाठी दिव्यांग सहाय्यक संकेतस्थळ, जिल्हा वार्षिक योजनेत 1 टक्के निधी राखीव असेल तसेच तृतीयपंथियांच्या विकासासाठी स्वयंरोजगार, व्यवसायासाठी बीजभांडवल देणार आहे. आकांक्षित जिल्हे आणि तालुके कार्यक्रमाचा विस्तार करणार असून गडचिरोली, नंदूरबार, धाराशिव, वाशीम जिल्ह्यांसोबत आता हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे, परभणी या 6 नवीन जिल्ह्यांचा समावेश करण्यात येईल. या एकूण 10 जिल्ह्यातील 77 तालुके आणि उर्वरित जिल्ह्यातील 100 तालुक्यांचा गतिमान विकास करण्यात येईल.चर्मकला डिझाईन व उत्पादन अद्ययावत केंद्र मुंबईतील वांद्रे येथे स्थापन करणार असून आदिवासी जमातीतील युवांना नाविन्यतेवर आधारित उद्योजक, उद्योग निर्माते घडविण्यासाठी 'भारत इनोव्हेशन, रिसर्च, स्टार्टअप्स फॉर आत्मनिर्भरता-बिरसा' ही योजना सुरु करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

आरोग्य क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी राज्यातील 29 महापालिका, 247 नगरपालिका आणि 147 नगरपंचायतींमध्ये राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली आहे. तसेच सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात उच्च दर्जाचे प्रशिक्षण आणि संशोधनासाठी नागपूर येथे 'महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य संस्था' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही संस्था 'एम्स' आणि 'आयआयएम'च्या धर्तीवर कार्य करणार असून भारतीय सार्वजनिक आरोग्य संस्थेचे सहकार्य मिळणार आहे. ग्रामीण भागात कर्करोग, मधुमेह आणि हृदयविकार यासारख्या आजारांचे निदान आणि उपचार अधिक प्रभावी करण्यासाठी आशियाई विकास बँकेच्या मदतीने 4500 कोटी रुपयांची प्रगती योजना राबविण्यात येणार आहे. राज्यात डिजिटल सार्वजनिक आरोग्य प्रणाली उभारण्यासाठी 'महाराष्ट्र डिजिटल आरोग्य तंत्रज्ञान अभियान' सुरू करण्यात येणार असून रिअल-टाइम डॅशबोर्डद्वारे आरोग्य व्यवस्थेचे प्रभावी नियोजन आणि नियंत्रण केले जाणार आहे.

### नदीजोड प्रकल्पांना प्राधान्य

राज्यातील पाणी व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी मोठ्या नदीजोड प्रकल्पांवर भर देण्यात आला आहे. वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पासाठी 94,968 कोटी रुपये, तर दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदीजोड प्रकल्पासाठी 13,497 कोटी रुपये खर्च करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रकल्पांमुळे सिंचनक्षमता वाढण्यासोबतच पाणीटंचाई असलेल्या भागांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा आहे. याशिवाय कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील पूरनियंत्रणासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने 2,240 कोटी रुपयांचा प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

### शिक्षण आणि स्टार्टअपसाठी नवे धोरणप्राधान्य

युवकांना जागतिक दर्जाचे शिक्षण उपलब्ध व्हावे यासाठी नवी मुंबई येथे 'एज्युसिटी' उभारण्याची योजना राबविण्यात येत आहे. या प्रकल्पात विविध आंतरराष्ट्रीय विद्यापीठे सुरू होणार नवी मुंबईत 6 देशांतील विद्यापीठे याचवर्षी सुरु होणार आहेत. याच धर्तीवर 8 ते 10 शैक्षणिक शहरे विकसित करणार असून भविष्यात राज्यात 8 ते 10 शैक्षणिक शहरे विकसित करण्याचा मानस आहे. स्टार्टअप आणि नवउद्योजकतेला चालना देण्यासाठी पुढील पाच वर्षांत 1.25 लाख उद्योजक तयार करणे आणि 50 हजार स्टार्टअप उभारणे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची ओढ निर्माण करण्यासाठी मुख्यमंत्री विज्ञान वारी योजनेंतर्गत इस्त्रो आणि अमेरिकेतील नासा या जगप्रसिद्ध संस्थांना भेट देण्याची संधी या योजनेतून मिळेल.

### मी सरकारचे आभार मानतो – बच्चू कडू

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना शेतकरी कर्जमाफीची घोषणा केली आहे. 30 सप्टेंबर 2025 पर्यंत पीक कर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांना 2 लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी केली जाणार आहे. यासाठी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्ज माफी योजना जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे आता ज्या शेतकऱ्यांचं दोन लाखांपर्यंतच कर्ज थकीत आहे, त्यांना कर्जमाफी मिळणार आहे. सरकारच्या या घोषणेनंतर प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. ते नेमकं काय म्हणाले ते जाणून घेऊयात. काही महिन्यांपूर्वी बच्चू कडू यांनी शेतकरी कर्जमाफीसाठी आंदोलन केले होते. आज सरकारने कर्जमाफीची घोषणा केल्यानंतर बच्चू कडू म्हणाले की, 'देवा भाऊंनी आज कर्जमाफीची घोषणा केली त्यांचे मी आभार मानतो, पण त्यामध्ये काही त्रुटी आहे. खरं तर पात्र शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी केली पाहिजे होती. दुष्काळात होरपळलेल्या चालू कर्जदारांची कर्जमाफी झाली पाहिजे. नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना किमान दीड लाख रुपये दिले पाहिजे.' पुढे बोलताना बच्चू कडू म्हणाले की, 'आम्ही कर्जमाफीसाठी मुंबईला गेलो तेव्हा आमच्यावर खूप टीका झाली. त्या टीकाकारांना आता उत्तर मिळला आहे, कर्जमाफीची घोषणा सरकारने केली आहे. कर्जमाफी पासून दूर जाणाऱ्या सरकारला कर्जमाफीची घोषणा करायला आम्ही भाग पाडले. 14 किंवा 15 तारखेला राजू शेट्टी, अजित नवले, महादेव जानकर, रविकांत तुपकर यांच्यासह सर्व शेतकरी नेत्यांसोबत बैठक घेणार आणि सरकार समोर कसं जायचं याचा विचार करू.' सरकारच्या शेतकरी कर्जमाफीच्या घोषणेवर बोलताना राजू शेट्टी यांनी म्हटलं की, 'शेतकऱ्यांसाठी केलेली कर्जमाफी ही तकलादू आहे. राज्य सरकारने पुन्हा एकदा शेतकऱ्यांचा विश्वासघात केला. ऑक्टोबर महिन्यात आंदोलनानंतर झालेल्या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांनी पूर्ण कर्जमाफी केली जाईल असं आश्वासन दिलं होतं. बहुतांश शेतकऱ्यांची पीक कर्जे ही साडेतीन ते चार लाख इतकी आहेत. दोन लाखांच्या वरची रक्कम भरल्याशिवाय त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. मेटाकुटीला आलेला शेतकरी दोन लाखांच्या वरची रक्कम कशी भरणार हा प्रश्न आहे. ऑक्टोबर महिन्यामध्ये सरकारने दिलेल्या आश्वासनामुळे जो शेतकरी नियमित कर्ज भरत होता तो देखील आता थकीत झाला आहे. सरकारने केलेली ही कर्जमाफी बँकांसाठी आहे की शेतकऱ्यांसाठी आहे असा प्रश्न पडतो.'

# जिल्हा मराठा हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालयात 'बॉलीवूड स्टार्स'

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा मराठा विद्या प्रसारक हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालयामध्ये सालाबाद प्रमाणे फूड फेस्टिवल चे यावर्षीही उत्साहात आयोजन करण्यात आले. सदर महाविद्यालय अहलियानगर शहर परिसरामध्ये पंचतारांकित खाद्यसंस्कृतीमधील नवोपक्रम या फेस्टिवलच्या माध्यमातून रुजवण्याचे कार्य गेल्या पंचवीस वर्षापासून करत आहे. अहलियानगर शहर व जिल्ह्यातील खाद्य प्रेमींसाठी हा फेस्टिवल म्हणजे एक पर्वणीच असते. फूड फेस्टिवल २०२६ चे उद्घाटन मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या खजिनदार अ‍ॅड.दीपलक्ष्मी म्हसे यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष रामचंद्रजी दरे, सहसचिव मुकेशदादा मुळे, कार्यकारिणी सदस्य दीपक दरे, महाविद्यालयाचे संचालक डॉ. नंदकुमार जगताप, प्राचार्य योगिता सदरे, फेस्टिवलचे समन्वयक प्रा. बाळासाहेब शेंडगे, अंतर्गत गुणवत्ता कक्ष समन्वयक प्रा. गोकुळ सोनावणे व सर्व प्राध्यापक वृंद उपस्थित होते. प्रत्येक वर्षी या फेस्टिवलचे आयोजन हे विविध थीमवर थीमनुसार असते. यावर्षी बॉलिवूड या थीमनुसार ९० च्या दशकातील विविध चित्रपट व सीने तारे यांचे फोटोग्राफ्स, पोस्टर्स व विविध बॅनर्स ने आकर्षक अशी सजावट करण्यात आली होती व पाहुण्यांच्या स्वागतासाठी विद्यार्थ्यांनी विविध तारे तारकांचा पोशाख परिधान केलेला होता. बॉलीवूड मधील झगमगाट करून आकर्षक असे वातावरण निर्माण करण्यात आले होते. छायाचित्रे, पोस्टर्स, कट आउट वापरून छान डेकोरेशन करण्यात आले. पाहुण्यांसाठी रुचकर मेन्यू होता. यामध्ये स्वागत पेय गुप्त किवी मॅजिक मॉकटेल, स्टार्टर्स मध्ये जॉनी चाट कॉर्नर, बॉबीज चीज कॉन, जिद्दी फिश फिंगर, सूप मध्ये हीरो नंबर वन, मेन कोर्स मध्ये बादशहास पनीर टिक्का, व्हेज का अंदाज अपना अपना, फुल और काटे मटन, फिल्मी रोटी, नवाबो का पुलाव, डॉन कि मटण दम बिर्याणी, दिल से ग्रीन सलाड, खूबसूरत फ्रुट सलाड, बाजीगर पापड चाट रंगीला सलाड आणि मिठाई मध्ये ऑरेंज अँड चॉकलेट आशिकी, दिवाना रोल्स, धकधक आईस्क्रीम या व्यंजनांची रेलचेल होती. नगरकरांनी ही सर्व स्वादिष्ट व्यंजने चाखून खूप सकारात्मक प्रतिसाद दिला व अशा प्रकारचे कार्यक्रम महाविद्यालयाने सातत्याने राबविण्यात यावे अशी इच्छा व्यक्त केली. या फेस्टिवलचे आयोजन अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षक शिक्षिका प्राचार्य संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांचे फूड अँड बेवरेज प्रोडक्शन, फुड अँड बेवरेज सर्विस, फ्रंट ऑफिस ऑपरेशन्स, हाउसकीपिंग, मार्केटिंग इत्यादी विभागामध्ये नेमणूक करून त्यांना प्रा. योगिता सदरे, प्रा. बाळासाहेब शेंडगे, प्रा. गोकुळ सोनावणे, प्रा. सागर माळवदे, प्रा. वाहिद मणियार, प्रा. रचना खटावकर यांनी मार्गदर्शन केले.



# भांडगावच्या भक्तामर कलश तीर्थावर भव्य पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव

## दिगंबर जैन राष्ट्रसंतांचा दुर्मिळ समागम




**पुणे : (समर्थ गांवकरी)**

दौंड तालुक्यातील भांडगाव (यवत) येथील भक्तामर कलश तीर्थ येथे ११ ते १५ मार्च २०२६ या कालावधीत '१००८ आदिजिन पंचमेरू मानस्तंभ पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सवा'चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. भक्तामर कलश तीर्थ परिसरात कलशाकार मंदिर, नवग्रह रत्नमय प्रतिमा, नद्यावर्तात १०८ आदिनाथ जिन प्रतिमा, भक्तामर ध्यान केंद्र व हीलिंग सेंटर, भक्तामर शास्त्र मानस्तंभ, महाद्वार, नवधा भक्ति भोजनालय, संत निवास व यात्रेकरू विश्रामालय, आरोग्य धाम (अस्पताल) तसेच पूजन साहित्य उपलब्ध करून देणारे भांडार अशा विविध सुविधा उभारण्यात आल्या आहेत. या महोत्सवाच्या यानिमित्ताने दिगंबर जैन राष्ट्रसंतांसह अनेक आचार्य, उपाध्याय, साधू-साध्वींचा दुर्मिळ संतसमागम येथे होणार आहे.

महोत्सवात १२ मार्च रोजी दुपारी १ वाजता 'भक्तामर ज्योतिष सम्मेलन', १४ मार्च रोजी दुपारी १ वाजता 'भक्तामर हीलर महोत्सव' तसेच ४८००० मीटर हस्तलिखित भक्तामर वस्त्रांची विशेष झांकी सादर केली जाणार आहे. याशिवाय 'जैन अल्पसंख्याक योजना – सरकारी योजना आणि संधी' या विषयावर ऑल इंडिया जैन मायनॉरिटी फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष ललित गांधी मार्गदर्शन करणार आहेत. तसेच अमेरिकेतून पूर्वा सारंग शहा निर्मित भक्तामरवर चित्रफितीचे सादरीकरण होणार आहे. या महोत्सवासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांत पाटील, छगन भुजबळ, खासदार डॉ. अमोल कोल्हे, राजू शेट्टी, आमदार राहुल कुल यांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांना विशेष निमंत्रण देण्यात आल्याची माहितीही यावेळी पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी पत्रकार परिषदेत श्री. किशोर जिनदत्त शहा (चंदूकाका सराफ), डॉ. सारंग शरद कुमार शहा, श्रीमती सुजाता निरंजन शहा, अ‍ॅड. डॉ. स्वप्निल महावीर शहा (पुणे), श्री मिलिंद फडे आणि श्री. चेतन शहा (बारामती), वीरकुमार शहा, सुरेंद्र बडजात्या उपस्थित होते. विश्व संत डॉ. आचार्य श्री प्रणाम सागर जी गुरुदेव यांच्या प्रेरणेने तसेच दीक्षा गुरु पूज्य आचार्य श्री पुष्पदंत सागर जी यांच्या आशीर्वादाने हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

# श्रीगोंदा तालुक्यात शिबि राबविणार

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा तालुक्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' अभियान राबविण्यात येणार असून हे अभियान तालुक्यातील एकूण ११ मंडळांमध्ये वेगवेगळ्या तारखांना आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार सचिन डोंगरे यांच्या वतीने नायब तहसीलदार मिलिंद जाधव यांनी दिली. या अभियानाचा पहिला टप्पा काष्टी मंडळात शनिवार, दिनांक ७ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता काष्टी येथील राजयोग मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. या शिबिराचे उद्घाटन आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या हस्ते होणार असून श्रीकुमार चिंचकर (उपविभागीय अधिकारी, श्रीगोंदा–पारनेर) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

# जीर्णोद्धार सोहळ्यास प्रारंभ

**राहुरी : (समर्थ गांवकरी)**

सोमवार ९ मार्च ते सोमवार दिनांक १६ मार्च या काळात कोंढवड (तालुका-राहुरी) येथील हनुमान मंदिर मूर्ती प्राणप्रतिष्ठा व जिर्णोध्दार सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आल्याची माहिती कोंढवड ग्रामस्थ व भजनी मंडळाच्या वतीने देण्यात आली आहे. कोंढवड येथील श्री हनुमान मंदिर येथे होणाऱ्या या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये सोमवार दिनांक ९ मार्च रोजी युवराज जी महाराज देशमुख (आळंदी) , मंगळवार १० मार्च रोजी भागवताचार्य भगीरथ महाराज काळे ( सिन्नर ) , बुधवार ११ मार्च कीर्तन केसरी नरेंद्र महाराज गुरव (मालेगाव ),गुरुवार १२ मार्च वारकरी भूषण एकनाथ महाराज 70 शास्त्री (श्री क्षेत्र पंढरपूर ),शुक्रवार १३ मार्च वाणी प्रभू जगन्नाथ महाराज पाटील (शहापूर ठाणे), शनिवार १४मार्च ज्ञान सिंधू संदिपान महाराज हासेगावकर (आळंदी देवाची) रविवार १५ मार्च महामंडलिकेश्वर अमृता आश्रम स्वामी महाराज( जोशी बाबा) यांचे कीर्तन होणार आहे.

## विद्या निकेतन इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे

# 'माजी विद्यार्थी संमेलन' २०२६' उत्साहात संपन्न

**बोटा: (समर्थ गांवकरी)**

बोटा येथील विद्या निकेतन इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर, बोटा येथे दिनांक 4 मार्च 2026रोजी 'माजी विद्यार्थी संमेलन2026 हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. संस्थेचे प्राचार्य डॉ. किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यास ४० हून अधिक माजी विद्यार्थीमोठ्या उत्साहाने उपस्थित राहिले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.दिपक रहाणे सर (कॅम्पस डायरेक्टर, विद्या निकेतन ग्लोबल इन्स्टिट्यूट),प्रा. अभंग सर (प्राचार्य, विद्या निकेतन आयटीआय कॉलेज), प्रा.वाकचौरे सर (एचओडी, विद्या निकेतन इंजिनिअरिंग कॉलेज) तसेच प्रा. कोल्हे सर उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच कौशल्य विकास, प्रामाणिकपणा आणि सातत्य यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी माजी विद्यार्थ्यांनी संस्थेशी कायम संपर्क ठेवून सध्याच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे आवाहनही केले. यानंतर माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणकाळातील आठवणींना उजाळा देत सध्याच्या करिअर प्रवासातील अनुभव उपस्थितांसमोर मांडले. त्यांनी विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रातील संधी, स्पर्धा आणि आवश्यक कौशल्यांबाबत मार्गदर्शन केले. त्यामुळे सध्याच्या विद्यार्थ्यांना प्रेरणा व दिशा मिळाली. या कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन प्रा. दिपाली कुरकुटे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेतील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. शेवटी उपस्थित सर्व मान्यवर व माजी विद्यार्थ्यांचे आभार मानण्यात आले. अशा उपक्रमांमुळे माजी विद्यार्थी व संस्था यांच्यातील नाते अधिक दृढ होण्यास मदत होते, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# महाराज्यस्व समाधान शिबिराचे आयोजन : तहसीलदार

**सेनगाव : (समर्थ गांवकरी)**



तालुक्यातील सर्वसामान्य नागरिक शेतकरी व विद्यार्थी यासह गरजूवंत महिला व पुरुष यांचे महसूल विभागाशी असलेले दैनंदिन प्रश्न ते तात्काळ स्थानिक स्तरावरच निकाली निघावेत यासाठी महसूल प्रशासनाकडून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरात एकाच दिवसात घरपोच सेवा अंतर्गत महसूल प्रशासन गतिमान कार्यक्षम लोकाभिमुख करण्यासाठी शासन निर्णयानुसार सेनगाव तालुक्यात महाराजस्व समाधान शिबिर अभियान ,(टप्पा एक) राबविण्यात येणार असून तहसीलदार सखाराम मांडवगडे यांनी यासंबंधी माहिती दिली आहे. सदर शिबिर हे दि. 7 मार्च ते 15 मे पर्यंत तालुक्यातील महसूल मंडळ व शहरातील नगरपंचायत पातळीवर घेतली जाणार आहेत या शिबिरासाठी विशेष अधिकाऱ्यांची नेमणूक सुद्धा करण्यात आली आहे. तालुक्यातील सर्वसामान्य नागरिक ,शेतकरी, विद्यार्थी व गरजवंत महिला पुरुष यांचे महसूल विभागाची संबंधित असलेले दैनंदिन प्रश्न स्थानिक पातळीवरच निकाली निघावेत यासाठी या शिबिऱ्यांचा विशेष आयोजन करण्यात आले असून या शिबिराचा मुख्य भाग म्हणजे महसूल प्रशासना अंतर्गत जलद व तात्काळ सेवा पुरविण्यावर भर दिला जाणार असून यामध्ये महसूल ची निगडित असलेल्या ई-मोजणी, अ‍ॅग्रीस्टेक, पी एम किसान व तसेच तक्रार निवारण यासंबंधी प्रामुख्याने काम केले जाणार असून यामध्ये प्रलंबित फेरफार निकाली काढणे, अभिलेख दुरुस्ती, लोकसेवा हक्क कायदा व तात्काळ सेवा, अ कृषी तरतुदीनुसार सुधारणेबाबत मार्गदर्शन करणे, अकृषिक रूपांतरणासाठी जिल्हाधिकारी यांचे परवानगी आवश्यक नसणे (कलम 42 मधील सुधारणा), संपुष्टात आणलेल्या सनद प्रणाली बाबत (कलम 42 अ 42 व 42 क 42 ड), एक वेळचे अधिमूल्य भरण्यासाठी नवीन व्यवस्था करणे, डिजिटल 7/12 कायदेशीर वैधताबाबत जनजागृती करणे, भूसंपादन केलेल्या व अकृषीक परवानगी दिलेल्या प्रकरणी कमी जास्त पत्रके तयार करून गाव दप्तर अद्यावत करणे, सुधारला व नागरी सुविधा या सर्व बाबीसाठी एक खिडकी व्यवस्था करणे आधी काम प्रामुख्याने केल्या जाणार असून ही राज्य शासनाने निर्गमित केल्यानुसार छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर करण्यात येणार असून एकच दिवसात घरपोच सेवा यांचे मुख्य धोरण असून सदर शिबिर हे माहे 7 मार्च ते 15 मे दरम्यान तालुक्यातील महसूल मंडळ स्तरावर व सेनगाव शहरातील नगरपंचायत स्तरावर घेणार असून यामध्ये हता व आजेगाव मंडळात 7 मार्च रोजी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या कामी नायब तहसीलदार अनिल सरोदे, देवराव कारगुडे यांची नियुक्ती करण्यात आली असून बाभूळगाव पुसेगाव ठिकाणी 14 मार्च रोजी शिबिर असून यासाठी नायब तहसीलदार वाकळे, अनिल सरोदे यांची नेमणूक केली आहे गोरेगाव पानकनेरगाव मंडळासाठी 10 एप्रिल रोजी शिबिर आयोजन करण्यात आले असून या कामी स्वतः तहसीलदार सखाराम मांडवगडे यांची नेमणूक असून दिनांक 17 एप्रिल रोजी साखरा व 8 मे सेनगाव मंडळ अंतर्गत असलेली गावे या कामी तालुका पुरवठा निरीक्षण आधिकारी विशाल लोहटे तर सेनगाव नगरपंचायत अंतर्गत तहसीलदार सखाराम मांडवगडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे या कामे प्रत्येक महसूल मंडळातील मंडळ अधिकारी व तलाठी यांनी उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असून त्यामध्ये कुठलीही हलगर्जीपणा अथवा दुर्लक्षितपणा खपवून घेतला जाणार नाही असा इशारा तहसीलदार सखाराम मांडवगडे यांनी आपल्या आदेशात नमूद केला आहे. तालुक्यात सुरू असलेले छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व समाधान आयोजन दिनांक 7 मार्च ते 15 मे पर्यंत तालुक्यातील महसूल मंडळ स्तरावर व सेनगाव नगरपंचायत स्तरावर करण्यात आले आहे या शिबिरात विद्यार्थ्यांना दिल्या जाणारे उत्पन्नाचे प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमीयर, व महसूल प्रशासनाकडून असलेल्या अनुदान तत्त्वावरील सगायो, श्रावण बाळ योजना, राष्ट्रीय सामाजिक अर्थसाह्य योजना यासह योजनेसाठी गरजू व पात्र लाभार्थ्यांनी शिबिरामध्ये सहभाग घेऊन लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार सखाराम मांडवगडे यांनी केले आहे. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, अप्पर जिल्हाधिकारी मधुकर कांबळे, उपविभागीय अधिकारी योगेश कुमार मीना वरिष्ठांच्या मार्गदर्शक व सूचनेनुसार तालुक्यातील नव महसूल मंडळांतर्गत महाराज स्व समाधान शिबिराचे आयोजन महसूल मंडळाच्या ठिकाणी करण्यात आले आहे या शिबिरासाठी विशेष अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून संबंधित महसूल चे मंडळ अधिकारी तलाठी व ग्रामसेवक यासह इतर कर्मचाऱ्यांना शिबिर स्थळी उपस्थित राहणे क्रमपात असून या शिबिर स्थळे शासनाच्या असलेल्या लोककल्याणकारी व अनुदान तत्त्वावरील व विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या शैक्षणिक दाखले व इतर प्रमाणपत्र जागेवरच शिबिरास्थळी वितरण केल्या जाणार असून या शिबिरात तालुक्यातील गरजूवंत व पात्र लाभार्थ्यांनी शासनाच्या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार सखाराम मांडवगडे यांनी केले आहे.



## अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या., अ.नगर

मुख्य कार्यालय:- महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड,उपनिबंधक, ता.नगर कार्यालयाशेजारी,अ.नगर. ✆ २३२६९१४

जा. क्र. पतसंस्था फेडरेशेन /७२८९ सन २०२६ दिनांक : २७/०२/२०२६

**स्थावर मालमत्ता विक्रीचा जाहिरनामा**

ज्या अर्थी **विवेकानंद ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, जामखेड .,ता.जामखेड,जि.अ.नगर** यांनी खाली नमुद केलेल्या थकबाकीदारांविरुध्द महाराष्ट्र सह.संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१/९८ ब अन्वये वसुली दाखले मिळविले असुन त्यांच्यावर रितसर मागणी नोटीस बजावली आहे.तरीही त्यांनी त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम भरली नसल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७/(१०) नुसार मला मा.जिल्हा उप-निबंधक, सहकारी संस्था,अहमदनगर यांनी प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन मी **एम.ए.शेख** विशेष वसुली व विक्री अधिकारी खालील नमुद स्थावर मालमत्ता थकीत येणे रक्कम वसुलीकरिता जाहिर लिलावाने विक्री करित आहे. तरी स्थावर मालमत्ता लिलावात भाग घेऊ इच्छिनाणाऱ्यांनी नमुद ठिकाणी तारखेस व वेळेस उपस्थित रहावे.

| अ.नं. | थकबाकीदाराचे नाव | गांव | स्थावर मिळकत<br>वसुली दा.रक्कम | गट नं. | क्षेत्र<br>हे आर | आकार<br>रु पै | वसुली दा.रक्कम<br>पुर्व | पश्चिम | उत्तर | दक्षिण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्ज - नवनाथ नामदेव नंदुर्गे [मयत] करिता<br>जामि - नामदेव निवृत्ती नंदुर्गे यांची मिळकत<br>जामि - सुभाष शांतीलाल गुळवे<br>जामि- अभिमान आंबु शिंदे | जवळा<br>जवळा<br>जवळा<br>तपनेश्वर ता. जामखेड | १५०६७७/- + होणारे व्याज+ इतर खर्च | मा.क्र.२५१ | ३३६ चौफुट | - | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| २ | कर्ज - प्रशांत नरसिंग भैसडे यांची मिळकत<br>जामि- शगीर सिकंदर शेख<br>जामि- शेख लतिफ बनेमिया | खर्डा<br>खर्डा<br>खर्डा ता.जामखेड | ३७१०५/- + होणारे व्याज+ इतर खर्च | ९०६ पैकी<br>४४२/१ पैकी | ०.०१.५० पैकी<br>१.२७ पैकी ३.२८ | ०.०१<br>३.२८ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ३ | कर्ज- अल्लाउद्दीन मोतीलाल शेख यांची मिळकत<br>जामि- लौलबी रज्जाक शेख<br>जामि- जाफर हुसेन आतार<br>जामि- फारुक मोतीलाल शेख | खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा ता.जामखेड | ७९७९५/- + होणारे व्याज+ इतर खर्च | ५०१ पैकी | ०.५४ पैकी | ०.६१ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ४ | कर्ज- पांडुरंग अनंत काकडे करिता<br>जामि- राजेंद्र गणपत जगताप यांची मिळकत<br>जामि- ललिता प्रविणकुमार चोरडीया | मोरेवस्ती<br>जामखेड<br>पुजा साडी जामखेड ता.जामखेड | ५००००/- + होणारे व्याज+ इतर खर्च | नगर भुमापन क्र.१५२९ | ३०.८० चौमी | - | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ५ | कर्ज- गुळवे सुभाष शांतीलिंग करिता<br>जामि- शांतीलिंग केदारी नंदुर्गे यांची मिळकत<br>जामि- दिलीप रामलिंग धावड<br>जामि- दिलीप वसंत लोहार | लोहार गल्ली जामखेड<br>जवळा<br>तपनेश्वर गल्ली<br>महादेव गल्ली ता.जामखेड | २२२३४१/- + होणारे व्याज+ इतर खर्च | मा.क्र.५४३/४ | ३७० चौ.फुट | - | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ६ | कर्ज- जुबेर मकबुल पठाण करिता<br>जामि- तुषार अशोक पवार यांची मिळकत<br>जामि- सलीम मेहमुदनुर बागवान | हाजी मंजिल,बिड रोड<br>रत्नापुर<br>मोहीनीराज ऑटो ता.जामखेड | १९११७८/- + होणारे व्याज+ इतर खर्च | ३९० | १०.२५ | ०.११ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ७ | कर्ज- अशोक भगवान नेहरकर यांची मिळकत<br>जामि- सुरेश नामदेव वायभासे<br>जामि- सुर्यभान बाबु ढाळे | तेलंगशी<br>तेलंगशी<br>तेलंगशी ता.जामखेड | ५६१८५/- + होणारे व्याज+ इतर खर्च | ३६२ | १.२८ | २.२३ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ८ | कर्ज- सुरेश धोंडिराम पाठक यांची मिळकत<br>जामि- शिवाजी रामलिंग जिरेकर<br>जामि- संभाजी लक्ष्मण हिंगमिरे | दिघोळ<br>दिघोळ<br>दिघोळ ता.जामखेड | ५९९०५/- + होणारे व्याज+ इतर खर्च | ३८६ | १.३२ | ४.७८ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ९ | कर्ज- चंद्रकांत सुबाराव म्हस्कर यांची मिळकत<br>जामि- दत्तात्रय बाजीराव बिरंबळ<br>जामि- हरिदास माणिक केसकर | खर्डा<br>खर्डा<br>खर्डा ता.जामखेड | १४८०८६१/- + होणारे व्याज+ इतर खर्च | मा.क्र.२३२० | ५५.७७ चौ.मी | - | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| १० | कर्ज- सुरेश नामदेव वायभासे यांची मिळकत<br>जामि- सुर्यभान बापु ढाळे<br>जामि- विष्णु गंगाधर नेहरकर | तेलंगशी<br>तेलंगशी<br>तेलंगशी ता.जामखेड | २५०००/- + होणारे व्याज+ इतर खर्च | ५३४ पैकी<br>५४१ पैकी | ०.००२५ पैकी<br>०.००१३ पैकी | ०.०१<br>०.०१ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ११ | कर्ज- भगवान भानुदास भोरे यांची मिळकत<br>जामि- नाना सोनबा जमदाडे<br>जामि- दत्तात्रय मुरलीधर टेपाळे | देवदैठण<br>देवदैठण<br>देवदैठण<br>देवदैठण<br>देवदैठण<br>दिघोळ ता.जामखेड | ५९९०५/- + होणारे व्याज+ इतर खर्च | ४८५ पैकी<br>४५८ पैकी<br>३४६ पैकी<br>४८९ | ०.१५ पैकी<br>०.१७ पैकी<br>०.९६ पैकी<br>०.३५ | ०.०७<br>०.३६<br>१.३१<br>१.३७ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| १२ | कर्ज- ताहेर सय्यद पटेल यांची मिळकत<br>जामि- ईश्वर रघुनाथ कोळी<br>जामि- शेख फकिर गफार | घोडेगाव<br>नान्नज<br>नान्नज ता.जामखेड | ३५७७५/- + होणारे व्याज+ इतर खर्च | २६५/१ | ०.७८ | ०.३७ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| १३ | कर्ज- संजय रावसाहेब इंगळे यांची मिळकत<br>जामि- रामराव साहेबराव शिंदे<br>जामि- बाजीराव साहेबराव शिंदे | नायगाव<br>नायगाव<br>खर्डा<br>खर्डा ता.जामखेड | ४१५००/- + होणारे व्याज+ इतर खर्च | ३१८ पैकी<br>३१९ पैकी | ०.०७ पैकी<br>२.०९ पैकी | ०.१३<br>५.२५ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| १४ | कर्ज- भगवान अण्णा गोलेकर [मयत]करिता<br>जामि- उज्वला भगवान गोलेकर यांची मिळकत<br>जामि- सदाशिव बलभिम कोरे<br>जामि- मधुकर पांडुरंग गोलेकर | खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा ता.जामखेड | ११५५७५/- + होणारे व्याज+ इतर खर्च | २१५/१ | ०.३८ | १.१३ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| १५ | कर्ज- साहेबराव रामा इंगळे करिता<br>जामि- शरद पांडुरंग कोथंबिरे | खर्डा<br>खर्डा ता.जामखेड | १९९६५५/- + होणारे व्याज+ इतर खर्च | २९२ | २.४८ | ३.०६ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |

**लिलावाचे ठिकाण व वेळ : https://eauction.gov.in** या सांकेतिक स्थळावर **विवेकानंद ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, जामखेड .,ता.जामखेड,जि.अ.नगर.दि.३०/०३/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता.** हा आदेश प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत वसुल पात्र रक्कम व त्यावरील येणे व्याज न भरल्यास वरीलप्रमाणे जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहिर लिलाव करण्यात येईल व पंतसंस्थेस येणे असलेल्या वसुल पात्र रक्कमेचा भरणा केला जाईल. वरील स्थावर जाहिर लिलावाने विक्री करुन ही वसुल पात्र रक्कमेएवढी रक्कम न आल्यास जामिनदारांकडुन वरील प्रमाणेच प्राधान्याने वसुली केली जाईल,याची जामिनदाराने नोंद घ्यावी. **लिलावाच्या दिवशी दि. ३०/०३/२०२६** रोजी लिलवात कोणीही भाग न घेतल्यास **फेर लिलाव नं.२ दि.०४/०५/२०२६ रोजी सकाळी :११.३०वाजता** संस्थेच्या /कार्यालयात होईल. तसेच या ही लिलावात बोली बोलण्यास अथवा योग्य किमंत न आल्यास **अंतिम लिलाव हा दि.०६/०६/२०२६ रोजी सकाळी :११.३० वाजता https://eauction.gov.in** या सांकेतिक स्थळावर **विवेकानंद ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, जामखेड .,ता.जामखेड,जि.अ.नगर** या ठिकाणी होईल याची नोंद घ्यावी.

स्थळ :- अ.नगर
दिनांक :- २७/०२/२०२६

सिल

(एम.ए.शेख)
विशेष वसुली व विक्री अधिकारी
अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या.,अ.नगर




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शनिवार, दि. ०७ मार्च २०२६




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १०१ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com | Gmail : punegavkari@gmail.com

# मुख्यमंत्र्यांच्या नागपूरमध्ये आरोग्य संस्था

## शिंदेंच्या दरेगावात निसर्गोपचार केंद्र

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरसाठी 'एम्स'च्या धर्तीवर 'महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य संस्थे'ची घोषणा करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दरेगावचीही काळजी घेण्यात आली आहे.. शिंदे यांच्या सातारा जिल्ह्यातील दरेगाव या मूळ गावी निसर्गोपचार केंद्राची घोषणा करण्यात आली. त्याचप्रमाणे शिंदेंच्या गावाजवळील वासोटा किल्ल्यासाठी रोपवेला मंजुरी देण्यात आली.

ताणतणाव, जीवनशैलीजन्य आजार, मानसिक आरोग्य तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यसेवांसाठी सातारा जिल्ह्यात दरे परिसरात निसर्गोपचार केंद्र उभारण्याची घोषणा करण्यात आली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हे दरेगाव सातारा जिल्ह्यात वसले आहे. २०२२ साली शिवसेनेत फूट पडल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे दरेगाव चर्चेत आले. त्यानंतर सत्तेत आलेल्या महायुती सरकारमध्ये आधी मुख्यमंत्रीपदावरून तसेच मंत्रिमंडळ शपथविधीवरून चालू असलेल्या धामधुमीच्या काळात एकनाथ शिंदे दरेगाव खूपच चर्चेत आले. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर कोणताही निर्णय पटला नाही तर उपमुख्यमंत्री दरेगावाला भेट देत असल्याची चर्चा आहे. तेथील पावसाळ्यातील शेती करतानाची चित्रफीत, छायाचित्रांनाही चांगली प्रसिद्धी मिळाली. सह्याद्रीच्या कुशीत कोयना नदीच्या तिरावर वसलेले दरे हे निसर्गरम्य गाव आहे. याच निसर्गाच्या सान्निध्यात असलेल्या उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या दरेगावात निसर्गोपचार केंद्र उभारण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्री फडणवीस यांनी अर्थसंकल्पात करताना शिंदे यांची विशेष काळजी घेतली. याची माहिती पत्रकार परिषदेत देताना एकनाथ शिंदे यांनी आवर्जुन या निसर्गोपचार केंद्राचा उल्लेख केला.

दरेगावच्या निसर्गोपचार केंद्राविषयी माहिती देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'लाडक्या भावाचीही काळजी' घेतल्याची टिपणी केली. सातारा जिल्ह्यातील सह्याद्री पर्वतारांगांमध्ये वसलेला वासोटा किल्ला हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचे आणि रणनीतीचे प्रतीक आहे. पर्यटकांच्या सुरक्षित, सुलभ व पर्यावरणपूरक प्रवेशाकरिता मुनावळे ते वासोटा किल्ला रोपवे प्रकल्प करण्याची घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली. सध्या या किल्ल्यापर्यंत पोहोचण्यासाठी कोयना अभयारण्यातून ३ ते ४ तासांचा ट्रेक करावा लागतो. रोपवेमुळे हे अंतर कमी होणार आहे.

सार्वजनिक आरोग्याच्या सर्वंकष उन्नतीसाठी एम्स व आयआयएमच्या धर्तीवर गुणवत्तेच्या प्रशिक्षण व संशोधनासाठी नागपूर येथे भारतीय सार्वजनिक आरोग्य संस्थेच्या सहकार्याने 'महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य संस्था' स्थापन करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली.

### शेती क्षेत्रासाठी करण्यात आलेल्या महत्त्वाच्या घोषणा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची घोषणा केली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेकरी कर्जमाफी योजने अंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीककर्ज थकीत असलेल्या पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी जाहीर करण्यात आली आहे. तसेच पीककर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपये अनुदान दिले जाईल, असेही जाहीर करण्यात आले. तसेच कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर लाभ देण्याबरोबरच बँकिंग यंत्रणा सक्षम करण्यासाठी, तसेच शेतकऱ्यांना कायमस्वरूपी कर्जमुक्त करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन खर्चात २५ टक्के घट करून उत्पादकता वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. अॅग्रीस्टॅक, महावेध, क्रॉपसॅप यांसारख्या डिजिटल प्लॅटफॉर्मची उभारणी आणि शेतीमध्ये आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा वापर करण्यात येणार.

# वाद टाळण्यासाठी शरद पवारांच्या नावाला संमती दिली

**मुंबई (समर्थ गांवकरी)**



■ आता मोठी प्रतीक्षा करावी लागणार, राज्यसभेच्या जागेवरून आदित्य ठाकरेंची सल

महाराष्ट्रातील राज्यसभेच्या सात जागांची निवडणूक बिनविरोध झाली असली, तरी महाविकास आघाडीतील (मविआ) अंतर्गत धुसफूस आता समोर येऊ लागली आहे. "मविआमध्ये सर्वात जास्त आमदार असलेला पक्ष असूनही आम्हाला डावलून तिसऱ्या क्रमांकाच्या पक्षाला संधी मिळाली," अशा शब्दांत युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी आपली नाराजी उघडपणे बोलून दाखवली आहे. या निर्णयामुळे शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाला आता २०२९ पर्यंत पुन्हा संधी मिळणे कठीण असल्याचे सांगत त्यांनी आपली सल व्यक्त केली. राज्यसभेच्या महाराष्ट्रातील ७ जागांसाठी गुरुवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस होता. भाजपकडून ४, शिंदेंच्या शिवसेनेकडून १, अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून १ अर्ज दाखल करण्यात आला. तर महाविकास आघाडीकडून शरद पवार यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. ७ जागांसाठी ७ अर्ज आल्याने ही निवडणूक बिनविरोध होणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. महाविकास आघाडीकडून शरद पवार यांनी देण्यात आलेल्या उमेदवारीवरून आदित्य ठाकरे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. राज्यसभेच्या ७ जागांपैकी १ जागा महाविकास आघाडीच्या वाटेवर येणार होती. ही जागा शिवसेनेला मिळावी यासाठी आदित्य ठाकरे आग्रही होते. मात्र, शरद पवार यांनी निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्यावर मविआने त्यांच्या नावाला पसंती दिली यावर भाष्य करताना आदित्य ठाकरे म्हणाले की, "आम्ही महाविकास आघाडीत काही नियम पाळत होतो, त्यानुसार जो सर्वात मोठा पक्ष असतो, त्याला पहिली संधी मिळायला हवी होती. आमचा पक्ष मोठा असूनही संधी तिसऱ्या नंबरच्या पक्षाला (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष) मिळाली. मी जो दावा करत होतो तो निस्वार्थीपणे आणि माझ्या पक्षाच्या हितासाठीच होता."

# 'यूपीएससी'च्या निकालात उमेदवारांचा डंका

**पुणे : (समर्थ गांवकरी)**




केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे (यूपीएससी) घेण्यात आलेल्या नागरी सेवा परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. त्यात डॉ. अनुज अग्निहोत्री यांनी देशात पहिला क्रमांक मिळवला आहे. एकूण ९५८ उमेदवारांची शिफारस करण्यात आली असून, त्यात राज्यातील उमेदवारांच्या यशाचा डंका वाजला आहे. यूपीएससीतर्फे ऑगस्ट २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या नागरी सेवा परीक्षेच्या लेखी परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती डिसेंबर २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत घेण्यात आल्या. त्यानंतर नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस), भारतीय परराष्ट्र सेवा (आयएफएस), भारतीय पोलिस सेवा (आयपीएस), केंद्रीय सेवा गट अ आणि गट ब या पदांसाठी पात्र उमेदवारांची निवड करण्यात आली. डॉ. अनुज अग्निहोत्री यांनी देशात पहिले, राजेश्वरी सुवे एम. यांनी द्वितीय, आकांश धुल्ल यांनी तिसरे स्थान प्राप्त केले आहे. निकालातील पहिल्या १०० क्रमांकांत राज्यातील उमेदवारांनी स्थान प्राप्त केले आहे. आतापर्यंत उपलब्ध झालेल्या माहितीनुसार, किरण कामठे यांनी ५३वा, हृषिकेश अलासे यांनी ६१वा, सायली पगार यांनी ८७वा, दीक्षा पाटकर यांनी ८८वा क्रमांक पटकावला आहे. तर अंकिता पाटील यांनी १४०, कार्तिक बच्छाव यांनी १७७, राहुल पाटील यांनी २२५, शुभम बेहेरे यांनी २२६, ऋषिकेश पालीमकर यांनी २८३, मोहिनी जगताप यांनी ३२३, हर्षवर्धन पाटील यांनी ३४९, हर्षवर्धन तिडके यांनी ३५५, कुणाल अहिरराव यांनी ४३०, अभिषेक मगदूम यांनी ४४९, धनश्री अहिरे यांनी ४८९, तर मनोज पाटील यांनी ४९३वा क्रमांक मिळवला आहे.

दरम्यान, आयोगाने विविध सेवांसाठी एकूण ९५८ उमेदवारांची शिफारस केली असली, तरी अंतिम नियुक्त्या संबंधित सेवांसाठी केंद्र सरकारने जाहीर केलेल्या रिक्त पदांच्या संख्येवर अवलंबून असतील. भारतीय प्रशासकीय सेवेसाठी (आयएएस) एकूण १८० पदे, भारतीय परराष्ट्र सेवा (आयएफएस) साठी एकूण ५५ पदे, आयपीएससाठी १५०, केंद्रीय सेवा गट अ साठी ५०७, गट ब साठी १९५ पदे उपलब्ध असतील.

जाहीर केलेल्या निकालामध्ये ३४८ उमेदवारांची शिफारस सध्या तात्पुरत्या स्वरूपातील आहे, तर २ उमेदवारांचे निकाल सध्या रोखून ठेवण्यात आले आहेत. शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांनी केलेल्या सर्व आरक्षण दाव्यांची अंतिम पडताळणी संबंधित प्राधिकरणांकडून केली जाणार असल्याचे निकालाच्या अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.




# मृगजळ दाखवणारा अर्थसंकल्प

## मध्यमवर्गासाठी काहीच नाही, कंत्राटदारांसाठी मात्र ठोस योजना - उद्धव ठाकरे

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात अनेक मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांची 2 लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देखील करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे. आता या अर्थसंकल्पावर विरोधकांनी टीका केली आहे. विकासाचा मृगजळ दाखवणारा हा अर्थसंकल्प असल्याची टीका शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली आहे. उद्धव ठाकरे म्हणाले, आताचे मुख्यमंत्री म्हणतात की शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा कोरा करू म्हणतात. तर कोरा तर केलेला नाही. परंतु, साधारण 5 वर्षांपूर्वी आम्ही कालबद्ध पद्धतीने शेतकऱ्यांची कर्जमुक्ती केली होती 2 लाखांपर्यंत. कालबद्ध पद्धतीने केल्यानंतर त्याच्यात पात्र-अपात्र हे नियमांचे किंवा अटीतटींचे झंझट ठेवले नव्हते. फक्त दोन वेळा शेतकरी त्या केंद्रावर गेल्यानंतर त्यांची सरसकट कर्जमुक्ती केली होती. दुर्दैवाने त्यानंतर कोरोना आला म्हणून नियमित कर्ज परतफेड करणाऱ्यांचे जे 50 हजार रुपये प्रोत्साहनपर राशी होती आम्ही द्यायला सुरुवात केली आणि आमचे सरकार पाडले गेले. पुढे बोलताना सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पावर बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, एकूण जर अर्थसंकल्प पाहिला तर सातबारा तर कोरा झालेला नाहीच. लाडक्या बहिणींना 2100 रुपये देणार म्हटले होते त्याचा उल्लेख नाही. कंत्राटदारांसाठी मात्र ठोस योजना आहेत. शेतकरी आणि कामगारांसाठी हा फसवा अर्थसंकल्प आहे. थोडक्यात, हा विकासाचा मृगजळ दाखवणारा हा अर्थसंकल्प आहे. प्रत्येकाला आता काही दिवसात कळेल की या अर्थसंकल्पामुळे त्याच्या आयुष्यात काय फरक पडणार आहे. उद्धव ठाकरे म्हणाले, मला असे वाटते की राज्याची आर्थिक परिस्थिती ही कशी आहे हे सगळ्यांना माहीत आहे. कर्ज काढून फटाके फोडणारा हा अर्थसंकल्प आहे. यातून मला असे वाटत नाही की राज्याचे काही हित सध्या होईल आणि शेतकऱ्यांचे खरेच काही भले करायचे असेल तर पात्र-अपात्र हा जो काही त्यांनी शाब्दिक खेळ केला आहे, असे न करता ज्याप्रमाणे आम्ही कालबद्ध पद्धतीने शेतकऱ्यांना 2 लाखांपर्यंत कर्जमुक्त केले होते तसे त्यांनी करावे. तसेच आताची कर्जमुक्ती 2047 पर्यंत तरी पूर्ण करणार का? असा सवाल ठाकरेंनी उपस्थित केला आहे. या अर्थसंकल्पात थापा मारायची लेवल वाढली आहे. मी जसे म्हटले की हे विकासाचे मृगजळ दाखवले आहे. 2047 कोणी पाहिले आहे? आत्ता शेतकऱ्यांच्या हातात काय पडणार आहे, आत्ता जो मध्यमवर्गीय आहे त्याच्या हातात काय पडणार आहे, जो नोकरदार आहे, तरुण-तरुणी जे शिक्षण घेऊन नोकरीच्या शोधात जाणार आहेत त्यांना काय मिळणार आहे? नुसत्या योजना जाहीर केल्या आहेत.

त्या योजनांसाठी निधी कुठून आणणार? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. 300 कोटी वृक्ष लावायचे म्हणत आहेत, त्यासाठी जमीन कुठून आणणार? त्या जागेवर काही आरक्षण आणले जाणार आहे का? असाही प्रश्न उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. गुजरात-मुंबई बुलेट ट्रेन येतेय. पण मुंबईचा माणूस गुजरातला जाऊन करणार काय? 2047 पर्यंत भाजप टिकणार नाही फक्त कर्जाचा डोंगर उभारत आहे.

# ठाणे मनपाची पाणीपट्टी वसुली मोहीम तीव्र; 4 कोटींची वसुली

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



ठाणे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत थकीत पाणीपट्टी वसुलीसाठी विशेष मोहीम राबविण्यात येत असून दि. 27 फेब्रुवारी ते 05 मार्च 2026 या कालावधीत शहरातील विविध प्रभाग समित्यांमधून एकूण 4 कोटी 22 लाख 35 हजार 750 रुपयांची वसुली करण्यात आली आहे. थकीत देयकदारांवर कठोर कारवाई करत 103 पाणी जोडण्या तोडण्यात आल्या असून 177 जणांना नोटिसा बजावण्यात आल्या असून 3 ठिकाणचे पंप जप्त करण्यात आले असून तर 1 पंप रुम सील करण्यात आला आहे. या कालावधीत प्रभाग समितीनिहाय वसुलीमध्ये मानपाडा प्रभाग समितीतून 1,14,65,750 रुपयांची वसुली करण्यात आली. कळवा प्रभाग समितीतून 59,05,557 रुपयांची वसुली करण्यात आली असून 35 जणांचे नळ संयोजन खंडीत करण्यात आले. नौपाडा प्रभाग समितीतून 52,98,941 रुपयांची वसुली करण्यात आली तर 31 जणांची नळसंयोजने खंडीत करण्यात आली तर 60 जणांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. वर्तकनगर प्रभाग समितीतून 49,94,751 रुपयांची वसुली करण्यात आली असून 5 जणांची नळसंयोजने खंडीत करण्यात आली तर 20 जणांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. तसेच उथळसर प्रभाग समितीतून 36,61,836 रुपयांची वसुली करण्यात आली असून 4 जणांची नळसंयोजन खंडीत करण्यात आली. लोकमान्य-सावरकर नगर प्रभागातून 31,37,858 रुपयांची वसुली करण्यात आली असून 10 जणांची नळसंयोजने खंडीत करण्यात आली असून 97 जणांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. वागळे प्रभागातून 25,13,857 रुपयांची वसुली करण्यात आली. दिवा प्रभागातून 23,64,631 रुपयांची वसुली करण्यात आली असून 18 जणांची नळसंयोजने खंडीत करण्यात आली तर 3 ठिकाणचे पंप जप्त तर 1 पंप रुम सील करण्यात आला. मुंब्रा प्रभागसमितीतून 16,60,158 रुपयांची वसुली करण्यात आली. तर नागरी सुविधा केंद्राअंतर्गत 12,32,411 रुपयांची वसुली करण्यात आली. ही वसुली मोहिम यापुढेही अधिक तीव्र होणार असल्याचे आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले असून नागरिकांनी थकीत पाणीपट्टी तातडीने भरून कारवाई टाळावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.



ठाणे : दिव्यात इंद्रधनू मित्र मंडळाच्या वतीने शिवजयंती निमित्ताने भव्य शिव प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. यंदा मंडळाचे 22 वे वर्षे असून ही दिव्यातील पहिली शिवजयंती आहे असे मंडळाचे अध्यक्ष तुषार पाटील यांनी सांगितले यावेळी मंडळाचे अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी व दिवा ग्रामस्थ उपस्थित होते.

(फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### लक्षवेधी सूचनांची संख्या वाढवण्याची आमदार विक्रमसिंह पाचपुते यांची मागणी

**श्रीगोंदा (स. गांवकरी) :** महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान लक्षवेधी सूचनांसंदर्भात अत्यंत महत्त्वाचा मुद्दा श्रीगोंदा नगर मतदारसंघाचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी सभागृहात उपस्थित केला. लक्षवेधी सूचनांद्वारे मतदारसंघातील तसेच राज्यातील विविध लोकहिताचे प्रश्न सभागृहाच्या निदर्शनास आणून देता येतात. मात्र विधानभवनात लक्षवेधी सूचनांची संख्या मर्यादित असल्यामुळे अनेक महत्त्वाचे विषय मांडण्याची संधी सदस्यांना मिळत नसल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. लोकप्रतिनिधींना अधिक प्रभावीपणे जनतेचे प्रश्न मांडता यावेत, यासाठी लक्षवेधी सूचनांची संख्या वाढविणे आवश्यक असल्याचे मत आमदार पाचपुते यांनी व्यक्त केले. तसेच लोकहिताचे प्रश्न सभागृहात अधिक व्यापकपणे मांडले जावेत, यासाठी या विषयाकडे सकारात्मक दृष्टीने विचार व्हावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.



### बाळासाहेब चांडे यांना 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी दिव्यांग मित्र' पुरस्कार

**श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) :** श्रीगोंदा तालुक्यातील प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने सेवानिवृत्त शिक्षक बाळासाहेब शिवाजी चांडे (सर) यांना 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी दिव्यांग मित्र' पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. दिव्यांग बांधवांसाठी त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. या सन्मान सोहळ्यात प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेचे तालुका अध्यक्ष सुधीर भालेराव यांच्या हस्ते बाळासाहेब चांडे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. दिव्यांग बांधवांच्या हक्कांसाठी तसेच त्यांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी चांडे यांनी सातत्याने प्रयत्न केले असून समाजात जनजागृती करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले आहे. प्रहार दिव्यांग क्रांती संघटना, श्रीगोंदा यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमास संघटनेचे पदाधिकारी, पत्रकार, कार्यकर्ते तसेच सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी चांडे यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांना पुढील सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### भव्य नागदेवता मंदिराचे लोकार्पण; भक्तांसाठी आकर्षणाचे नवे तीर्थक्षेत्र!



**कच्छ (नंद गाम) (स. गांवकरी) :** कच्छ जिल्ह्यातील नंद गाम येथे नागदेवता मंदिर आता भव्य आणि आधुनिक स्वरूपात उभे राहिले असून भाविकांसाठी हे ठिकाण श्रद्धेचे नवे केंद्र बनत आहे. मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार महामार्गालगत उभारण्यात आल्यामुळे रस्त्याने प्रवास करणाऱ्या भाविकांना सहजपणे नागदेवतेचे दर्शन घेण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. देवाच्या कृपेने मंदिराचे बांधकाम अत्यंत सुंदर व आकर्षक पद्धतीने पूर्ण झाले आहे. या भव्य मंदिराच्या उभारणीत सेठ एन.के.टी. ट्रस्ट यांनी मोठे योगदान दिले आहे. ट्रस्टच्या सहकार्यामुळे मंदिर परिसर अधिक आकर्षक, सुबक आणि भाविकांसाठी सोयीस्कर बनवण्यात आला आहे. मंदिरात येणाऱ्या भाविकांसाठी प्रसाद तसेच भोजनाचीही उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या भक्तांना आध्यात्मिक वातावरणात समाधानकारक सेवा मिळत आहे. येणाऱ्या काळात नंद गाम येथील हे नागदेवता मंदिर कच्छ परिसरातील एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. यावेळी समाजरत्न श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठानावाला, श्री नटवरलाल वीरजीभाई ठक्कर, श्री प्रभुलाल हरजीभाई ठक्कर तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंदिराचे पुजारी विशाभाई रबारी हे मंदिराच्या सेवा व व्यवस्थापनासाठी सातत्याने परिश्रम घेत असून त्यांनी समाजसेवक श्री नानजीभाई ठक्कर व उपस्थित मान्यवरांचे हार्दिक स्वागत केले. या प्रसंगी पूजाभाई पटेल यांच्यासह अनेक मान्यवर व स्थानिक नेते उपस्थित होते. मंदिराच्या भव्य उभारणीमुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.

# काष्टी जि.प. शाळेचा राज्यात डंका



**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

जानेवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या नॅशनल स्कॉलरशिप परीक्षेत श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेच्या सहा विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर उल्लेखनीय यश मिळवून शाळेचा राज्यात डंका गाजवला आहे.

जिल्हा परिषद केंद्र शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र येवले यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता दुसरी, तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी या परीक्षेत सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळवत राज्य पातळीवर उल्लेखनीय यश संपादन केले.

इयत्ता चौथीची विद्यार्थिनी रीजा इकबाल बागवान हिने २०० पैकी १९० गुण मिळवत राज्यात चौथा क्रमांक पटकावला. तसेच इयत्ता तिसरीतील पृथ्वीराज सागर राहिंज याने १८६ गुणांसह राज्यात सहावा, कृष्णा नवनाथ गोंडगे याने १८४ गुणांसह सातवा, तर अनुष्का गणेश पाचपुते हिने १८० गुणांसह नववा क्रमांक मिळवला. इयत्ता दुसरीतील भूषण संजय कदम याने १८८ गुण मिळवत राज्यात सातवा, तर इयत्ता चौथीची आरोही अनिल जगताप हिने १७८ गुणांसह राज्यात दहावा क्रमांक मिळवला.

**सहा विद्यार्थ्यांचे नॅशनल स्कॉलरशिप परीक्षेत घवघवीत यश**

एकूण सहा विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर यश संपादन केल्याने शाळेचा व तालुक्याचा गौरव वाढला आहे.

या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे माजी मंत्री बबनराव पाचपुते, लोकनियुक्त सरपंच साजन पाचपुते, सहकार महर्षी संस्थेचे अध्यक्ष राकेश पाचपुते, उपसरपंच शितल नितीन ढमे, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी तसेच ग्रामस्थांनी अभिनंदन केले. तसेच शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र येवले, वर्ग शिक्षक-शिक्षिका, केंद्रप्रमुख हनुमंत भूकन, विस्ताराधिकारी निलकंठ बोरुडे, अधिकारी कुसुमकुमारी कानडी मॅडम व सर्व पालकांचेही कौतुक करण्यात आले.

# पवार पब्लिक स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा

**हिंगोली : (समर्थ गांवकरी)**



भारतात दरवर्षी २८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिवस हा चंद्रशेखर वेंकट रामन यांच्या सन्मानार्थ साजरा केला जातो. विज्ञानाच्या फायद्यांबद्दल समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि वैज्ञानिक वृत्ती निर्माण करण्यासाठी दि. २८-०२-२०२६ रोजी पवार पब्लिक स्कूल हिंगोली येथील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे प्रोजेक्ट, मॉडेल आणि विविध विज्ञान प्रदर्शन सादर करून हा दिवस साजरा करण्यात आला.

याप्रसंगी पवार पब्लिक स्कूलचे सर्वेसर्वा प्रणव शिवाजीराव पवार यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले. याप्रसंगी कोमल अग्रवाल, फिजा सय्यद, के सी सोली, सचिन धामणे, अपर्णा मुळे, दिपाली राऊत, अश्विनी सराफ, दिपाली मुदिराज, छाया धनवे, रुपाली ठाकरे, गजानन वानरे, योगेश थोरात, पंकज इंगोले, जोबिन जॉर्ज, सचिन इंगोले, कपिल मस्के, संतोष पाईकराव, विकास महानुर, वैभव काळे आदींची उपस्थिती होती.

# दिव्यात भव्य शिवजन्मोत्सव सोहळा संपन्न




**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

दिवा शहर शिवसेना तिसाई नगर शाखा आयोजित तिथीनुसार भव्य शिवजन्म सोहळा साजरा करण्यात आला. शिवसेनेचे दिवा शहरप्रमुख व माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या मार्गदर्शनाखाली फाल्गुन कृष्ण ३ शके १९४५ गुरुवार दिनांक ६ मार्च २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या रयतेच्या उपस्थितीमध्ये तिथी नुसार शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ६ ते ८ शिवज्योत आगमन, स्वराज्य प्रतिष्ठान, सकाळी ९ वाजता छत्रपती शिवाजी महाराज मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली तर शालेय विद्यार्थ्यांना वस्तू वाटप करून सायंकाळीं ६ ते ७ दरम्यान सोमजाई भजन मंडळ, दिवा यांचे भजन कीर्तन आयोजन करण्यात आले होते. वकृतुंड म्युझिकल ग्रुप दिवा यांचा सुस्वर गीत व चोपड्याचा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला आयोजक व शिवसेनेचे तीसाई शाखाप्रमुख निलेश रोहिदास म्हात्रे यांनी यावेळी बोलताना स्पष्ट सागितले. प्रसंगी दिवा शहरातील सर्व नगरसेवक/नगरसेविका, शेकडो शिवप्रेमीनी आपली उपस्थिती दर्शविली.

# वेतन न मिळाल्याने हंगामी कर्मचारी संपावर, जनजीवन विस्कळीत

**डांग-गुजरात : (समर्थ गांवकरी)**



डांग जिल्ह्यातील सुबीर तालुक्यातील दुर्गम गावांमध्ये गेल्या काही दिवसांपासून पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. सुबीर तालुक्यातील कांगर्यामाळ (बरडा फलिया, भेद फलिया) आणि जारसोल गावांमध्ये पाणीपुरवठा पूर्णपणे बंद झाल्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

या प्रकरणी आज सोशलिस्ट युनिटी सेंटर ऑफ इंडिया (कम्युनिस्ट) म्हणजेच SUCI (C) च्या डांग जिल्हा संघटन समितीने सुबीर येथील मामलतदारांना लेखी निवेदन देऊन तातडीने तोडगा काढण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, जारसोल पाणीपुरवठा योजनेअंतर्गत या गावांना पिण्याचे पाणी पुरवले जात होते. मात्र या योजनेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना मागील दोन महिन्यांपासून मासिक वेतन व भत्ते देण्यात आलेले नाहीत. योग्य वेतनाच्या मागणीसाठी हे कर्मचारी मागील चार ते पाच दिवसांपासून संपावर गेले आहेत. त्यामुळे पाणीपुरवठा पूर्णपणे ठप्प झाला आहे. पाणीअभावी केवळ माणसेच नव्हे तर मुक्या जनावरांचीही अवस्था दयनीय झाली आहे. उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच एवढी मोठी पाणीटंचाई निर्माण झाल्यामुळे ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. जारसोल आणि कांगर्यामाळ येथील विविध फलियांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र कमतरता जाणवत आहे.

सध्या SUCI (C) चे नेते रघुनाथ बागुल, रामदास पवार आणि शिवदास पवार यांनी दिलेल्या निवेदनात पाणीपुरवठा योजनेतील हंगामी कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ करून त्यांचा आंदोलनाचा मार्ग काढावा, तसेच मागील दोन महिन्यांचे थकीत वेतन तात्काळ अदा करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच ग्रामस्थांना तातडीने पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी किंवा संप मागे घेऊन पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

संघटनेने स्पष्ट केले आहे की ते पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांच्या संपाला आणि त्यांच्या योग्य मागण्यांना पूर्ण पाठिंबा देत आहेत. हा प्रश्न केवळ प्रशासकीय नसून मानवी जीवनाशी निगडित असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

जर तात्काळ पाणीपुरवठ्याची व्यवस्था केली नाही, तर येत्या काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. आता प्रशासन या गंभीर प्रश्नावर किती वेगाने उपाययोजना करते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# चिमुकल्यांच्या रंगतदातर सादरीकरणाने रंगले व्हिजन ई-टेक्नोचे स्नेहसंमेलन

**भोकर : (समर्थ गांवकरी)**



दि. २८ फेब्रुवारी रोजी येथील गणराज मंगल कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सेवाभावी संस्था पिंपळढव संचलित व्हिजन ई-टेक्नो स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन थाटात पार पडले. यावेळी अवघ्या ३ ते ५ वर्षांच्या चिमुकल्यांनी आत्मविश्वासाने रंगमंच गाजवत उपस्थितांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष भगवानराव दंडवे,प्रमुख मार्गदर्शक म्हणून गटशिक्षणाधिकारी किशनराव फोले तर प्रमुख अतिथी सौ सुमित्रा साळुंखे,प्राचार्य ए. एस. जाधव, बौद्ध महासभेचे ता. अध्यक्ष सुरेश जोंधळे यांच्यासह नगरसेवक राजेश्वर देशमुख, बालाजी पाटील गौड, गौतम अण्णा कसबे, संदीप गौड, गणेश बोलेवार,गटनेते विठ्ठल धोंडगे, सिद्देश्वर पिटलेवाड, विकास क्षीरसागर, आदींनी हजेरी लावली होती. मराठीसह , हिंदी, तेलगू भाषेतील प्रसिद्ध सुरेल गीतावरील गीतावरील नाजूक पावलांची तालबद्ध हालचाल, गोंडस हावभावासह केलेले सादरीकरण यामुळे सभागृहात आनंदाचे तरंग पसरले. सर्वच चिमुकल्यांनी जबरदस्त कला सादर केली त्यात त्रिशा महानाम गायकवाड हिने 'लटके... झटके... मै कोल्हापूर से आयी हुं ' या गाण्यावर सादर केलेली लावणी विशेष आकर्षण ठरली. तिच्या खुमासदार अदाकारीने प्रेक्षकांना टाळ्यांचा वर्षाव करायला भाग पाडले. सृष्टी जोंधळे, गायत्री मुरकुटे, ईश्वरी गोणेकर या विद्यार्थिनींनी छत्रपती "शिवराय यांच्या "आम्ही शिवकन्या",'दैवत छत्रपती.. आमचे दैवत छत्रपती ' व बाबासाहेबां वरील आकाशातील तारा माझ्या बापाचा देश सारा या लोकप्रिय गीतांवर सादर केलेल्या नृत्याने उपस्थितांच्या टाळ्या मिळवल्या तर रिंकू गौतम कावळेच्या धमाकेदार सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संचालक देविदास पुंडलिक जाधव, प्रणिता जाधव यांच्या प्रेरणेतून आणि प्राचार्या श्रद्धा जाधव यांच्या नेतृत्वाखाली साकारलेल्या या सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाचे नवे पंख लाभले. पालकांनीही मुलांच्या सादरीकरणाचे भरभरून कौतुक करत समाधान व्यक्त केले.कार्यक्रमाच्या देखण्या नियोजनाबद्दल उद्योजक तथा समाजसेवक बालाजी पाटील गौड यांनी आयोजक देविदास जाधव आणि सतीश जाधव यांचे विशेष कौतुक करीत स्वागत केले. तर संस्थेच्या वतीने शाळेतील शिक्षिका रजिता श्रीहरी सलावाड, वैशाली बालाजी सूर्यवंशी, रमा हनवते यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक आर के कदम यांनी केले सूत्रसंचालन आदर्श शिक्षक जे डी वाघमारे, डॉ. महेंद्र कांबळे यांनी केले तर आभार सतीश जाधव यांनी मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# बनावट खत-कीटकनाशक बनविणाऱ्यांवर कारवाई करा

## आमदार काशिनाथ दाते सर

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आणि त्यांच्या उत्पादनाच्या सुरक्षिततेसाठी सातत्याने आग्रही भूमिका मांडत असलेल्या पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सरांनी काल पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या हिताचा प्रश्न थेट विधानसभेत मांडत सातारा जिल्ह्यातील बनावट रासायनिक खते व कीटकनाशके तयार करणाऱ्या कारखान्यांच्या प्रकरणावर सरकारचे लक्ष वेधले. सध्या सुरू असलेल्या २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्यांनी हा प्रश्न उपस्थित करत शासनाकडून सविस्तर माहिती मागवली. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या अशा प्रकारांवर कठोर कारवाई व्हावी, अशी आग्रही मागणीही त्यांनी यावेळी केली. आमदार दाते सरांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना संबंधित विभागाचे मंत्री नामदार दत्तामामा भरणे यांनी सांगितले की, सातारा जिल्ह्यातील वडूज (ता. खटाव) परिसरात कृषी विभाग व स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या संयुक्त कारवाईत बनावट रासायनिक खते व कीटकनाशके जप्त करण्यात आली आहेत. तपासादरम्यान मोठ्या प्रमाणावर बनावट खतांची साठवण आढळून आली असून त्याची किंमत लाखो रुपयांमध्ये असल्याचे स्पष्ट झाले आहे. याशिवाय जिल्हास्तरीय भरारी पथक आणि कृषी विभागाने संयुक्त तपास सुरू ठेवला असून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर पावले उचलली जात असल्याचे शासनाने स्पष्ट केले. दरम्यान, शेतकऱ्यांना निकृष्ट व बनावट खतांपासून संरक्षण मिळावे, यासाठी अशा प्रकरणांवर कठोर कारवाई होणे आवश्यक असल्याचे आमदार काशिनाथ दाते यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आणि त्यांच्या उत्पादनाच्या सुरक्षिततेसाठी शासनाने अधिक सतर्कता बाळगावी, अशी मागणीही त्यांनी यावेळी विधानसभेत केली.




> या कारवाईत विविध नामांकित कंपन्यांच्या नावाने बनावट पिशव्यांमध्ये खते भरून विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचेही निदर्शनास आले, संबंधित साठा जप्त करण्यात आला असून या प्रकरणी संबंधित संस्था, पुरवठादार आणि मालकांविरोधात कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, खते नियंत्रण आदेश १९८५ तसेच आवश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.
>
> **- ना. दत्ता मामा भरणे, कृषीमंत्री**

# संत तुकाराम महाराज बीज सोहळा उत्साहात संपन्न

- अभंगातून अंधश्रद्धेविरोधी संदेश
- हरिपाठ, पालखी सोहळा व जागर भजनाने परिसर दुमदुमला

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

भिवंडी तालुक्यातील खालिंग बु., पडघा येथे दि. ५ मार्च २०२६ रोजी संत तुकाराम महाराज बीज सोहळा दरवर्षीप्रमाणे मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. पहाटेपासूनच गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. यावेळी ह.भ.प. सुभाष महाराज तरणे यांनी संत तुकाराम महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या अभंगांमधून समाजप्रबोधनाचा संदेश दिला. अभंगांद्वारे अंधश्रद्धा, भोंदूगिरी आणि सामाजिक विकृतींवर प्रहार करत समाज सुशिक्षित आणि विज्ञानवादी होणे काळाची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. त्यांच्या प्रवचनाला उपस्थित वारकरी आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सोहळ्यात हरिपाठ, पालखी सोहळा, नामवंत महाराजांचे कीर्तन तसेच जागर भजन असे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि "ज्ञानोबा-तुकोबा"च्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. या कार्यक्रमास खालिंग ग्रामपंचायतीचे सरपंच राजाराम शेलार, राकेश शेलार, माजी सरपंच अशोक शेलार, माजी उपसरपंच भरत शेलार, संदिप शेलार, मोहन शेलार, अनंत शेलार तसेच पंचक्रोशीतील वारकरी संप्रदायातील अनेक भाविक आणि महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. भक्ती, समाजप्रबोधन आणि एकात्मतेचा संदेश देणारा हा बीज सोहळा खालिंग बु. परिसरात उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाला.



# वीज कनेक्शनसाठी धामणीत शेतकरी रडला

## "सोलर नको, शेती वाचवायला वीज द्या"

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

"शेतकऱ्याने काय पाप केले आहे? आम्हाला सौर पॅनल नको, आम्हाला वीज कनेक्शन द्या...!" असा आर्त सवाल करत आंबेगाव तालुक्यातील धामणी येथील शेतकरी आमरण उपोषणाला बसले असून, पिके वाचवण्यासाठी शासनाने तातडीने वीज कनेक्शन द्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. शासन सौर पंपाचा आग्रह धरत असताना, "सौर पंपातून पाण्याला आवश्यक तो दाब मिळत नाही; वीज कनेक्शन मिळाले तरच शेती वाचेल," अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे.

धामणी व परिसरातील शेतकरी गेल्या काही दिवसांपासून वीज कनेक्शनसाठी प्रशासनाच्या दारात हेलपाटे मारत आहेत. मात्र त्यांच्या मागणीऐवजी सौर पंप घ्यावा, असा आग्रह होत असल्याने संतप्त शेतकऱ्यांनी अखेर आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे.

"मायबाप सरकार, आम्ही पदरमोड करून बायकोचे दागिने गहाण ठेवून पाण्याच्या लाईनचे काम केले. आता आमची पिके जळून चालली आहेत. टोमॅटो आणि मिरचीची रोपे आणून ठेवली आहेत; पण पाणीच मिळत नाही. तुम्ही आमचा अंत का पाहता?" असे म्हणत शेतकरी बाळासाहेब जाधव यांना अश्रू अनावर झाले. "हे आंदोलन मोबाईल किंवा टीव्हीवर दिसण्यासाठी नाही; आमच्या पोटासाठी आहे," अशी वेदनाही त्यांनी व्यक्त केली.

धामणीतील अनेक शेतकऱ्यांनी पाणी योजनेसाठी मोठा खर्च केला आहे. मात्र वीज कनेक्शन नसल्याने पाणी पिकांपर्यंत पोहोचत नाही आणि शेती करपण्याच्या मार्गावर आहे. "सौर पंपाच्या लाईटवर उच्च दाबाने पाणी मिळत नाही; वीज कनेक्शन मिळाले तरच पिके वाचतील," अशी आंदोलकांची भूमिका आहे.

दरम्यान, या प्रश्नावर स्थानिक लोकप्रतिनिधींवरही ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला. खासदार अमोल कोल्हे, आमदार दिलीप वळसे पाटील तसेच माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील यांनी तातडीने या आंदोलनाची दखल घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. "निवडणुकीच्या वेळी आम्हीच तुमच्या मागे उभे राहिलो होतो; आता आमच्या अडचणीच्या वेळी तुम्ही कुठे आहात?" असा सवाल आंदोलकांनी उपस्थित केला.

# उद्योजकाचे यशस्विनी प्रदर्शन

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर येथील स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळ संचलित महिला मंडळाच्या वतीने महिला दिनानिमित्त महिला उद्योजकता वाढविण्यासाठी व महिला सक्षमीकरणासाठी आज दि ७ मार्च दिल्लीगेट पटांगण अहिल्यानगर येथे यशस्विनी २०२६ प्रदर्शन आयोजित केले असून त्यात शहरासह जिल्ह्यातील ४५ महिलांचे स्टोल आहेत. प्रदर्शनाचे उदघाटन सकाळी १० वा महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते होणार असून यावेळी अध्यक्षस्थानी आमदार संग्रामभैय्या जगताप असणार असून प्रमुख उपस्थिती पाहुणे म्हणून उपमहौपर धनंजय जाधव ,धनश्रीताई विखे पा.अध्यक्ष,रणरागिणी महिला मंडळ, महावीर ग्रुपचे संचालक राजुशेठ भंडारी,मनपा स्थायी समितीचे सदस्य सुरेश बनसोडे उपस्थित राहणार आहेत.

# उपविभागीय अधिकाऱ्याचा वाळू माफियांना दणका

- महसूल पथकाची धडाकेबाज कारवाई
- उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे यांच्या नेतृत्वाखाली दोन हायवा जप्त

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील मौ. नागणी, माचनूर यामार्गे अवैधरित्या वाळूची वाहतूक करणाऱ्या टोळ्यांवर महसूल विभागाने सर्जिकल स्ट्राईक केला आहे. उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे व महसूल पथकाने धाडसी कारवाई करत वाळूची चोरटी वाहतूक करणाऱ्या दोन हायवा पकडल्या आहे. यामुळे अवैद्यरित्या वाहतुक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात आल्याने वाळू माफियांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.सदर वाहन पुढील कारवाईसाठी कुंडलवाडी पोलीस ठाण्यात लावण्यात आली आहे. दि. ६ मार्च रोजी सकाळी ८ वाजता मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल पथकाने नागणी, माचनूर परिसरात सापळा रचला होता. यावेळी अवैधरित्या वाळूची वाहतूक करणाऱ्या केए २२ एए ६३०६ व एमएच २० इएल २२१६ या क्रमांकच्या दोन हायवा पथकाने शिताफीने पकडून वाहनाची चौकशी केली असता सदर हायवा वाहतूक दाराकडे रेतीची कोणतीही इन्व्हाइस व कसलीही पावती आढळून आली नसल्याकारणाने ही दोन्ही वाहाने पकडून पुढील कारवाईसाठी कुंडलवाडी पोलीस ठाण्यात लावण्यात आली. हे कारवाई स्वतः उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे,महसूल अधिकारी पवन ठक्करोड,सचिन आरु यांनी केली आहे.अवैधरित्या रेतीची वाहतुक करणाऱ्या वाहनावर कारवाई करण्यात आल्याने अवैध रेती उत्खनन करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.या कारवाईमुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवणाऱ्या टोळ्यांना चाप बसणार आहे.



# महाराजांचा पराक्रमाचा इतिहास तरुणांना प्रेरणादायी - सचिन जगताप

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य केले. स्वराज्य निर्माण केले.

छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रमाचा इतिहास हा तरुणांना प्रेरणा देणारा आहे.अ.भा.महात्मा फुले समता परिषदेचे कार्य कौतुकास्पद आहे.असे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप यांनी केले. ताठे मळा येथील महालक्ष्मी गार्डन येथे अ.भा. महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली.यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी माजी उपमहापौर अनिल बोरुडे,माजी नगरसेवक दगडू मामा पवार,विलास ताठे, स्विकृत नगरसेवक रेवणनाथ पवार,अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष ब्रिजेश ताठे,फुले ब्रिगेडचे अध्यक्ष दिपक खेडकर ,सकल माळी समाजाचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ,सचिव राजेंद्र पडोळे,विश्वस्त डॉ.रणजीत सत्रे,विनोद पुंड,अनिल इवळे,अमोल भांबरकर, बाबासाहेब दळवी, रामदास फुले,ऋषिकेश ताठे संजय भुतकर निलेश सत्रे मनोज ताठे,अक्षय भगत

निखिल ताठे,अतुल पडोळे, अनुराग पडोळे,शरद जाधव, स्वप्निल पडोळे,विश्वास शिंदे,महेश शेळके ,प्रशांत ताठे,भाऊसाहेब भगत,अविनाश ताठे,भाऊसाहेब शिंदे,स्वप्निल मुसळे, सचिन ताठे, प्रदीप ताठे ,योगेश ताठे,शैलेश सत्रे,अरुण शिंदे , आप्पासाहेब पडोळे,आविष भगत,ओंकार भोसले, ऋतिक सुडके, भैय्या बोरुडे, महेश भुजबळ , कान्हा भुतकर, शुभम दळवी,मंगेश ताठे,ओंकार ताठे,सुरज ताठे,आकाश डागवाले ,मोरे पाटील आदी उपस्थित होते.




अ.भा.महात्मा फुले समता परिषदेच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन

# माविआ आणि महायुतीकडे मागणी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

भाजप प्रदेश उपाध्यक्ष माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीबाबत तारखांची घोषणा करत मविआ आणि महायुतीकडे मोठी मागणी केली. या दोन्ही जागा बिनविरोध व्हावेत, यासाठी दोन्ही बाजूने सामंजस्याने भूमिका घ्यावी, आपण त्यासाठी सर्वोपरी सहकार्याची भूमिका घेऊ, असे विखे पाटील यांनी म्हटले. बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीची दहा ते १२ मार्चमध्ये घोषणा होईल, असे सुजय विखे पाटील यांनी सांगितले. बंगाल, तामिळनाडू, केरळ, पाँडिचेरी आणि आसाम या पाच राज्याच्या निवडणुकीबरोबर महाराष्ट्रातील पोट निवडणुका लागण्याची दाट शक्यता आहे. महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी या दोन ठिकाणी पोटनिवडणूक होईल.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती तिथीनुसार उत्साहात साजरी



**किनवट : (समर्थ गांवकरी)**

किनवट शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, किनवट यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती तिथीनुसार मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शिवप्रतिष्ठानचे धारकरी स्वयंसेवक तसेच शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून करण्यात आली. यानंतर उपस्थित शिवभक्तांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची, स्वराज्य स्थापनेची आणि त्यांच्या आदर्श विचारांची आठवण करून देत घोषणाबाजी केली. संपूर्ण परिसरात "छत्रपती शिवाजी महाराज की जय" या जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले. यावेळी शिवप्रतिष्ठानच्या धारकरी स्वयंसेवकांनी पारंपरिक वेशभूषेत उपस्थित राहून महाराजांप्रती आपली निष्ठा व्यक्त केली. शिवाजी महाराजांचे विचार समाजातील युवकांनी आत्मसात करून राष्ट्रभक्ती, स्वाभिमान आणि सामाजिक बांधिलकी जोपासावी, असा संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रमाला शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे पदाधिकारी, धारकरी स्वयंसेवक, शिवभक्त तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

# गितांजली गुरसाळे सीए फायनल परीक्षेत उत्तीर्ण

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

कु.गितांजली नंदकुमार गुरसाळे हि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टड अकाउंटंट ऑफ इंडिया आयोजित सीए परीक्षेत उत्तीर्ण झाली. डाळमंडई,आडते बाजार येथील संतोषी पुष्प भांडार चे संचालक श्री.नंदकुमार सुभाष गुरसाळे व सौ.संगीता नंदकुमार गुरसाळे यांची ती कन्या आहे. हार व फुलांचा व्यवसाय करून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी मुलीचे शिक्षण केले आहे.अत्यंत जिद्दीने परिश्रम घेऊन गितांजली गुरसाळे हिने सीए परीक्षेत यश मिळविले आहे. या प्रवासाच्या सुरुवातीस तिला सी ए पवनकुमार दरक यांचे मारगदर्शन लाभले. गितांजली ला के एस एस अँड कंपनीचे सीए कुषल व्हिज्जन यांचे सहकार्य लाभले आहे.तसेच आजी श्रीमती रत्नमाला गुरसाळे यांचे आशीर्वाद लाभले. सीए परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल गितांजली गुरसाळे यांचे श्री संताजी नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन हरिभाऊ डोळसे, व्हाईस चेअरमन सौ.मीरा हरिभाऊ डोळसे, जब्बार शेख,कै.श्रीपती वाळके गुरुजी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रमोद वाळके,पवन साळुंके,विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर आदींनी अभिनंदन केले आहे.



# नायगाव तहसीलमध्ये 'बोगस' कर्मचाऱ्याचा आठ वर्षांचा कारभार उघड

## अधिकाऱ्यांची तात्काळ कारवाई; पुरवठा विभागातील कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात एक खाजगी व्यक्ती तब्बल आठ वर्षे शासकीय कर्मचारी म्हणून काम करत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणामुळे महसूल प्रशासनात मोठी खळबळ उडाली असून शिवसेना शहरप्रमुख गजानन पाटील तमलुरे यांनी केलेल्या तक्रारीनंतर एएसआय अधिकारी अनन्या रेड्डी यांनी तत्काळ कारवाई करत संबंधित व्यक्तीला तहसील कार्यालयातून हद्दपार करण्याचे आदेश दिले. मिळालेल्या माहितीनुसार यश सोनकांबळे या व्यक्तीची सुमारे आठ वर्षांपूर्वी केवळ तीन महिन्यांसाठी ई-मशीन ऑपरेटर म्हणून तात्पुरती नियुक्ती करण्यात आली होती. मात्र त्यानंतर कोणतेही अधिकृत नियुक्तीपत्र नसताना तो पुरवठा विभागातच कार्यरत राहिला. नवीन रेशनकार्ड काढणे, रेशनकार्ड दुरुस्ती करणे तसेच विभागातील नोंदी हाताळणे यांसारखी महत्त्वाची कामे तो शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे करत असल्याची बाब समोर आली आहे.



पुरवठा विभागातील काही आर्थिक व्यवहारही त्याच्याकडूनच हाताळले जात असल्याची माहिती पुढे आली असून त्यामुळे तो बोगस असतानाही विभागातील 'आवडता कर्मचारी' म्हणून वावरत असल्याची चर्चा नागरिकांत रंगली आहे. दरम्यान, रेशनकार्ड दुरुस्तीच्या कामासाठी लाच मागितल्याच्या तक्रारी नागरिकांकडून पुढे आल्याने हा प्रकार उघडकीस आला. शिवसेना शहरप्रमुख गजानन तमलुरे यांनी एएसआय अधिकारी अनन्या रेड्डी यांची भेट घेऊन तक्रार केल्यानंतर त्यांनी चौकशी करून सोनकांबळे यास तात्काळ तहसील कार्यालयातून बाहेर काढण्याचे आदेश दिले. पुढे तो कार्यालयात आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. तहसील कार्यालयात तब्बल आठ वर्षे खाजगी व्यक्ती शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे काम करत असताना तत्कालीन तहसीलदार व पुरवठा विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष का केले, असा सवाल उपस्थित होत आहे. या काळात झालेल्या आर्थिक व्यवहारांची चौकशी होणार का, तसेच या प्रकरणात कोणाचे संगनमत आहे का, याबाबत नागरिकांत चर्चा सुरू झाली आहे.

या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताचेही आरोप पुढे येत असून पुरवठा विभागातील कारभाराबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. आता जिल्हाधिकारी स्तरावरून या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी होऊन दोषींवर कारवाई होणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. नायगाव तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात बोगस कर्मचारी काम करत असल्याचा प्रकार उघड झाल्यानंतर रजेवर गेलेल्या तहसीलदार गायकवाड मॅडम यांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. पुरवठा विभागातील महत्त्वाच्या कामकाजावर खाजगी व्यक्तीचा प्रभाव कसा राहिला, तसेच त्याला इतक्या वर्षे कार्यालयात वावरू कसे देण्यात आले, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. शिवाय तहसील तसेच पंचायत समिती कार्यालयातही काही खाजगी व्यक्ती कारभारी बनल्याची चर्चा उघडपणे होत आहे.

काही नागरिकांनी असा आरोपही केला आहे की, तहसील कार्यालयातील काही महत्त्वाच्या टेबलांचा पदभार आपल्या मर्जीतील व सोयीच्या व्यक्तींनाच देण्यात आला होता. त्यामुळेच अशा प्रकारांना खतपाणी मिळाले का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे, तहसीलदार गायकवाड मॅडम रजेवर जाण्यापूर्वी त्यांच्या अधिकृत वाहनात एका वाळू माफियाशी संबंधित व्यक्ती ड्रायव्हरच्या शेजारी समोरच्या सीटवर बसत असल्याची चर्चा परिसरात रंगली होती. मात्र तात्पुरत्या स्वरूपात तहसीलदार पदाचा कार्यभार सांभाळणाऱ्या रेड्डी मॅडम यांच्या कार्यकाळात हा प्रकार बंद झाल्याचेही सांगितले जात आहे. अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे पुरवठा विभागाच्या गोदामाचा कारभार ज्यांच्याकडे आहे ते कर्मचारी नांदेड येथील एका प्रकरणात अडकलेले असून त्यांच्या संदर्भात चौकशी सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. अशा परिस्थितीत महत्त्वाचा पदभार देऊ नये, असा नियम असतानाही रसद पुरवठ्याचे काम त्यांच्याकडेच सोपविण्यात आल्याची चर्चा आहे. या प्रकरणात एएसआय अधिकारी अनन्या रेड्डी काय निर्णय घेणार, याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ब्लेंडर्स प्राईड पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरची 'द वन अँड ओन्ली' मोहिम

**वेगळेपणातच यशाची ताकद**




**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

ब्लेंडर्स प्राईड पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने यश आणि वेगळेपण साजरे करणारी 'द वन अँड ओन्ली' ही नवी मोहिम सादर केली आहे. या मोहिमेद्वारे गर्दीतही स्वतःच्या आत्मविश्वास, स्टाईल आणि व्यक्तिमत्त्वामुळे वेगळेपण जपणाऱ्या व्यक्तींची ओळख अधोरेखित करण्यात आली आहे.

आजच्या स्पर्धात्मक जगात यशाची अनेक चिन्हे दिसतात; मात्र खरे यश हे स्वतःच्या वेगळ्या ओळखीमध्ये आणि प्रभावी व्यक्तिमत्त्वात असल्याचा संदेश या मोहिमेतून देण्यात आला आहे. एखादी व्यक्ती आपल्या दमदार उपस्थितीमुळे आणि हटके शैलीमुळे सर्वांवर छाप पाडते, हा विचार या कॅम्पेनचा केंद्रबिंदू आहे. या मोहिमेत अवंती नगराथ, किरणदीप चहल आणि माहिका शर्मा हे तीन चेहरे ब्रँडच्या वेगवेगळ्या व्यक्तिमत्त्वांचे प्रतिनिधित्व करतात. अवंती तिच्या बिनधास्त आत्मविश्वास आणि स्वतंत्र शैलीसाठी ओळखली जाते, तर किरणदीप तिच्या प्रभावी उपस्थिती आणि आकर्षणामुळे लक्ष वेधून घेते. माहिका तिच्या शांत, रॉयल व्यक्तिमत्त्वामुळे वेगळेपणाची छाप पाडते. ब्लेंडर्स प्राईडने फॅशन, नवकल्पना आणि सांस्कृतिक नेतृत्वाच्या माध्यमातून भारतीय आधुनिक संस्कृतीत वेगळे स्थान निर्माण केले आहे. 'द वन अँड ओन्ली' मोहिमेद्वारे ब्रँड नव्या पिढीशी संवाद साधत असून केवळ ओळख मिळवण्यापेक्षा प्रभाव निर्माण करण्यावर भर देत आहे.

ही ३६०-डिग्री इंटिग्रेटेड मोहिम डिजिटल आणि सोशल मीडियासह विविध माध्यमांवर सुरू करण्यात आली आहे. तसेच आयसीसी टी-२० विश्वचषकादरम्यान जाहिराती, प्रमुख वृत्तपत्रांतील मुख्य पानावरील जाहिराती आणि मोठ्या शहरांमधील बाह्य जाहिरात फलकांद्वारेही ती प्रेक्षकांपर्यंत पोहोचवली जात आहे. पर्नोड रिकार्ड इंडियाच्या मुख्य विपणन अधिकारी देबश्री दासगुप्ता म्हणाल्या, "ब्लेंडर्स प्राईड नेहमीच स्टाईल आणि प्रतिष्ठेसह यशाच्या ताकदीवर विश्वास ठेवतो. 'द वन अँड ओन्ली' ही मोहिम वेगळेपणाच्या माध्यमातून यशाची नवी व्याख्या मांडते. आजची तरुण पिढी केवळ यशस्वी होण्यावर नाही, तर आत्मविश्वासाने स्वतःची ओळख निर्माण करण्यावर भर देते." नव्या मोहिमेची फिल्म आणि अधिक माहिती YouTube आणि ब्लेंडर्स प्राईड फॅशन दूरच्या अधिकृत सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे.

*ठाणे मनपाकडून 'जागतिक महिला दिना' निमित्त*

# महिलांसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

8 मार्च या जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ठाणे महागनगरपालिकेच्या महिला व बालविकास विभागाच्यावतीने रांगोळी स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, निबंध स्पर्धा तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

उद्या शनिवार दिनांक 7 मार्च 2026 रोजी सकाळी 11 ते दुपारी 4 या वेळेत ठाणे महानगरपालिका मुख्यालय येथे रांगोळी, मेहंदी स्पर्धा होणार असून याचे उद्घाटन महापौ शनिवार 7 मार्च 2026 रोजी ठाणे महापालिकेच्या सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र मध्ये महिलांकरिता विशेष आरोग्य शिबिर आयोजित केले आहे. या शिबिरात महिलांची हिमोग्लोबिन तपासणी, रक्त शर्करा व रक्तदाब तपासणी तसेच तज्ञां मार्फत महिला आरोग्यविषयक समुपदेशन करण्यात येणार आहे. रविवार दिनांक 8 मार्च 2026 रोजी ठाणे महानगरपालिका आणि 'आम्ही सायकलप्रेमी फाऊंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी 'सायकल रॅली'चे आयोजन करण्यात आले आहे.

ठाणे महापालिका भवन येथून या सायकल रॅलीला प्रारंभ होणार असून साडे तीन किलोमीटर व साडेसहा कि.मीची ही सायकल रॅली असणार आहे. रॅलीनंतर महापालिकेच्या कै.

नरेंद्र बल्लाळ सभागृहात महिलांची वेशभूषा स्पर्धा, सायकल सजावट स्पर्धा, उखाणा स्पर्धा होणार आहेत. तसेच यावेळी सायकलिस्ट मंगला पै यांना रणरागिनी जीवनगौरव पुरस्कार आम्ही सायकलप्रेमी फाऊंडेशनच्यावतीने दिला जाणार आहे. राम गणेश गडकरी रंगायतन येथे 9 मार्च रोजी सकाळी 10.00 वा. समाज विकास विभागाच्या महिला व बालकल्याण विभाग अंतर्गत महिलांना विविध योजनांतर्गत देण्यात येणाऱ्या लाभार्थी प्रमाणपत्राचे प्रातिनिधीक स्वरुपात वाटप महापौर शर्मिला पिंपळोलकर, उपमहापौर कृष्णा पाटील व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तसेच महापालिकेतर्फे घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण देखील यावेळी करण्यात येणार आहे. तद्नंतर ठाणे महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच 9 मार्च रोजी गडकरी रंगायतन येथे देखील वैद्यकीय शिबिराचे आयोजन व मॅमोग्राफी व्हॅन उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

# कोपरखैरणेतील विद्या भवन सोसायटीत स्लॅब कोसळून विद्यार्थ्याचा मृत्यू!

**वाशी : (समर्थ गांवकरी)**

नवी मुंबईतील कोपरखैरणे सेक्टर २, प्लॉट क्रमांक १२ येथील विद्या भवन सोसायटीमध्ये गुरुवारी सायंकाळी सुमारे ५.२० वाजण्याच्या सुमारास धक्कादायक घटना घडली. तळमजल्यावर घरगुती शिकवणी सुरू असताना पहिल्या मजल्यावरील स्लॅब अचानक कोसळल्याने एक १४ वर्षीय विद्यार्थी मृत्युमुखी पडला, तर १२ विद्यार्थी आणि एक शिक्षिका यांना अग्निशमन दलाने सुरक्षित बाहेर काढले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शिकवणी सुरू असताना अचानक पहिल्या मजल्यावरील स्लॅब कोसळून मोठा ढिगारा खाली पडला. त्या वेळी शिकवणीला आलेले विद्यार्थी आणि शिक्षिका ढिगाऱ्याखाली अडकले. घटनेची माहिती मिळताच वाशी, कोपरखैरणे आणि ऐरोली येथील अग्निशमन दलाच्या गाड्या तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशमन दलाने तातडीने बचावकार्य सुरू करून ढिगाऱ्याखाली अडकलेल्या विद्यार्थ्यांना बाहेर काढले. बचावकार्यादरम्यान एकूण १२ विद्यार्थी व एक शिक्षिका अशा १३ जणांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. जखमी झालेल्या चार ते पाच विद्यार्थ्यांना प्राथमिक उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र गंभीर जखमी झालेल्या मनीष मसे (वय १४) या विद्यार्थ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती वाशी महानगरपालिका रुग्णालय प्रशासनाकडून देण्यात आली आहे. रेस्क्यू करण्यात आलेल्यांमध्ये सिद्धांत गुप्ता (वय ८), प्रिन्स सोनी (वय ११), आयशा कुसुम (वय १५), निष्का धनवाडे (वय १४), मनीष मसे (वय १४), आराध्या बोडसे (वय १४), तन्वी श्रीवास्तव (वय ७), देवांश पुजारी (वय १२), राजदीप वानखेडे (वय १०), पार्थ खैरनार (वय १४), रुद्र येलूरकर (वय ५) आणि शिक्षिका शामली चौधरी (वय ५३) यांचा समावेश आहे. दरम्यान, स्लॅब कोसळण्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून संबंधित प्रशासनाकडून घटनेची चौकशी सुरू करण्यात आली आहे.

# एअरटेल फाउंडेशन-CK-12चा AI उपक्रम

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

भारती एअरटेल फाउंडेशनने जागतिक ना-नफा संस्था CK-12 फाउंडेशनच्या सहकार्याने भारतातील शिक्षक सक्षमीकरणासाठी मोठा AI-आधारित उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत TheTeacherApp या डिजिटल व्यासपीठात ४५हून अधिक AI-सक्षम अध्यापन साधनांचे एकत्रीकरण करण्यात आले आहे. देशभरातील २ लाखांहून अधिक शिक्षक सध्या या ॲपचा वापर करत आहेत. K–12 स्तरावरील सर्व शिक्षकांसाठी उपलब्ध असलेले TheTeacherApp हे आयुष्यभर मोफत डिजिटल शिक्षण व्यासपीठ असून, AI तंत्रज्ञानाच्या मदतीने शिक्षकांच्या दैनंदिन अध्यापन प्रक्रियेला अधिक प्रभावी बनवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

*महिलांच्या खुल्या कबड्डी स्पर्धाचे आयोजन,जागतिक महिला दिन निमित्त*

# कोरो इंडिया व विविध सामाजिक संस्था, एकल महिला संघटनेचा पुढाकार

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

कोरो इंडिया व विविध सामाजिक संस्था,एकल महिला संघटनेच्या पुढाकारातून जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सिडको येथील इंदिरा गांधी महाविद्यालय ग्राऊड वर दि.०७ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता या स्पर्धेचे उद्घाटन केले जाणार आहे.

०८ मार्च जागतिक महिला दिना निमित्त ग्रासरूट नेतृत्व आणि संस्था विकास कार्यक्रमांतर्गत मराठवाडा विभागस्तरीय खुल्या कबड्डी स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. लैंगिक समानतेचा संदेश गावोगावी पोहोचला जावा. महिला नेतृत्व पुढे येण्याची संधी मिळावी.लैंगिक अत्याचारा विरोधी जनजागृतीसाठी स्पर्धेच्या ठिकाणी समुपदेशन केंद्र उभारण्यात आले आहे. शरीरा विषयीची लाज आणि संकोच कमी झाला पाहिजे. आत्मविश्वास, नेतृत्व आणि एकजूट वाढली पाहिजे. महिलांच्या कार्याला विचारांना प्रोत्साहन देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षा प्रसिद्ध लेखिका,प्राध्यापक डॉ. विजयाताई भारत दाढेल हे असणार आहेत तर उद्घाटक म्हणून तृतीय पंथीय समुदायाच्या श्रीमती मन्नत संग्राम तेलंगे ह्या करणार आहेत.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अभ्यासक,अभीनेत्री डॉ. अनुराधाताई पत्की, साहाय्यक पोलिस निरीक्षक सौ. रेखाताई काळे, प्रा.वैशालीताई सावंत हे असणार आहेत. कबड्डी सामने संपल्यानंतर बक्षीस वितरणासाठी विशेष अतिथी म्हणून नांदेड महानगर पालिकेच्या महापौर सौ.कविता ताई संतोष मुळे यांच्या हस्ते बक्षीस वितरण केले जाणार आहे यामध्ये प्रमुख उपस्थिती नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे नवनियुक्त नगरसेविका सौ.सुवर्णा सतीश पा. बस्वदे,सौ.निरंजना राजू लांडगे,श्रीमती.मंगलाताई गजानन देशमुख, सौ.सरिताताई उमेशराव पवळे, डॉ. मंजुषा प्रसाद रानवळकर, माजी नगरसेविका सौ.बेबीताई गुपिले सौ.ललिताताई शिंदे- बोकारे हे असणार आहेत तर तृतीय पंथीय समुदायातील अमोल डोईजडे, चंद्रकला देवकर, जयंद्र सोमवंशी, भिमाशंकर कांबळे हे असणार आहेत. या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला तर ५००० रुपये सन्मान चिन्ह आणि प्रमाणपत्र मेडल जाते तर दूसरा क्रमांक ३००० रुपये, तिसरा क्रमांक आला तर २००० रुपये सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. ट्रॉफी देऊन गौरविण्यात येणार आहे. आयोजक सहभागी संस्था-रयत सेवाभावी संस्था सुजलेगांव, नांदेड,वंचित विकास लोक संस्था,नांदेड, भारतीय भटक्या विमुक्त जमाती विकास संघटना, नांदेड. महिला जागृत संस्था,परभणी, जनजागृती बहु.जिजामाता सेवाभावी संस्था,अहमदपूर जि. लातूर,संकल्प सेवाभावी संस्था,वायेगाव ता.अहमदपूर जि.लातूर. लोक विकास केंद्र,पाथरी जि.परभणी,छत्रपती शाहु समता प्रतिष्ठाण पुर्णा. जि.परभणी,अभिजीत बहु सेवाभावी संस्था, हिंगोली,जन विकास मंडळ, बा-हाळी,रूडी ग्रस्त लोकवंचित कलावंत परीषद,परभणी, सर्वांगीण मानवविकास संस्था, रूमणा ता.गंगाखेड यांच्या सहभाग आहे अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष प्रा. इरवंत सुर्यकार , रयत सेवाभावी संस्था यांनी कळविले आहे.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी जिल्हा परिषद शाळांमध्ये CCTV ची बारीक नजर

- पहिल्या टप्प्यात ५२४ शाळांमध्ये काम पुर्ण
- उर्वरित शाळांमध्ये एप्रिल २०२६ अखेरपर्यंत शीघ्रतेने CCTV बसविणार





**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत शाळांमध्ये सीसीटीव्ही (CCTV) यंत्रणा बसविण्याचे काम हाती घेण्यात आले. असून मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाखाली शीघ्रतेने ही योजना पुर्ण करण्यात येत आहे.

जिल्हा नियोजन समितीमार्फत सन २०२४-२५ मधील उपलब्ध तरतुदीतून पहिल्या टप्प्यात एकूण ५४२ शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे कामकाज सुरू करण्यात आले आहे. या अंतर्गत कल्याण तालुक्यात १२० सीसीटीव्ही, भिवंडी ३०८ सीसीटीव्ही बसविण्याचे काम १०० टक्के पुर्ण असून अंबरनाथ तालुक्यात ९६ सीसीटीव्ही बसवण्यात आले तर १८ शाळेतील कामकाज प्रगतीपथावर आहे. असे एकूण ५२४ शाळांमध्ये शिक्षण विभाग (प्राथमिक) कार्यालयामार्फत सीसीटीव्ही बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. जिल्हा नियोजन समितीमार्फत सन २०२५-२६ मधील जिल्हा नियोजन समितीच्या उपलब्ध निधीतून सीसीटीव्ही बसविण्यासाठी मंजुरी देण्यात आली आहे. मुरबाड गटातील ३२९ शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचे काम नियोजित वेळेत सुरू असून या शाळांमधील सर्व यंत्रणा मार्च २०२६ अखेरपर्यंत कार्यान्वित होणार आहेत. शहापूर गटातील ४५७ शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचे काम नियोजित वेळेत सुरू असून या शाळांमधील सर्व यंत्रणा एप्रिल २०२६ अखेरपर्यंत कार्यान्वित होणार आहेत. जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी तसेच शाळांमधील शैक्षणिक वातावरण अधिक सुरक्षित आणि पारदर्शक ठेवण्यासाठी ही यंत्रणा महत्त्वाची ठरणार आहे. शाळेच्या परिसरातील हालचालींवर लक्ष ठेवणे, अनुचित प्रकारांना प्रतिबंध करणे आणि विद्यार्थ्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे या दृष्टीने ही सीसीटीव्ही योजना राबविण्यात येत आहे.

> "विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचे काम शीघ्रतेने करण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात ५२४ शाळांमध्ये सीसीटीव्ही बसवण्यात आले असून उर्वरित शाळांमध्येही शीघ्रतेने सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यात येत आहे. यामुळे शाळांमधील वातावरण अधिक सुरक्षित व शिस्तबद्ध राहण्यास मदत होणार आहे."
>
> **- शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे**



# एअरबीएनबी कडून संस्थांना मदत

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

एअरबीएनबीने आज एअरबीएनबी कम्युनिटी फंड देणग्या देण्यात आलेल्या नवीन संस्थांची घोषणा केली असून त्यात समुदायांमध्ये अर्थपूर्ण बदल घडवणाऱ्या भारतभरातील आठ ना-नफा संस्थांचा समावेश आहे. एअरबीएनबी कम्युनिटी फंडची स्थापना २०२० मध्ये झाली असून हा १०० दशलक्ष डॉलर्सचा उपक्रम आहे. त्यातून स्थानिक समुदायांना आणि रहिवाशांना मदत केली जाते. यंदा एअरबीएनबीने जगभरातील समुदायांना बळकट करण्यासाठी कार्यरत संस्थांना पाठिंबा देत जागतिक स्तरावरील ना-नफा संस्थांना सुमारे १० दशलक्ष डॉलर्सच्या देणग्या दिल्या.

# कृषी उत्पन्न बाजार समिती मैदानावर १५ व १६ मार्चला जिल्हा कृषी व धान्य महोत्सव

- १०० स्टॉलची उभारणी
- शेतकरी-ग्राहकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे – जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

कृषि विभाग व आत्मा, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने "जिल्हा कृषी व धान्य महोत्सव २०२६" चे आयोजन १५ ते १६ मार्च २०२६ या कालावधीत करण्यात आले आहे. हा महोत्सव सकाळी १० ते सायंकाळी ८ वाजेपर्यंत कृषि उत्पन्न बाजार समिती मैदान, नवा मोंढा, नांदेड येथे होणार आहे. हा महोत्सव नांदेड शहरवासीयांसाठी एक प्रकारची मेजवानी असून नागरिकांनी तसेच शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शेतमालाची खरेदी करून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. या कृषी महोत्सवात कृषी प्रदर्शन, कृषी विज्ञान केंद्र व कृषी विद्यापीठांचे स्टॉल, विविध कृषी तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक तसेच कृषी संलग्न शासकीय विभागांचे स्टॉल असे एकूण १०० स्टॉल उभारण्यात येणार आहेत. तसेच विविध विषयांवर शेतकरी-शास्त्रज्ञ परिसंवाद, चर्चासत्र, उत्पादक ते ग्राहक थेट विक्री, कृषी मालाचे प्रदर्शन आणि खरेदीदार-विक्रेता संमेलन आयोजित करण्यात येणार आहे. या महोत्सवात जिल्ह्यातील शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या तसेच महिला आर्थिक विकास महामंडळाच्या महिला बचतगटांचा सक्रिय सहभाग राहणार आहे. महोत्सवात शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला गहू, ज्वारी, तांदूळ, तूर, मुग, उडीद, चनाडाळ, हळद, मिरची, मसाले तसेच सेंद्रीय उत्पादने (गूळ, हळद पावडर, सेंद्रीय डाळी) विक्रीसाठी उपलब्ध असतील. याशिवाय मध, गुळाचा पाक, चटणी, लोणचे, पापड, कुरडई, टरबूज, खरबूज, विविध फळे व भाजीपाला यांची थेट विक्री होणार आहे. तसेच जात्यावर दळलेली सेंद्रीय डाळ, गोदाकाठची ज्वारी, सेंद्रीय भाज्या, रानफळे, लाकडी घाण्यावर तयार केलेले करडई, भुईमूग, जवस व तीळाचे तेल, बांबूपासून तयार वस्तू, केळीचे वेफर्स यांचे प्रदर्शन व विक्रीही करण्यात येणार आहे. या महोत्सवाला शहर व जिल्ह्यातील शेतकरी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी तथा प्रकल्प संचालक (आत्मा) दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

# माजी उपमहापौर श्रीपाद छिंदम १२ तासांसाठी तडीपार



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शिवजयंती उत्सव काळात अहिल्यानगरमध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी माजी उपमहापौर श्रीपाद छिंदम यांना १२ तासांसाठी तडीपार करण्यात आले आहे. काही वर्षांपूर्वी छिंदम यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासंबंधी आक्षेपार्ह वक्तव्य केले होते. त्यावरून राज्यभर वातावरण तापले होते. त्यावर छिंदम यांच्यावर विविध प्रकारे कडक कारवाई झाली होती. त्यानंतर आता यावर्षी तिथीनुसार येणारी शिवजयंती साजरी करण्यासाठी छिंदम यांनी जोरदार तयारी केली होती. दिल्लीगेट येथे भव्य देखावा अन्य तयारी केली होती. मात्र, काही शिवप्रेमी संघटनांनी याला विरोध केला होता. त्यामुळे काही वाद उदभवू नये, यासाठी छिंदम यांना आजच्या दिवशी बारा तासांसाठी शहराबाहेर पाठविण्यात आले आहे, तोफखाना पोलिसांनी यासंबंधीच्या कारवाई आदेशाची अंमलबजावणी केली आहे.

# लोकशाही मूल्य रुजविण्यासाठी युवा संसद महत्त्वाची ठरते



**श्रीमती चंद्रकला रावळकर**

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या आधिसभा सभागृहात युवा कार्य व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार क्षेत्रीय निर्देशालय पुणे, माय भारत, नांदेड तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय 'विकसित भारत युथ पार्लमेंट – 2026' दिनांक ५ मार्च २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाली. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर व प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली या युवा संसदेचे आयोजन करण्यात आले.

या युवा संसद वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी होते. यावेळी मंचावर दूरस्थ शिक्षण विभागाचे संचालक डॉ. प्रकाश निहालानी, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपाल चिखलीकर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारोती गायकवाड, युवा संसदेचे नोडल अधिकारी डॉ. केशव आलगुले तसेच रासेयो जिल्हा समन्वयक डॉ. भागवत पस्तापुरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या युवा संसदेसाठी विद्यार्थ्यांना "आणिबाणी नंतरचे पन्नास वर्षे : भारतीय लोकशाहीसाठी धडा" (50 Years of Emergency: Lessons for Indian Democracy) हा विषय देण्यात आला होता. या स्पर्धेसाठी माय भारत पोर्टलवर १३१ स्वयंसेवकांनी नोंदणी केली होती, त्यापैकी ३८ स्वयंसेवकांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदविला. स्पर्धेचे परीक्षक म्हणून इंदिरा गांधी महाविद्यालय, सिडको नांदेड येथील डॉ. भागवत पस्तापुरे, जयक्रांती महाविद्यालय, लातूर येथील इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका डॉ. गीता वाघमारे, शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ येथील हिंदी विषयाचे प्राध्यापक डॉ. अनिल इंगळे, राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथील डॉ. दत्तात्रय म्हेत्रे तसेच हुतात्मा गोविंदराव पानसरे महाविद्यालय, अर्धापूर येथील डॉ. नारायण शिवशेट्टे यांनी काम पाहिले.

समारोप व बक्षीस वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी परीक्षा मूल्यमापन व नियंत्रण मंडळाचे संचालक डॉ. हुशारसिंग साबळे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना विविध विषयांवर आपले विचार मांडण्यासाठी युवा संसदेसारखे व्यासपीठ अत्यंत उपयुक्त असल्याचे सांगितले. यावेळी माय भारतच्या प्रतिनिधी व जिल्हा युवा अधिकारी श्रीमती चंद्रकला रावळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "युवा संसद ही युवकांना लोकशाही मूल्यांची जाणीव करून देणारी आणि अभ्यासपूर्ण चर्चा घडवून आणणारी महत्त्वाची संधी आहे. युवकांनी या व्यासपीठावर निर्भीडपणे आणि अभ्यासपूर्ण पद्धतीने आपले विचार मांडावेत. या स्पर्धेच्या माध्यमातून राज्य व देश पातळीवर लोकशाही मूल्य रुजविण्यासाठी युवकांकडून सकारात्मक कार्य घडू शकते." तसेच माय भारत पोर्टलवर उपलब्ध असलेल्या विविध स्पर्धा व उपक्रमांमध्ये युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे आयोजन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने करण्यात आले होते. युवा संसदेमुळे विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# सोनालिकाची १२,८९० ट्रॅक्टरची आजवरची सर्वोधिक विक्री

## शेतकऱ्यांच्या विश्वासाच्या ३० वर्षांच्या पूर्तीचा आनंदोत्सव साजरा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

कृषी यांत्रिकीकरणाच्या राष्ट्र उभारणीच्या स्वतःच्या ऐतिहासिक ३० व्या वर्षात सोनालिका ट्रॅक्टरने आपल्या प्रवासात एका नवीन सोनेरी अध्यायाची भर घातली आहे. कंपनीने आर्थिक वर्ष २०२६ मध्ये फेब्रुवारीमध्ये आतापर्यंतची सर्वाधिक १२,८९० ट्रॅक्टर विक्री नोंदविली आहे. ही नवीन ऐतिहासिक कामगिरी म्हणजे तिच्या व्यापक पातळीवरील दमदार कार्यान्वयनाची जोरदार पुष्टी असून 'जीतने का दम' (विजयाचा विश्वास) देण्याच्या सोनालिकाच्या मूळ विश्वासाचे मूर्त स्वरूप आहे. हा विश्वास म्हणजे शेतकऱ्यांना उज्ज्वल भविष्याचे आश्वासन देणारे तिचे अंतर्भूत सामर्थ्य आहे. अचूकतायुक्त शेती आणि प्रगत कृषी-तंत्रज्ञान सर्व प्रदेशांमध्ये वाढत




आहे. अशा वेळेस स्पर्धेमध्ये पुढे राहण्यासाठी सोनालिका उत्पादन नाविन्यपूर्णतेचा सखोल शेतकरी सहभाग आणि बाजारपेठेतील गतिमान संपर्क यांच्याशी संयोग घडवून आणत आहे. भारताचे कृषी क्षेत्र एका निर्णायक टप्प्यातून जात आहे. समर्थ धोरणात्मक पाठबळ, डिजिटल उपक्रमांद्वारे झपाट्याने यांत्रिकीकरण, कर्जाची सुलभ उपलब्धता तसेच शेती उत्पादकता आणि उत्पन्न वाढवण्याच्या उद्देशाने ग्रामीण पायाभूत सुविधांवर खर्च वाढला आहे. सोनालिकाने अलीकडेच लाँच केलेल्या सोनालिका गोल्ड मालिकेसारखे भविष्यानुकूल ट्रॅक्टर विकसित करून जागतिक अभियांत्रिकी उत्कृष्टतेला सातत्याने चालना दिली आहे. ते तळागाळातील शेतीच्या वास्तविकतेशी सुसंगत असून सोन्यासारखी भविष्यातील सुरक्षितता आणि शेतकऱ्यांसाठी दीर्घकालीन मूल्य निर्मितीची ते हमी देतात. शाश्वत शेतीसाठी यांत्रिकीकरण ही केवळ एक गरज नव्हे तर अधिक काही आहे, असे सोनालिकाचे मत आहे. भारतीय शेतकऱ्यांसाठी दीर्घकालीन विकासाचा भागीदार म्हणून आपली भूमिका अधिक मजबूत करण्यासाठी ती कायमच संलग्न, गतिमान आणि महत्त्वाकांक्षी आहे. या नवीन विक्रमी कामगिरीविषयी आपले विचार मांडताना इंटरनॅशनल ट्रॅक्टर लिमिटेडचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक श्री. रमण मित्तल म्हणाले, "खरा विजयाचा विश्वास ('जीतने का दम') नेहमीच अशा शेतकऱ्यांचा असतो जे त्यांच्या शेतात प्रगतीची लागवड करण्यासाठी दररोज उठतात. शेतकऱ्यांच्या महत्त्वाकांक्षा आणि जीवनात यशस्वी होण्याचा दृढनिश्चय वाढवणारे हेवी ड्युटी ट्रॅक्टर तयार करणे ही आमची जबाबदारी आहे, असे आम्ही मानतो. भारताच्या कृषी परिवर्तनासाठी विकास उत्प्रेरक म्हणून ब्रँडचे स्थान त्यामुळे अधिक बळकट झाले आहे. शेतकऱ्यांच्या क्षमतेचे मोजमाप करण्यायोग्य प्रगतीमध्ये रूपांतर करण्याची आणि ग्रामीण समृद्धीला बळकट करण्यासाठी भारताच्या विकासगाथेला गती देण्याची आमची जबाबदारीसुद्धा या ऐतिहासिक वर्षामुळे नव्याने वाढली आहे."

# सगरोळीत महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन

**छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानांतर्गत विविध महसूल सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध**

**बिलोली : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान – टप्पा १ अंतर्गत बिलोली तालुक्यातील सगरोळी मंडळ येथे शनिवार, दि. ७ मार्च २०२६ रोजी एकदिवसीय महसूल समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर के.व्ही.के. (KVK) सगरोळी येथे होणार असल्याची माहिती तहसील कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

या शिबिरामध्ये महसूल विभागाशी संबंधित विविध प्रलंबित प्रकरणांचा तत्काळ निपटारा करण्यात येणार असून नागरिकांना "सिंगल विंडो" पद्धतीने एकाच ठिकाणी विविध सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

शिबिरामध्ये प्रलंबित फेरफार प्रकरणांचा निपटारा, ७/१२ व ८अ उताऱ्यांतील दुरुस्तीबाबत अर्ज स्वीकृती व निपटारा, डिजिटल ७/१२ (QR कोडयुक्त) उतारे उपलब्ध करून देणे, तसेच उत्पन्न, रहिवासी, जात, नॉन-क्रीमीलेयर आदी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येणार आहे. तसेच अकृषी रूपांतरण संदर्भातील नवीन तरतुदींबाबत मार्गदर्शन, ई-मोजणी, अँटीरेक्स, पीएम किसान नोंदणी व तक्रार निवारण, तसेच संपादन व अकृषी प्रकरणांतील कमी-जास्त पत्रके तयार करून गाव दप्तर अद्ययावत करणे या सेवा देखील उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

सदर शिबिरामध्ये तहसील कार्यालयातील सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहून नागरिकांच्या अडचणींचे तत्काळ निराकरण करतील. स्थानिक लोकप्रतिनिधी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व सामाजिक संस्थांनीही शिबिरास उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. बिलोली तालुक्यातील सगरोळी मंडळातील नागरिकांनी आपल्या महसूल विषयक प्रलंबित कामांसह आवश्यक कागदपत्रे घेऊन दि. ७ मार्च २०२६ रोजी के.व्ही.के. सगरोळी येथे आयोजित समाधान शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार बिलोली यांनी केले आहे.

# मुदखेड येथे चौथ्या धम्मपरीषदेचे आयोजन



**मुदखेड ता.प्र. : (समर्थ गांवकरी)**

मुदखेड येथील नालंदा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने रविवार, दि. ०८ मार्च २०२६ रोजी 'चौथी धम्म परिषदे व विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पूज्य भन्ते उपगुप्त महाथेरो (पूर्णा) यांच्या अध्यक्षतेखाली हि धम्म परिषद संपन्न होणार असून, या धम्म परिषदेमध्ये बौद्ध उपासक-उपासिकांना मार्गदर्शन लाभणार आहे. दिवसभराचे नियोजित कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ०८.०० वाजता पूज्य भिक्खू डॉ. प्रा. सत्यपाल महाथेरो (मुळावा) यांच्या हस्ते पंचशील धम्म ध्वजारोहणाने होईल. त्यानंतर सकाळी ०९.०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भिक्खू संघाची शहराच्या प्रमुख रस्त्यावरून भव्य मिरवणूक काढण्यात येईल.

सकाळी ११.३० वाजता: भिक्खू संघाला भोजनदान (बुद्धभूमी प्रशिक्षण केंद्रात) उपासिका यांच्या हस्ते होणार आहे. दुपारी १२.३५ वाजता: प्रमुख धम्मदेसना बौद्ध प्रशिक्षण केंद्रात आयोजीत केली आहे. तसेच सायंकांळी ठिक ७:०० वाजता महाराष्ट्राच्या सुप्रसिद्ध गायिका नालंदा सांगवीकर आणि त्यांचा संच यांचा बुद्ध भिम गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. उपस्थित मान्यवर:या परिषदेत डॉ. एस. पी. गायकवाड, समता सैनिक दल मुदखेड, तसेच पूज्य भिक्खू डॉ. खेमधम्मो महाथेरो, भिक्खू इंदवंश महाथेरो, भिक्खू ज्ञानरक्षीत थेरो यांच्यासह अनेक मान्यवर भिक्खू संघाची उपस्थिती व धम्मदेसना लाभणार आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भिक्खू शिलरत्न थेरो (नांदेड/मुदखेड), भन्ते गगण बोद्धी आणि मुदखेड येथील समस्त महिला मंडळ परिश्रम घेत आहेत.

यासाठी सर्व बौद्ध उपासक-उपासिकांनी या धम्म परिषदेला वेळेवर आणि शुभ्र वस्त्र परिधान करून उपस्थित राहावे," असे आवाहन नालंदा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

# हद्दपार असतानाही आरोपीचे स्वतःच्या घरात वास्तव्य

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जिल्हयातुन हद्दपार असलेल्या सराईत गुन्हेगारावर एमआयडीसी पोलीसांनी कारवाई केली आहे. सपोनि माणिक चौधरी यांना मिळालेल्या माहितीनुसार पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांच्याकडील हद्दपार संदर्भ क्रमांक स्था.गु. शा/हद्दपार/55/ एमआयडीसी ह. प्रस्ताव क्रमांक 2/5366/2025 अहिल्यानगर दि.07/11/2025 अन्वये महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ५५ मधील अहिल्यानगर जिल्हयातुन हद्दपार असलेला इसम मुनाफ चाँद शेख ( रा. जेऊर बायजाबाई, ता.जि अहिल्यानगर) हा त्याच्या राहते घरी वरील आदेशाचा भंग करुन, कोणतीही परवानगी न घेता वास्तव्यास आलेला आहे.

# युवानेते करण एंड्रलवार यांच्या शुभहस्ते 'घनवन' योजनेचा शानदार शुभारंभ

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

वाढते प्रदूषण आणि निसर्गाचा समतोल राखण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'घनवन' (Micro Forest) योजनेचा किनवट येथे युवानेते करण एंड्रलवार यांच्या शुभहस्ते दिमाखात शुभारंभ झाला असुन अत्यंत कमी जागेत दाट जंगल तयार करण्याच्या या आधुनिक तंत्रज्ञानामुळे शहराला आता हक्काचा 'ऑक्सिजन झोन' मिळणार असल्याचे मत करण एंड्रलवार यांनी व्यक्त केले आहे. एकाच ठिकाणी विविध प्रजातींची झाडे लावून नैसर्गिक जंगलाच्या तुलनेत १० पटीने वेगाने वाढणारी वने तयार करण्याच्या उदात हेतूने महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागामार्फत घनवन ही योजना शहरी भागात युद्ध स्तरावर राबविण्यात येत आहे.सामाजिक वनीकरण नांदेडचे विभागीय वनाधिकारी संदीप चव्हाण,



सहायक वनसंरक्षक श्रीकांत जाधव, वनपरिक्षेत्र अधिकारी दिनकर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली किनवट येथील सामाजिक वनिकरण कार्यालयाने दि. 4 मार्च रोजी नगराध्यक्षा सौ सुजाता विनोद एंड्रलवार यांचे चिरंजीव शिवसेनेचे युवानेते करण एंड्रलवार यांच्या शुभहस्ते नगरपरिषद क्षेत्रातील डम्पिंग ग्राउंड येथे नारळ फोडून 'वनघन' योजनेचा शानदार शुभारंभ केला.यावेळी बोलताना करण एंड्रलवार म्हणाले की, "वाढत्या शहरीकरणामुळे झाडांची संख्या कमी होत आहे. 'घनवन' योजनेमुळे कमी वेळात जास्त हरित क्षेत्र निर्माण होईल, ज्यामुळे परिसरातील तापमानात घट होण्यास मदत होईल. यावेळी सामाजिक वनीकरण कार्यालयाचे कर्मचारी टी. ए.देवकते यांनी वनघन योजनेबाबत विस्तृत माहिती दिली. शहरी भागासाठी राज्य शासनाची ही महत्वकांक्षी योजना असुन दाट झाडांमुळे धुलीकण आणि आवाजाच्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवता येते. शहरांमधून नामशेष होणारे पक्षी आणि फुलपाखरांना यामुळे नवीन आश्रयस्थान मिळेल. घनवनामुळे जमिनीतील पाणी मुरण्याचे प्रमाण वाढते असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास उपनगराध्यक्ष हसन लाला,बांधकाम सभापती राम नेमानीवार,प्रभू कोल्हे,अनवर मिर्झा, साहिल सर, नगर परिषदेचे कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव,स्वच्छता कर्मचारी रियाज, शेबाज लाला,शिवसेनेचे शहर प्रमुख प्रशांत कोरडे,सामाजिक वनीकरण कार्यालयाचे कर्मचारी बी एस भुरके, एच.डी खामकर, शेख रसूल गुलाम,अंकुश राठोड, वेद राठोड यांच्यासह स्थानिक नागरिक व वनप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांचा औद्योगिक अभ्यास दौरा यशस्वी

**नांदेड जिल्हा: (समर्थ गांवकरी)**

नांदेड येथील इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीच्या बी.फार्म तृतीय वर्षाच्या सुमारे ५० विद्यार्थ्यांची २६ फेब्रुवारी २०२६ ते ४ मार्च २०२६ या कालावधीत रोजी शैक्षणिक सहलीला सुरुवात झाली या सहलीदरम्यान २८ फेब्रुवारी २०२६ रोजी कोल्हापूर येथील S G Phyto Pharma Pvt. Ltd. या नामांकित औषधनिर्मिती उद्योगास भेट देण्यात आली.

औद्योगिक भेटीदरम्यान कंपनीचे युनिट हेड दीपक ए. गुने, प्रॉडक्शन मॅनेजर सागर एस. तारे, अविनाश खटावकर (जनरल मॅनेजर ), सुरेश जगदाळे (सिनियर ऑफिसर) तसेच ज्युनिअर ऑफिसर गणेश सालोखे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी कंपनीची उत्पादन प्रक्रिया, विविध हर्बल व फाइटो-फार्मा उत्पादने, गुणवत्ता नियंत्रण विभागाचे कार्य, तयार उत्पादनांचे विश्लेषण




व मूल्यमापन (Analysis & Evaluation of Finished Products), तसेच उद्योगातील विविध नोकरी संधी व जबाबदाऱ्या याविषयी सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी उत्पादन विभाग, गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळा आणि पॅकिंग विभागास प्रत्यक्ष भेट देऊन कार्यपद्धतीची माहिती घेतली.

सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ. संतुकराव हंबर्डे यांनीही महाविद्यालयीन शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसाठी अशा औद्योगिक भेटी आयोजित करण्यास प्रोत्साहित केले. या शैक्षणिक सहलीत प्राचार्य डॉ. विजय विठ्ठलराव नवघरे यांचा पुढाकार महत्त्वपूर्ण ठरला. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव मिळावा, त्यांच्या ज्ञानात भर पडावी व रोजगारक्षमतेत वाढ व्हावी या उद्देशाने त्यांनी अशा उपक्रमांना नेहमीच प्रोत्साहन दिले आहे.

सदर दौऱ्यात डॉ. पल्लवी कांबळे, माधव डाकोरे, कु. श्रद्धा देशमुख व शुभम जाधव हे प्राध्यापक विद्यार्थ्यांसोबत उपस्थित होते. औद्योगिक भेटीचे नेतृत्व डाकोरे यांनी केले. सहलीचे नियोजन, उद्योगाशी समन्वय, विद्यार्थ्यांची सुरक्षितता व शिस्त यामध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली.

विद्यार्थ्यांनी या औद्योगिक भेटीद्वारे औषधनिर्मिती क्षेत्रातील प्रत्यक्ष कामकाज, गुणवत्ता मानके, तसेच उद्योगातील व्यावसायिक संधींबाबत मौल्यवान अनुभव मिळाल्याची भावना व्यक्त केली. महाविद्यालयाकडून भविष्यातही अशा शैक्षणिक व औद्योगिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे प्राचार्यांनी सांगितले.

# नगर शहरात १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवर भावाने केला अत्याचार

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शहरातील एका उपनगरात अल्पवयीन मुलीवर मावस भावाने अत्याचार करून तिला गर्भवती केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पीडित अल्पवयीन मुलीने (वय-१३) दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात संशयित आरोपी मावस भावाविरूध्द अत्याचार, पोक्सो कलमान्वये गुरूवारी (५ मार्च) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी मुलीची आई चार वर्षांपूर्वी मयत झाली असून वडील मजुरीसाठी बाहेर राहतात. त्यामुळे ती गेल्या चार वर्षांपासून मावशीकडे राहत आहे. दरम्यान, जानेवारी २०२६ मध्ये दुपारी फिर्यादी मुलगी घरी एकटी असताना तिच्या दुसऱ्या मावशीच्या लहान मुलाने तिला त्यांच्या घरी स्वयंपाक करण्यासाठी बोलावले.

# आदिवासी दुर्गम भागात आरोग्य शिबिर संपन्न

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

हदगांव तालुक्यातील आदिवासी दुर्गम भाग असलेल्या डाक्याचिवाडी येथे बिरसा मुंडा अंध ट्रायबल डॉक्टर असोसिएशन व सरपंच यांच्या संयुक्त विधमाने आरोग्य शिवीर संपन्न.

अन्न ,वस्त्र, निवारा ,आरोग्य आणि शिक्षण ह्या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. यापैकी आरोग्य हे सर्वात महत्त्वाचे आहे त्यामुळे आपण सर्वांनी आरोग्य जपले पाहिजे . वेलिच उपचार घेऊन सुदृढ जीवन जगले पाहिजे असे आवाहन कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ शामराव वाकोडे यांनी याप्रसंगी केले. डाक्याचीवाडी ता.हदगाव या ठिकाणी आज रोजी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या आरोग्य शिबिराला ला नांदेड येथील बालरोग तज्ञडॉ सत्यनारायण मुरमुरे मुरमुरे,तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ संजय मुरमुरे, वैद्यकीय अधिकारी डॉ



जनार्दन टारपे,डॉ साहेबराव भीसे , स्त्री रोगतज्ञ डॉ मंजुश्री मुरमुरे, डॉ बळीरामभुरके(फिजिशियन ),डॉ सुनील बोंबले (सर्जन )डॉ मनीषा बोंबले (फिजिशियन ),मधुमेह तज्ञ डॉ जयश्री बोड्खे,डॉ माधव भूरके यांनी रुग्ण तपासून योग्य औषधपचार केलेसदर आरोग्य शिबिराचे आयोजन बिरसा मुंडा अंध ट्रायबल डॉक्टर असोसिएशन नांदेड च्या वतीने व सरपंच डाक्याचिवाड़ी गावकऱ्यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात आले होते .या कामी गाव गावातील नागरिकांचे तसेच तामसा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र चा पॅरामेडिकल स्टाफ यांचे सुद्धा या शिवीर ला साहकार्य लाभले.

# नागरिकांनी ऑनलाईन अर्ज करावा- मुख्याधिकारी लाळगे

**लोहा : (समर्थ गांवकरी)**



लोहा शहरातील नगरपरिषदेच्या हद्दीतील प्रधानमंत्री आवास योजना डि.पि.आर क्र.१,२,३ अंतर्गत लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम सुरू करण्यासाठी नगरपरिषदेकडून वेळोवेळी तोंडी व लेखी सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र अनेक लाभार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद न मिळाल्यामुळे, वरिष्ठ कार्यालयाच्या पत्रानुसार त्यांच्या नावांची योजनेतून मानीव वगळणी झालेली आहे, अशी माहिती मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांनी दिली आहे. राज्य शासनाच्या नगर प्रशासन संचालनालयाच्या पत्र क्र. नपप्रसं/प्रधानमंत्री आवास योजना /२०२३/कक्ष-७/३७२४ ,७ जुलै २०२३ नुसार ही मानीव वगाळणी झालेली आहे. तथापि, संबंधित लाभार्थ्यांना पुन्हा एक संधी देण्यात आली असून, ज्यांची नावे वगळण्यात आली आहेत त्यांनी 'प्रधानमंत्री आवास योजना २.०' अंतर्गत ऑनलाईन अर्ज सादर करून पुन्हा या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्याधिकारी लाळगे यांनी केले आहे.

लाभार्थ्यांनी नगरपरिषद घरकुल विभागाशी संपर्क साधून आवश्यक मार्गदर्शन घ्यावे. या उपक्रमामुळे लोहा शहरातील कोणताही नागरिक घरकुल योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही, असा विश्वास नगरपरिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष शरद पाटील पवार यांनी व्यक्त केला आहे.

# अतिक्रमणाविरोधात पुकारलेल्या जामखेड बंदला शंभर टक्के प्रतिसाद

**खा. निलेश लंके यांच्या मध्यस्थीने बेमुदत बंद मागे, मात्र साखळी उपोषण सुरूच**

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रीय महामार्गाचे कार्यकारी अभियंता सुजित चेमटे व संबधीत वरिष्ठ अधिकारी जोपर्यंत हद्द शहरातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाची हद्द निश्चित करीत नाहीत यासाठी सर्व पक्षीय व सर्व सामाजिक संघटना यांच्या वतीने बेमुदत पुकारलेल्या जामखेड बंदला शंभर टक्के प्रतिसाद मिळाला. मात्र दुपारी खा. निलेश लंके यांनी आंदोलकांनास्थळी भेट दिली व संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. यानंतर बेमुदत जामखेड बंद मागे घेण्यात आला,मात्र साखळी उपोषण सुरूच राहणार आहे. याच आनुशंगाने शनिवारी सर्व संबंधित अधिकारी रस्त्याची हद्द निश्चित करण्यासाठी



जामखेड मध्ये दाखल होणार आहेत. राष्ट्रीय महामार्ग विभागाचे डेप्युटी इंजिनियर सुजित चेमटे यांनी दि. ५ मार्च २०२६ पर्यंत महामार्गाची अधिकृत हद्द निश्चित करून कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन दिले होते. त्यामुळे दि. २६ फेब्रुवारी रोजीचा जामखेड बंद मागे घेतल्यानंतरही दिलेल्या आश्वासनानुसार अतिक्रमण काढण्यासाठीची कोणतीही प्रक्रिया न केल्याने मागे घेतलेले जामखेड बंदचे आंदोलन पुन्हा पुकारले असून राष्ट्रीय महामार्गाचे कार्यकारी अभियंता सुजित चेमटे व संबधीत वरिष्ठ अधिकारी जोपर्यंत हद्द निश्चित करत नाहीत तोपर्यंत दि. ६ मार्चपासून सर्व पक्षीय व सर्व सामाजिक संघटना यांच्या वतीने जामखेड शहरात बेमुदत बंद पुकारण्यात आला होता. या बंदला नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. गेली साडेतीन वर्षांपासून जामखेड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू आहे. ते अनेक अडथळे व कासव गतीने सुरू आहे. यामुळे अनेक छोटे मोठे अपघातही झाले आहेत. यामध्ये अनेक जण जायबंदी तर काहींना आपले जीव गमवावे लागले आहेत. हे काम सुरू असताना अनेक अडचणींबरोबरच अतिक्रमण काढणे हा मोठा अडथळा ठरत आहे. यासाठी विविध पक्षसंघटनांकडून अनेक आंदोलने तर प्रशासकीय पातळीवर अनेक बैठका. तसेच जिल्हाधिकारी यांनी याठिकाणी प्रत्यक्ष भेटू देऊन अतिक्रमण काढण्याच्या सुचना करूनही काहीच होत नसल्याने अखेर जामखेडकरांनी अखेर सर्वपक्षीय व बेमुदत जामखेड बंदचे हत्यार उपसले होते. सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार यांनी सुरू केलेल्या साखळी उपोषणस्थळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खा. निलेश लंके यांनी भेट दिली. तसेच अतिक्रमणा बाबत सर्व माहिती जाणुन घेतली. यानंतर खा. लंके यांनी तातडीने प्रांताधिकारी व राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी यांच्याशी फोनद्वारे संवाद साधला. तसेच तातडीने राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू झाले नाही तर मी स्वतःहा पुणे येथील राष्ट्रीय महामार्गाच्या कार्यालयात आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा दिला. यानंतर संबधित अधिकाऱ्यांनी शनिवार दि ७ मार्च २०२६ रोजी सकाळी हद्द निश्चित करण्यासाठी जामखेड शहरात येणार असल्याचे सांगितले. तसेच तातडीने हद्द निश्चित करुन देण्याचे आश्वासन देखील खा. निलेश लंके व उपस्थित आंदोलकांना सांगितले.

खा. निलेश लंके यांच्या मध्यस्थीने जामखेड शहरात पुकारण्यात आलेल्या बेमुदत बंद जरी मागे घेण्यात आला असला तरी जो पर्यंत अतिक्रमणे हटविण्यात येत नाहीत तो पर्यंत सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार यांचे साखळी उपोषण सुरूच राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी माजी सभापती डॉ. भगवान मुरुमकर उपनगराध्यक्ष पोपटनाना राळेभात, माजी नगरसेवक अमित चिंतामणी, पवनराजे राळेभात, प्रा. विकी घायतडक, महेश निमोणकर, शहाजी राळेभात, संभाजी राळेभात, प्रदिप टापरे, विकास (तात्या) राळेभात, राहुल उगले, प्रशांत राळेभात, वसीम सय्यद, प्रा. लक्ष्मण ढेपे, सुनिल जगताप, बाबा चंदन, अनिल सदाफुले, संजय वराट, कुंडल राळेभात व रंगनाथ राळेभात यांच्या सह अनेक जण उपस्थित होते.

# 'उजास'च्या महाराष्ट्रातील उत्पादन नेटवर्कचा विस्तार

## महिलांच्या नेतृत्वाखालील उपजीविकेच्या संधींना देणार बळकटी

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या अंतर्गत अद्वैतेशा बिर्ला यांनी स्थापन केलेल्या 'उजास' या संस्थेने महिलांच्या नेतृत्वाखालील उत्पादन नेटवर्कचा विस्तार केला आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजीविका अभियानाच्या सहकार्याने वर्धा येथे नवीन 'उजास ग्रीन मॅन्युफॅक्चरिंग युनिट' सुरू करून हा विस्तार करण्यात आला आहे. महिला दिन जवळ येत असल्याचे औचित्य साधणारा हा उपक्रम स्केलेबल ग्रासरूट एंटरप्राइझ मॉडेल्सद्वारे महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्याला चालना देण्याच्या 'उजास'च्या कटिबद्धतेला बळकटी देणारा आहे. ही भर पडल्यामुळे 'उजास' आता महाराष्ट्रात दोन 'उजास' ग्रीन मॅन्युफॅक्चरिंग युनिट्स चालवत



असून ती एकत्रितपणे ४५ स्वयंसेवा गटांतील महिलांना रोजगार पुरवत आहे. तसेच विदर्भ आणि मराठवाडा प्रदेशातील सुमारे १,५०० अतिरिक्त महिलांसाठी उपजीविकेच्या संधी निर्माण करत आहे. जालना येथील पूर्वीच्या युनिटने दोन वर्षांत १,११,१२५ पुनर्वापरयोग्य कापडी पॅड तयार करून उत्कृष्ट फलनिष्पत्ती दाखवली आहे. तसेच स्थानिक आर्थिक सहभागाला शाश्वत चालना देणारा म्हणून समुदाय-चालित उत्पादनाला सुस्थापित केले आहे. जालन्यातील युनिटने स्थानिक पातळीवर आणि संभाजीनगर, नांदेड, परभणी, बीड आणि बुलढाणा यांसारख्या शेजारच्या जिल्ह्यांमध्ये कापडी पॅडचे यशस्वीरित्या वितरण केले आहे. तसेच 'उजास' मेन्स्ट्रुअल हेल्थ एक्सप्रेस मोहिमेद्वारे महाराष्ट्र आणि संपूर्ण भारतात आपली व्याप्ती वाढविली आहे. या मोहिमेमुळे २५ राज्ये आणि १२१ शहरांमध्ये मोफत पॅडचे वितरण सुलभ झाले आहे. त्यामुळे जागरूकता, सुलभता आणि व्याप्ती लक्षणीयरीत्या वाढली आहे. 'उजास'च्या प्रमुख पूनम पाटकर म्हणाल्या, "'उजास' ग्रीन मॅन्युफॅक्चरिंग युनिटची रचना कटिंग आणि स्टिचिंगपासून ते गुणवत्ता नियंत्रण, पॅकेजिंग, मार्केटिंग आणि विक्री समन्वयापर्यंत पूर्णपणे महिलांच्या व्यवस्थापनाखाली असलेली उत्पादन परिसंस्था म्हणून करण्यात आली आहे. आमच्या जालना युनिटच्या कामगिरीकडे पाहता प्रत्येक सहभागी महिला कौशल्य आणि उत्पादनानुसार सुमारे ७५,००० रुपयांचे स्थिर वार्षिक उत्पन्न मिळवू शकते, त्यामुळे तिच्या कुटुंबासाठी अपेक्षित आर्थिक आधार मिळतो तर प्रत्येक बचत गटाला सामूहिकरीत्या शाश्वत उद्यमी उत्पन्नाचा फायदा होतो. उत्पादनाव्यतिरिक्त महिलांना आर्थिक साक्षरता, स्वच्छता मानके आणि व्यवसाय प्रक्रियांचे प्रशिक्षण दिले जाते, जेणेकरून त्या स्वतंत्रपणे युनिटचे व्यवस्थापन आणि विस्तार करू शकतील. हा केवळ रोजगार नाही - ही उपजीविकेची सुरचित मालकी असून ती आत्मविश्वास, कौशल्ये आणि दीर्घकालीन आर्थिक सुरक्षितता निर्माण करते."



# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्याचे २ ला.रु. कर्ज माफी केल्यामुळे अर्धापूर जल्लोष

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत राज्याचा अर्थसंकल्प मांडताना शेतकऱ्यांचे २ लाख रुपये कर्ज माफ केल्यामुळे नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष ॲड.किशोर देशमुख यांच्या नेतृत्वाखाली फटाके फोडून,पेढे वाटून पु.अहिल्याबाई होळकर चौक अर्धापूर येथे जल्लोष करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारने शेतकऱ्यांना दोन लाख रुपये कर्ज माफ तसेच शेतमजुराचा विमा काढण्याची घोषणा केली तसेच विविध योजनांना मंजुरी देत विकसित महाराष्ट्र करण्याचा अर्थसंकल्प मांडल्यामुळे भाजप नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख यांच्या नेतृत्वाखाली फटाके फोडून पेढे वाटून घोषणाबाजी करत जल्लोष करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख,उपसभापती तातेराव वाकोडे,माजी सरपंच अशोक बुटले,माजी सभापती व्यंकटराव साखरे,प्रदेश चिटणीस रामराव भालेराव,सचिव पंडितराव लंगडे, युवानेते विराज देशमुख,अभिषेक गुरखेल,माजी तालुकाध्यक्ष जठन मुळे,चांदबाजी कानोडे,उमाकांत सरोदे,किशोर शहाने, आनंद वैद्य,बाळू माटे, माजी नगरसेवक शिवराज जाधव संतोष पवार राजू गायकवाड,बाबुराव जाधव,बाबाराव सरोदे, परमेश्वर लालमे, महेश भोसले, विठ्ठल वानखेडे, कैलास भुस्से,संजय डुबे,आकाश साखरे,संदीप बंडाळे यांच्या सहभाजप पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

# ट्रॅक्टरच्या धडकेत शेतकऱ्याचा मृत्यू

## देगाव शिवारातील घटना

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील देगाव (बु.) शिवारात भरधाव वेगाने येणाऱ्या एका ट्रॅक्टरने पायी जाणाऱ्या ४१ वर्षीय शेतकऱ्याला पाठीमागून जोराची धडक दिली. या भीषण अपघातात गंभीर जखमी झालेल्या शेतकऱ्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, मयत बालाजी गणपतराव तिडके (वय ४१, रा. देगाव बु.) हे आपल्या शेताकडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्यावरून पायी जात होते . याच दरम्यान, पाठीमागून येणाऱ्या ट्रॅक्टर (क्रमांक MH 26 C Y 1246) च्या चालकाने आपले वाहन हयगईने व अतिशय भरधाव वेगात चालवून बालाजी यांना जोरदार धडक दिली . या धडकेमुळे बालाजी यांच्या कंबरेला, पाठीला आणि



छातीला गंभीर मार लागल्याने ते जागीच बेशुद्ध पडले. हा अपघात घडताच जवळच शेतात काम करणारे त्यांचे चुलत भाऊ श्रावण संभाजीराव तिडके व इतर नागरिक मदतीसाठी धावून आले. उपस्थित नागरिकांनी जखमी बालाजी यांना तातडीने खाजगी वाहनाद्वारे विष्णूपुरी येथील शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. शवविच्छेदन झाल्यानंतर पार्थिव नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले असून, त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. याप्रकरणी श्रावण संभाजीराव तिडके यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या जबाबावरून, ट्रॅक्टर चालका विरुद्ध निष्काळजीपणाने वाहन चालवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली आहे. बारड पोलिसांनी या घटनेची नोंद घेतली असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

# ओबेन इलेक्ट्रिकची रॉर ईझी सिग्मावर फेस्टिव्ह ऑफर

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतातील सर्वात वेगाने वाढणारी संशोधन-विकास आधारित इलेक्ट्रिक मोटरसायकल उत्पादक कंपनी ओबेन इलेक्ट्रिकने गुढी पाडव्याच्या निमित्ताने आपल्या फ्लॅगशिप इलेक्ट्रिक मोटरसायकल रॉर ईझी सिग्मावर विशेष उत्सवी ऑफर जाहीर केली आहे. मार्च महिन्याच्या अखेरपर्यंत मर्यादित कालावधीसाठी उपलब्ध असलेली ही ऑफर ग्राहकांना नववर्षाची शुभ सुरुवात स्मार्ट, उच्च कार्यक्षम आणि शाश्वत मोबिलिटी पर्यायासह करण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने सादर करण्यात आली आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानासह अर्थपूर्ण बचत देत हा सण अधिक खास करण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे.



# सुरेश भागवत यांच्या कन्येचा शुभविवाह सोहळा उत्साहात संपन्न!

**खेड (पुणे) : (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील उद्योजक बंडू उर्फ सुरेश भागवत यांच्या कन्येचा आणि कदम परिवारातील चिरंजीव निलेश कदम यांचा शुभविवाह सोहळा मोठ्या उत्साहात आणि आनंदमय वातावरणात पार पडला. या मंगल सोहळ्यास विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहून नवदांपत्याला शुभेच्छा व आशीर्वाद दिले. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी उपस्थित राहून नवदांपत्याला शुभाशीर्वाद दिले. तसेच ज्येष्ठ समाजसेवक नानजीभाई खेमजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांनीही नवदांपत्याच्या उज्ज्वल वैवाहिक आयुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी टायगर ग्रुपचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष पै. तान्हाजीभाऊ जाधव, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक आणि नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विवाह सोहळा पारंपरिक पद्धतीने व उत्साहात पार पडला. उपस्थित मान्यवरांनी नवदांपत्यावर शुभेच्छांचा वर्षाव करत त्यांच्या भावी आयुष्यासाठी मंगलकामना व्यक्त केल्या.

# महिलांसाठी सुरक्षित डिजिटल संवादाला नवा अर्थ देण्यासाठी एफआरएनडी कडून 'सुरक्षित कन्व्हर्झेशन्स' लॉंच

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतातील इंटरनेट वापरकर्त्यांची पुढची लाट टियर २-४ शहरांमधून ऑनलाइन येत आहे. अशा वेळेस विशेषत: सार्थक संपर्काच्या शोधात असणाऱ्या महिलांच्या दृष्टीने सुरक्षितता हा डिजिटल विश्वासाचा निर्णायक घटक म्हणून पुढे येत आहे. भारताचा अवतार-आधारित ऑडिओ सोशल डिस्कव्हरी प्लॅटफॉर्म आणि इंटरॅक्ट ग्रुपचे प्रमुख उत्पादन असलेल्या एफआरएनडी ने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'सुरक्षित कन्व्हर्झेशन्स' ही मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेच्या माध्यमातून या प्लॅटफॉर्मच्या महिला-प्रथम सुरक्षा डिझाईनवर प्रकाश टाकण्यात आला आहे. या मोहिमेच्या माध्यमातूनडिजिटल सुरक्षिततेबद्दल जागरूकता वाढवणे आणि या प्लॅटफॉर्मवर महिलांसाठी आदरयुक्त, सुरक्षित संवादाची संस्कृती निर्माण करणे हे एफआरएनडी चे उद्दिष्ट आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून, कंपनी सुरक्षित ऑनलाइन वर्तन, धोके ओळखणे आणि प्लॅटफॉर्मच्या सुरक्षा वैशिष्ट्यांचा जास्तीत जास्त वापर करणे यांविषयी महिला वापरकर्त्यांना शिक्षित करण्यासाठी नियमित इन-ॲप सत्रे आयोजित करणार आहे. याशिवाय एफआरएनडी वापरकर्त्यांना जेव्हा गरज असेल तेव्हा रिअल-टाइम समर्थन आणि मार्गदर्शन पुरविण्यासाठी २४ x ७ टोल-फ्री हेल्पलाइन सुरू करणार आहे. अधिक सुरक्षित आणि अधिक समावेशक डिजिटल इकोसिस्टम तयार करण्याच्या भारत सरकारच्या दृष्टिकोनाशी ही मोहीम सुसंगत आहे. टियर २ ते ४ बाजारपेठेतील महिलांना ज्ञान आणि सुलभ मदत प्रणालींसह सुसज्ज करण्याचा ती प्रयत्न करणारी आहे जेणेकरून विश्वास हा प्रत्येक संवादाच्या केंद्रस्थानी राहील.

एफआरएनडीची निर्मिती भारतीय वापरकर्त्यांसाठी करण्यात आली असून सुरक्षितता ही या उत्पादनाच्या आर्किटेक्चरच्या केंद्रस्थानी ठेवण्यात आली आहे. या प्लॅटफॉर्मवर सध्या दररोज जवळजवळ दहा लाख संभाषणे केली जातात, त्यासाठी व्हिडिओ, ऑडिओ आणि चॅट संवादांचे निरीक्षण करणारी १०० सदस्यांची मॉडरेटरेशन टीम आणि रिअल-टाइम एआय सिस्टम यांचा आधार आहे. सार्वजनिक रूम्समधील लाईव्ह मॉडरेशनपासून ते खाजगी संभाषणांमध्ये एआय-असिस्टेड तपासणीपर्यंत या प्लॅटफॉर्मच्या सुरक्षा प्रणाली गैरवापर वाढण्यापूर्वीच त्यांना रोखण्यासाठी तयार करण्यात आलेल्या आहेत. महिला वापरकर्त्या एका समर्पित सुरक्षा केंद्राचा लाभ घेऊ शकतात, तिथे त्यांना वापरकर्त्यांना त्वरित चेतावणी देणे, काढून टाकणे किंवा ब्लॉक करणे संभव होते. त्यामुळे त्यांना प्रत्येक संवादावर पूर्ण नियंत्रण प्राप्त होते. वापरकर्त्यांच्या गोपनीयतेचे अधिक रक्षण करण्यासाठी, व्हिडिओ कॉल दरम्यान स्क्रीन रेकॉर्डिंग आणि चॅटचे स्क्रीनशॉट घेण्यास प्लॅटफॉर्मवर सक्त मनाई आहे.

# 'थ्रेडस अँड टोट' विणकाम कार्यशाळा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

औंध येथील वेस्टएंड मॉल मध्ये या आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त, ८ मार्च रोजी दुपारी १२:०० ते २:०० आणि संध्याकाळी ५:०० ते ७:०० या वेळेत महिलांसाठी 'थ्रेडस अँड टोट' या विणकाम कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे . या कार्यशाळेत सर्व पुणेकर महिलांना आरामदायी आणि आकर्षक वातावरणात सुंदर विणकाम कला शिकून सर्जनशील पद्धतीने हा प्रसंग साजरा करण्याचे आमंत्रण आहे. ८९९ रुपयांपासून सुरू होणाऱ्या या कार्यशाळेत विणकामाच्या मूलभूत गोष्टी शिकवल्या जातील आणि रंगीत विणलेले पॅच तयार केले जातील. त्यानंतर हस्तनिर्मित पॅच कापसाच्या टोट बॅगवर शिवला जाईल, ज्यामुळे सहभागींना त्यांनी स्वतः तयार केलेली एक अनोखी आणि वैयक्तिकृत बॅग आणि काही सुंदर आठवणी घरी घेऊन जाता येतील.





दैनिक समर्थ गांवकरी समुहाचे वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या दिनदर्शिका व डायरी घड्याळ टायगर ग्रुप चे राष्ट्रीय अध्यक्ष पैलवान तानाजी जाधव व माय माऊली आधार डॉ पुणेकरयांना देताना थोर समाजसेवक दाजीबा ठक्कर ठाणावाला ... महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉक्टर विश्वासराव आरोटे.दैनिक समर्थ गांवकरी समुहाचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर

# निवृत्त पोलिसाने वकिलाला धमकावले गुन्हा दाखल

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

फिर्यादिचे वकिलपत्र घेतल्याच्या रागातुन जवळे, तालुका पारनेर येथील रामदास मारूती सालके यांनी पारनेर बारचे सदस्य असलेले वकील सोमनाथ गोपाळे यांना पारनेर न्यायालय परिसर आणि जवळे येथील कुकडी सहकारी पतसंस्थेच्या आवारात धमकावून गलिच्छ शिवीगाळ केल्याचा धक्कादायक प्रकार पारनेर तालुक्यात घडला आहे. याबाबत धमकावणाऱ्या आरोपी च्या विरुद्ध अँड. सोमनाथ गोपाळे यांनी पारनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. धमकावणारा आरोपी हा मुंबई पोलिस दलातील निवृत्त पोलिस अधिकारी आहे. या गंभीर घटनेची दखल घेवून पारनेर बार असोशिएशने बैठक बोलावली होती. अशा प्रकारांमुळे वकीलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा



ऐरणीवर आल्याने, यावेळी या घटनेचा संघटनेकडून निषेध करण्यात आला. अँड. गोपाळे यांना धमकावणाऱ्या आरोपीला अटक करण्याची मागणी निवेदनाद्वारे पारनेर पोलिसांकडे केली आहे. पारनेर बारचे संघटनेचे अध्यक्ष मंगेश औटी यांचेकडून पारनेर पोलिस निरीक्षक संतोष खेडकर यांनी यावेळी निवेदन स्विकारून आरोपीविरुद्ध कडक कारवाई करण्याचे आश्वासन बारच्या शिष्टमंडळाला दिले आहे. यावेळी पारनेर बार संघटनेचे इतर सदस्य मोठ्या संखेने हजर होते.

# अहिल्यानगरमधील ३ लाखांहून अधिक नागरिकांसाठी 'कॅन्सर केअर' उपक्रम

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

इंडियन कॅन्सर सोसायटी (आयसीएस), अल्केम फाऊंडेशन आणि अहिल्यानगर जिल्हा आरोग्य विभाग यांनी एकत्रितरित्या 'सतर्क' हा समुदाय-केंद्रित प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश संगमनेर, अकोला, पारनेर आणि राहुरी या तालुक्यांमध्ये कर्करोगाविषयी जनजागृती करणे आणि संगमनेर तालुक्यात विशेष तपासणी मोहीम राबवणे हा आहे. या सर्वसमावेशक कार्यक्रमांतर्गत वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी आणि आशा कार्यकर्त्यांसह इतर आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे, जेणेकरून ते जिल्हाभर कर्करोगाबद्दल जनजागृती करू शकतील. यासोबतच संगमनेर तालुक्यात मुखाच्या, स्तनाच्या आणि गर्भाशयाच्या मुखाच्या




कर्करोगासाठी विनामूल्य तपासणी शिबिरे आयोजित केली जातील. या तीन प्रकारच्या कर्करोगांनी ग्रस्त रुग्णांची संख्या ही सर्वाधिक असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळेच, स्क्रीनिंगच्या माध्यमातून या आजारांचे वेळीच निदान करणे अत्यंत आवश्यक आहे. कर्करोगपूर्व लक्षणे आणि कर्करोगाचे निदान प्राथमिक पातळीवरच झाल्यास मृत्यूचे प्रमाण कमी करता येणे शक्य आहे आणि रुग्णांच्या उपचारांवरील वाढता खर्चही वाचवणे शक्य आहे.

केवळ उपचारच नाही, तर कॅन्सरबद्दल समाजात असलेली भीती आणि चुकीचे समज दूर करणे हे या कार्यक्रमाचे महत्त्वाचे ध्येय आहे. याशिवाय, शाळा आणि कॉलेजमधील मुला-मुलींसाठी विशेष शैक्षणिक कार्यक्रम राबवले जातील. यामुळे नवीन पिढी आरोग्याबाबत अधिक जागरूक होईल आणि भविष्यात एक निरोगी समाज घडवण्यास मदत होईल.

हा कार्यक्रम सरकारी प्रयत्नांना बळकटी देण्यासाठी आखला आहे.

विशेषतः गरीब आणि गरजू लोकांसाठी हे वरदान ठरणार आहे. संगमनेर, अकोला, पारनेर आणि राहुरीमध्ये विविध माध्यमांतून ३ लाखांहून अधिक लोकांपर्यंत आरोग्य संदेश पोहोचवण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले आहे.

या मोहिमेत एकूण ४५ तपासणी शिबिरे आयोजित केली जातील, ज्यामध्ये ३,१५० लोकांची प्रत्यक्ष वैद्यकीय तपासणी केली जाईल आणि १ लाख लोकांमध्ये जागरूकता निर्माण केली जाईल. ही तपासणी एचपीव्ही, डीएनए सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाने केली जाणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेत एसएमबीटी रुग्णालयाचे मोठे सहकार्य लाभणार आहे.

श्रीमती उषा थोरात (नॅशनल मॅनेजिंग ट्रस्टी, इंडियन कॅन्सर सोसायटी) यांनी या उपक्रमाबद्दल बोलताना म्हटले की, "कॅन्सरविरुद्धच्या लढाईत अल्केम फाऊंडेशनसोबतची ही भागीदारी अत्यंत मोलाची आहे. कॅन्सरची लक्षणे, त्यामागील कारणे आणि प्रतिबंधात्मक उपायांची पुरेशी माहिती असणे, हीच या आजारावर मात करण्याच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे. लोकांकडे योग्य माहिती असेल, तरच ते स्वतःच्या आरोग्याबाबत अधिक जागरूक होतील. आपण सर्वांनी मिळून अशा भविष्यासाठी प्रयत्न करूया जिथे कॅन्सरचे निदान वेळीच होईल, प्रभावी उपचार मिळतील आणि रुग्ण या आजारातून पूर्णपणे सावरून सुदृढ आयुष्य जगू शकतील."

अल्केम फाऊंडेशनच्या प्रवक्त्यांनी सांगितले की, "आमचा हा कॅन्सर केअर कार्यक्रम तळागाळातील लोकांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आला आहे. अहिल्यानगरमध्ये इंडियन कॅन्सर सोसायटीसोबत काम करताना अशा दुर्गम भागांपर्यंत पोहोचण्याचे आमचे उद्दिष्ट आहे, जिथे लोकांना तपासणी आणि मार्गदर्शनाच्या सुविधा सहजपणे उपबल्ध होत नाहीत.

या उपक्रमाच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांना योग्य वेळी योग्य वैद्यकीय मदत मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न आहे."

# जय जय हनुमान..

**'अंजनीच्या सुता तुला रामाचे वरदान.. एकमुखाने बोला, बोला जय जय हनुमान..' आणि टाळ, मृदंग, भजन, कीर्तनाच्या गजरात दुमदुमलेली चैत्र पौर्णिमेची पहाट ही रामभक्त हनुमंताच्या जन्मसोहळ्याने रंगून जाणारी. पहाटेपासूनच श्री हनुमान जन्मसोहळ्याची चाललेली आरास ही अवघा परिसर भक्तिमय करणारी.**

**गुढीपाडवा,** रामजन्म सोहळयाइतकाच दिमाखदार ठरणारा हा सोहळा मानावा लागेल. चैत्र पौर्णिमेच्या दिवशी सूर्योदयावेळी श्री हनुमंताचा जन्मसोहळा ठिकठिकाणी थाटात साजरा केला जातो. भजन, कीर्तन आणि टाळ-मृदंगाच्या गजरात पहाटेपासूनच या सोहळयाला प्रारंभ केला जातो.

प्रत्येक गावाच्या सीमेवर हनुमंताचं मंदिर पाहावयास मिळतं. संकटमोचक म्हणून रामभक्त हनुमंताची पूजा केली जाते. हनुमान या शब्दातील 'ह' ब्रह्माचा, 'नु' अर्चनाचा, 'मा' लक्ष्मीचा, व 'न' पराक्रमाचा द्योतक मानला जातो.

राजदूत, नीतिज्ञ, विद्वान, गायक, बुद्धिमान म्हणूनही हनुमानाचा उल्लेख विष्णू पुराणात आला आहे. अंजनी सुत, पवन पुत्र हनुमंताला शिवावतार तसेच रुद्रावतारही म्हटले जाते. श्रीराम भक्त हनुमानाला बळ, बुद्धी, विद्या, शौर्य व निर्भयतेचे प्रतीक मानले जाते व संकटसमयी हनुमानाचे स्मरण केले जाते.

हनुमंताच्या पूजनासाठी विशेषतः रुईच्या पानांची माळा, तेल, शेंदूर अर्पण केला जातो. आज ठिकठिकाणी हनुमान मंदिरामध्ये साजरी होणारी हनुमान जयंती ही त्या त्या ठिकाणचे वैशिष्ट्य जपणारी आहे. प्रत्येक ठिकाणी हनुमंताच्या नामाचा होणारा गजर आणि भजन-कीर्तनामध्ये तल्लीन होणारी भक्त मंडळी पाहिली की आजही आपली श्रद्धा आणि संस्कृती येथे मोठया भक्तीभावाने जपली गेल्याचे दिसून येते.

आज प्रत्येक गावात, प्रत्येक शहरात हनुमान जयंती उत्सव मोठया उत्साहाने, जल्लोषात साजरा केला जातो. भाळी शेंदुराचा टिळा लावून टाळ-मृदंगाच्या गजरात 'पवनपुत्र हनुमान की जय'चा जयघोष करत हनुमंताची पालखी मिरवणूक गावागावातून, शहराशहरातून दिमाखात मंदिरापर्यंत आणली जाते. या निमित्ताने श्री हनुमंताच्या नामाचा दुमदुमणारा नाद, मंदिरामध्ये होणारी हनुमान चालिसा, मारुती स्तोत्राचे होणारे पठण, तर काही ठिकाणी श्रीराम, लक्ष्मण, सीता, मारुती यांच्या चलचित्रांची मिरवणूक, देखावे, आदीतून हनुमान जयंती सोहळा साजरा होताना दिसतो.



पालखीमध्ये मारुतीची मूर्ती, प्रतिमा बसवून, ढोल- ताशांच्या गजरात मिरवणूक काढली जाते. उत्सवाच्या पाच दिवस अगोदर हनुमान मंदिराभोवती पालखी प्रदक्षिणा घातली जाते. रामनवमीला जेवढा भाविकांचा प्रतिसाद मिळतो, तेवढाच प्रतिसाद हनुमान जयंती उत्सवाला ठिकठिकाणी मिळताना दिसतो.

प्रत्येक ठिकाणी मंदिरांमध्ये हनुमंताच्या विविधरूपी प्रतिमा पाहावयास मिळतात. काही मंदिरांमध्ये उभा मारुती, गदाधारी बसलेला मारुती, दक्षिणमुखी मारुती, तर काही ठिकाणी भिंतीमध्ये कोरलेली मारुतीची प्रतिमा, संपूर्ण शेंदरी रंगाची मारुतीची प्रतिमा, तर काही ठिकाणी काळया दगडामध्ये कोरलेल्या मारुतीच्या मूर्ती पाहावयास मिळतात. विशेषतः ही मंदिरे गावाच्या, शहराच्या वेशीवर आढळून येतात. तर बहुतांश ठिकाणी छत्रपती शिवरायांच्या किल्ल्यांमध्ये हनुमंताची मंदिरे पाहावयास मिळतात. खरं तर प्रत्येक ठिकाणी हनुमंताच्या मूर्ती आणि मंदिरे असलेली दिसून येतात आणि त्या ठिकाणच्या हनुमंताच्या मूर्तीची, मंदिराची एक वेगळी आख्यायिकाही असलेली दिसून येते. काही ठिकाणी मोठी मंदिरे तर काही ठिकाणी हनुमंताची छोटी मंदिरेही पाहावयास मिळतात. गावाची सीमा, समुद्राच्या किना-यालगत, खडकावर अशा स्वरूपातही मंदिरे आज अस्तित्वात आहेत.

तर काही मंदिरे ही उंच डोंगरावर असलेली दिसून येतात. या मंदिरामध्ये दर शनिवारी रुईच्या पानांची माळा, तेल, शेंदूर, काळे उडीद आदी अर्पण करून पूजा केली जाते आणि हनुमान जयंती सोहळयाला तर मंदिराची केली जाणारी आरास, तोरण-पताका, दिव्यांची रोषणाई, मंडप, स्थापन केली जाणारी मंडळं यातून एक आगळा उत्सव साजरा होताना दिसतो. आपल्या ठिकाणच्या उत्सवासाठी प्रत्येक भक्त मंडळींचा उत्साह पणाला लागताना दिसतो. यातूनच आयोजित केले जाणारे विविध कार्यक्रम हा देखील उत्सव आणि उत्साहाचाच भाग मानावा लागेल. रामजन्माच्या सोहळयानंतर आठ दिवसांनी चैत्र पौर्णिमेला उत्साहात होणारा हनुमान जयंतीचा सोहळा हा भक्तांना नतमस्तक करणाराच.

हनुमान जयंती सोहळयाच्या औचित्याने सुंठीचा 'सुंठवडा' हा प्रसाद म्हणून सर्व भक्तांना वाटला जातो. समुद्राच्या काठावर बांधलेली मंदिरे आणि या मंदिरात साजरे होणारे उत्सव, आणि दिव्यांच्या रोषणाईने तेजाळणारे पाण्यातील प्रतिबिंब पाहता या झगमगाटाने सारा परिसरच उत्साही आणि तेजोमय होऊन जाताना दिसतो.

## या पॉवर बँकेने लॅपटॉपही करता येईल फुल चार्ज, इतकी आहे किंमत

**पोर्ट्रॉनिक्स अँपबॉक्स २७के पावर बँक भारतात लाँच झाली आहे. ही ३९९९ रुपयांमध्ये खरेदी करता येईल. हिच्या माध्यमातून लॅपटॉप देखील चार्ज करता येईल, असा दावा करण्यात आला आहे.**



पोर्ट्रॉनिक्स नं फेब्रुवारीमध्ये भारतात के१ आणि के२ मेकॅनिकल कीबोर्ड लॉंच केले होते तर जानेवारीमध्ये बीम ४३० स्मार्ट एलईडी प्रोजेक्टर आणला होता. आता कंपनीनं पोर्ट्रॉनिक्स अँपबॉक्स २७के नावाची पावर बँक सादर केली आहे. हिची खासियत म्हणजे ही लॅपटॉप देखील चार्ज करू शकते. चला जाणून घेऊया या पावर बँकचे स्पेसिफिकेशन्स आणि किंमत

### पोर्ट्रॉनिक्स अँपबॉक्स २७के पावर बँकचे स्पेसिफिकेशन्स

ब्रँडची नवीन पावर बँक खूप कॉम्पॅक्ट डिजाइन करण्यात आली आहे. हिची जाडी २ इंच असून उंच ६ इंचांपेक्षा थोडी जास्त आहे. याचा अर्थ असा की ही खूप पोर्टेबल आहे आणि प्रवासात देखील तुम्ही तुमचे डिवाइस चार्ज करण्यासाठी ही सोबत बाळगू शकता. अँपबॉक्स २७के बनवण्यासाठी कंपनीनं हाय ग्रेड मटेरियलचा देखील वापर केला होता. यात २७०००० एमएएचची बॅटरी क्षमता आहे. तसेच कंपनीनं यात ६५वॉटचा आऊटपुट सपोर्ट दिला आहे. त्यामुळे ज्या डिवाइसमध्ये फास्ट चार्जिंग सपोर्ट आहे ते पटकन चार्ज होतील. ही पावर बँक दोन डिवाइस दोन यूएसबी टाइप ए पोर्टच्या मदतीनं १८ वॉट स्पिडनं चार्ज करू शकते. तर पावर बँकमधील टाइप सी पोर्ट ६५ वॉट आऊटपूट देत. दुसऱ्या शब्दांत सांगायचं झालं तर ही पावर बँक १२० मिनिटांत ६५डब्ल्यू टाइप-सी पीडी पोर्टच्या माध्यमातून ६५ वॉट फास्ट चार्जिंग सपोर्ट असलेला लॅपटॉप चार्ज करू शकते. पोर्ट्रॉनिक्स अँपबॉक्स २७के वर एक बटन देण्यात आलं आहे जे दाबल्यावर एलईडी डिस्प्लेच्या माध्यमातून बॅटरी कपॅसिटी दिसू लागते. सुरक्षेसाठी यात कंपनीनं आयसी प्रोटेक्शन दिलं आहे, त्यामुळे ओव्हर चार्जिंग, ओव्हर डिसचार्जीग, ओव्हर करंट आणि शॉर्ट सर्किट पासून देखील ही सुरक्षित राहते.

### पोर्ट्रॉनिक्स अँपबॉक्स २७के ची किंमत

पोर्ट्रॉनिक्स अँपबॉक्स २७के सध्या कंपनीच्या वेबसाइटवरून विकत घेता येईल. तसेच अॅमेझॉन, फ्लिपकार्ट सारख्या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर देखील विक्री केली जात आहे आणि ऑफलाइन व ऑनलाइन स्टोर्सवर देखील ही पावर बँक उपलब्ध आहे. पोर्ट्रॉनिक्स अँपबॉक्स २७के ची किंमत ३,९९९ रुपये ठेवण्यात आली आहे, ही लॉंच ऑफर मधील किंमत आहे. कंपनी पावर बँकवर १२ महिन्यांची वॉरंटी देखील देत आहे.

## नवीन फोनची चाहूल लागताच कमी झाली नथिंग फोन २ ची किंमत; अशी आहे ऑफर

**नथिंग आपला नवीन स्मार्टफोन फोन २ए लॉंच करणार आहे. फोन २ए च्या लॉंच पूर्वीच फ्लिपकार्टवर नथिंग फोन २ बराच स्वस्तात मिळत आहे.**

**नथिंग** फोन २ वर डिस्काउंट मिळत आहे, ही ऑफर नथिंग फोन २ए लवकरच लॉंच होणार असल्यामुळे मिळत असल्याची चर्चा आहे. नथिंग फोन २ए मध्ये दोन ५० मेगापिक्सलचा रियर कॅमेरा आणि ३२ मेगापिक्सलचा फ्रंट कॅमेरा असेल. फोन मिड बजेट सेगमेंटमध्ये येण्याची शक्यता आहे. परंतु फोन २ए च्या लॉंच पूर्वीच फ्लिपकार्टवर नथिंग फोन २ खूप स्वस्तात मिळत आहे. फ्लिपकार्ट फोन २ वर ८००० रुपयांच्या डिस्काउंटसह विकला जात आहे. चला जाणून घेऊया ऑफरः



### नथिंग फोन २ वर जबरदस्त सूट

नथिंग फोन २ चा १२जीबी रॅम व १२८जीबी स्टोरेज असलेला ४४,९९९ रुपयांमध्ये लॉंच केला गेला होता. परंतु फ्लिपकार्टवर हा फोन आता सेलमध्ये ३६,९९९ रुपयांमध्ये विकला जात आहे. म्हणजे तुम्हाला थेट ८,००० रुपयांची सूट दिली जात आहे. तसेच आयसीआयसीआय बँक डेबिट किंवा क्रेडिट कार्डचा वापर करून २,००० रुपयांची विशेष सूट मिळवता येईल. तर जुना स्मार्टफोन एक्सचेंज केल्यावर ३०,००० रुपयांपर्यंत सूट मिळवता येईल. परंतु डिस्काउंट तुमच्या जुन्या फोनच्या कंडीशनवर अवलंबुन असेल.

### नथिंग फोन २ स्पेसिफिकेशन्स

नथिंग फोन २ मध्ये ६.७ इंचाचा फुलएचडी+ एलटीपीओ ओएलईडी डिस्प्ले देण्यात आला आहे. जो १२० हर्ट्झ रिफ्रेश रेट आणि १६०० नीट्स पीक ब्राइटनेसला सपोर्ट करतो. ह्या फोनच्या मागे सॉफ्ट कर्व्ह असलेली ग्लास बॅक आहे तर ह्याची मिडफ्रेम पूर्णपणे रिसायकल अॅल्युमिनियमपासून बनवण्यात आली आहे.

ह्या फोनमध्ये स्नॅपड्रॅगन ८+ जेन १ चिपसेट देण्यात आला आहे. जोडीला १२जीबी पर्यंत रॅम आणि ५१२जीबी पर्यंतची स्टोरेज देण्यात आली आहे. हा फोन ४७००एमएएचच्या बॅटरीला सपोर्ट करतो, जी ४५ वॉट पीडी फास्ट चार्जिंग आणि १५ वॉट वायरलेस चार्जिंगला सपोर्ट करते. फोन अँड्रॉइड १३ आधारित नथिंग ओएस २.० वर चालतो.

हा फोन ड्युअल कॅमेरा सेटअपसह बाजारात आला आहे. ज्यात ५० मेगापिक्सलचा सोनी आयएमएक्स८९० सेन्सर देण्यात आला आहे आणि ५० मेगापिक्सलचा अल्ट्रा वाइड सॅमसंग जेएन१ सेन्सर देण्यात आला आहे जो मॅक्रो शॉट्स घेऊ शकतो. ह्या फोनमध्ये ३२ मेगापिक्सलचा फ्रंट कॅमेरा देखील आहे. फोनची खासियत असलेला ग्लीफ इंटरफेस आता अपडेट करण्यात आला आहे. त्यामुळे हा आता व्हॉल्युम इंडिकेटर, टायमर आणि फोन रिंग किंवा नोटिफिकेशन आल्यावर चमकण्याचे काम करतो. तुम्ही आता ह्याची ब्राइटनेस आणि इतर गोष्टी कस्टमाइज करू शकता.

## रुद्राक्ष परीक्षण

**सामान्यतः रुद्राक्ष पाण्यात ठेवल्यास तो पाण्याच्या तळाशी जातो, मात्र वजनाने हलका असलेला रुद्राक्ष पाण्यावर तरंगतो. (वस्तूचा तरंगण्याचा नियम अभ्यासता ही कसोटी सर्व रुद्राक्षांना लागू पडत नाही.)**

**दोन** तांब्याच्या पत्रामध्ये रुद्राक्ष ठेवल्यास तो उजवीकडे फिरल्यास खरे मानतात. (हा नियम देखील काही प्रमाणात फसगत करू शकतो.)

सूर्यास्तावेळी भरलेल्या दुधाच्या ग्लासामध्ये रुद्राक्ष ठेवून सूर्योदयानंतर त्या ग्लासातील दूध ४८ तासांनंतर खराब झाले नाही तर रुद्राक्ष चांगला समजतात. (सर्व ऋतूंमध्ये हा नियम लागू पडत नाही.)

निकषावर खरा रुद्राक्ष घासला असता त्याची सोन्याप्रमाणे तेजस्वी रेषा उमटते.

डाऊजिंग (लोलक चिकित्सा) या शास्त्रानिहाय एकाग्रतेने आत्मपरीक्षण केल्यास रुद्राक्षाचा खरेपणा आपणांस अनुभवास येतो.

शक्यतो रुद्राक्ष तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाने घेणे योग्य अन्यथा लाकडावर कोरलेले किंवा रुद्राक्षाचे मुख कोरून नाग, शिवलिंग, त्रिशुल, ॐ ही चिन्हे असलेले रुद्राक्ष फसगत करू शकतात. (अपवाद वगळता.)

**।।धारणा व नियम।।**

शरीरातील उष्णतेमुळे रुद्राक्षातील बाष्प कमी होते, म्हणून रुद्राक्ष माळ ही ७ ते १५ दिवसांनी



गाईचे तूप, शुद्ध चंदन तेल, गंगाजल इ. मध्ये सूर्यास्तानंतर ठेवून सकाळी सूर्योदयानंतर ती कोमट गरम पाण्याने स्वच्छ करून मऊ कपडयाने पुसावी. म्हणजे त्यातील तेजस्वी गुणधर्म वाढतात.

रुद्राक्ष माळ रात्री झोपण्याच्या वेळेस गळयात असू नये कारण कदाचित भयावह स्वप्ने पडू शकतात. (सवयीनंतर हा अनुभव येत नाही.) तसेच रात्री झोपेत माळेतील धातूच्या (सोने, चांदी, तांबे इ.) साखळीच्या गाठीवर सतत दाब पडून ती तुटण्याचा देखील संभव असतो. स्त्रियांनी मासिक धर्म प्रसंगी ५ दिवस पूर्ण होईपर्यंत माळ धारण करू नये. तसेच स्त्री-पुरुष एकांत समयी रुद्राक्ष धारण करू नये. स्मशानस्थळी जाऊन आल्यानंतर रुद्राक्ष माळेचे गोमूत्राने शुद्धीकरण करून नंतर ती धारण करावी.

रुद्राक्षाची माळ पवित्र व दैव गुणधमार्नी युक्त असल्याने राजधातूमध्ये (सोने) धारण करावे. परंतु तांबे, चांदी, पंचधातू इ. मध्ये किंवा लाल व पंचरंगी दो-यात धारण केल्यास लाभदायक ठरते.

किडयांनी भक्षिलेले, तुकडा उडालेले, मुख अस्पष्ट झालेले रुद्राक्ष धारण करू नये.

लहान बालकाच्या वयोमयार्देचा व समस्येचा योग्य विचार करून रुद्राक्ष वापरण्यास द्यावा. (९ महिन्यांच्या आतील बालकास शक्यतो देऊ नये.)

**।।वैज्ञानिकदृष्टया मूल्यमापन।।**

उत्तम दर्जाच्या रुद्राक्षात लाल रंगाच्या दो-यात गुंफून, त्याचे एक टोक आपल्या उजव्या हाताच्या तर्जनी व अंगठा यामध्ये पकडून पश्चिम दिशेला आपले तोंड करून उभे राहावे किंवा लाकडी खुर्चीवर बसावे.

**क्र. १ आकृती निहाय :** सात्त्विक वस्तूवर (उदा. श्रीयंत्र, गंधगोळी, इ.) धरलेला रुद्राक्ष त्या वस्तूभोवती सव्य प्रदक्षिणा (घडयाळाच्या काटयाच्या दिशेने) मागार्ने फिरू लागतो.

**क्र. २ आकृती निहाय :** मात्र याच्या उलट कांदा, लसूण अशा राजस किंवा तामस गुणी वस्तूवर रुद्राक्ष धरल्यास तो अपसव्य प्रदक्षिणा (घडयाळाच्या काटयाच्या विरुद्ध दिशेने) फिरू लागतो. वरील दोन्ही प्रयोगावरून खऱ्या रुद्राक्षामध्ये सात्त्विक, राजस, तामस असे मूल्यमापन करण्याची शक्ती असल्याचे सिद्ध होते.

## केमिकल पिलिंग केल्यानंतर कशी घ्याल चेहऱ्याची काळजी

**चेर्हयावरील** काळे डाळ कमी करण्यासाठी, चेहरा उजळावा याकरिता केमिकल पिल्स फायदेशीर ठरतात.केमिकल पिल्समुळे त्वचेवरील निस्तेज आणि मृत स्तर काढायला मदत होते. त्यामुळे त्वचा अधिक तजेलदार होते. चेर्हयावर लावले जाणारे केमिकल त्वचेतील टीश्यूंचे नुकसान टाळण्यास मदत करतात. केमिकल पिलमध्ये अॅसिड, फळांचा, बोटॅनिकल एक्स्ट्रॅक्ट किंवा दूधाचा समावेश असतो. त्वचेच्या पोतानुसार आणि समस्येनुसार कोणते पिल वापरावे याचा निर्णय डॉक्टर घेतात.


केवळ केमिकल पिल लावून तुम्हांला अपेक्षित निकाल मिळत नाहीत तर त्यानंतरही त्वचेची काळजी घेणं आवश्यक आहे. यासाठी प्रसिद्ध सेलिब्रिटी डरमॅटोलॉजिस्ट डॉ. जयश्री शरद यांनी दिलेला हा खास सल्ला नक्की जाणून घ्या.

- पिल लावल्यानंतर लगेजच आईस कॉम्प्रेसेस चेर्हयावर फिरवावे. किमान 10-15 मिनिटे आईस कॉम्प्रेस चेर्हयावर ठेवा.
- केमिकल पिलनंतर किमान 10 दिवस चेर्हयाला स्क्रब किंवा गरम पाणी लागणार नाही याची काळजी घ्या. या दिवसात चेर्हयाला स्क्रब आणि गरम पाणी वापरू नका.
- सौम्य, न्युट्रल pH फेशिअल क्लिंजरचा वापर करा. चेहरा स्वच्छ करण्यासाठी sebamed olive wash dla वा Cetaphil cleansing lotion चा वापर करावा.
- केमिकल पिल ट्रीटमेंट केल्यानंतर लगेजच तसेच सनस्क्रीन न लावता बाहेर पडू नका. उन्हात फिरत असल्यास किमान दोन - दोन तासांनी सतत सनस्क्रीन लावा.
- केमिकल पिल ट्रीटमेंटनंतर दोन दिवसांनी चेर्हयावर मॉईश्चरायझर लावायला सुरवात करा.
- केमिकल पिलनंतर काही तासातच त्वचेवरून एक पातळ स्तर निघायला सुरवात होते. तो स्तर काढण्यासाठी सतत चेर्हयाला हात लावू नका. किंवा त्वचा खेचू नका.
- पिलिंग होताना अँन्टी अॅक्ने क्रीमचा वापर करू नका. तसेच स्क्रीन लाईटींग क्रीम वापरणे टाळा.
- स्किन पिलिंग होताना ब्लिचिंग किंवा केस काढण्यासाठी थ्रेडींग, वॅक्सिंग करणे टाळा.





## चेहऱ्यावरील 'ग्लो'साठी घरगुती ब्युटी फेस पॅक



**ऊन्हामुळे** सावळी झालेली त्वचा पुन्हा उजळविण्यासाठी नारळ पाणी, कच्चं दूध, काकडीचं रस, लिंबाचं रस, बेसन आणि थोडीशी चंदन पावडर मिसळून उटने तयार करा. हे अंघोळीच्या एका तासाआधी लावा. आठवड्यातून दोनदा हे वापरा. याने त्वचा उजळ होईल.

जर चेर्हयावर कांजिण्या किंवा पिंपल्सचे डाग असतील तर दोन बदाम उगाळून त्यात दोन चमचे दूध आणि एक चमचा संत्र्याच्या सालांचे चूर्ण मिसळून हळुवार चेर्हयावर स्क्रब करा आणि नंतर धुऊन टाका.

मधात केसर मिसळून याला डोळ्याखालील डॉर्क सर्कल्सवर लावा. याव्यतिरिक्त डोळ्याखाली एरंडेल तेल लावण्यानेदेखील काळे डाग कमी होतात.

बटाट्याचा रस डोळ्याच्या आजूबाजूला लावल्याने डॉर्क सर्कल्स नाहीसे होतात.



## लिंबाचे औषधी फायदे माहीत आहे का?

**अजीर्णावर** लिंबू फार उपयुक्त आहे. ते आडवे कापून त्यावर सुंठ किंवा सैंधव (मीठ) घालून निखाऱ्यावर गरम करावे आणि वारंवार चोखावे. त्यामुळे करपट ढेकर, ओकारी, पोटफुगी वगैरे त्रास कमी होतो.

- लिंबाचे अनेक औषधी उपयोग आहेत. लिंबु उभे कापून त्यावर खडीसाखर घालून चोखल्यास ओकारी थांबते.
- पोटदुखी थांबण्यास आले व लिंबाचा रस साखर घालून सेवन करावा.
- पित्त झाले असल्यास रोज लिंबाचे सरबत घ्यावे. त्याने भूक वाढते. अन्न पचते व शौचास साफ होते. मेदवृद्धि म्हणजे लठ्ठपणा कमी करण्यासाठीही रोज लिंबाचा रस उन पाण्यात घालुन घेतल्याने उपयोत होतो.
- वाळलेले लिंबू मधात घालून चाटण म्हणून घेतल्यास उचकी तसेच ओकारी थांबण्यास मदत होते.
- अंगाला कंड सुटत असल्यास लिंबाचा रस खोबरेल तेलात मिसळून अंगास चोळावा व ऊन पाण्याने स्नान करावे. कंड कमी होतो.



## चमकदार दातांसाठी झोपण्याच्या वेळेस करा ही कामे



- नारळाचे तेल ऑरगॅनिक आणि नॅच्युरल टीथ व्हाईटनर आहे. नारळाच्या तेलाने तुम्ही तुमचे दात चमकवू शकता. यासाठी थोडेसे नारळाचे तेल घेऊन 15 मिनिटे तोंडात ठेवा. त्यानंतर साध्या पाण्याने चूळ भरा. यामुळे फायदा होईल.
- दात चमकवण्यासाठी सोपा उपाय म्हणजे स्ट्रॉबेरीज. स्ट्रॉबेरीच्या गरात चिमूटभर बेकिंग सोडा मिसळा. हे मिश्रण ब्रशवर घेऊन दात घासा. यामुळे दातांवरील पिवळेपणा दूर होईल.
- अॅपल सिडार व्हिनेगरही दात चमकावण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. याचे काही थेंब दातांवर चोळा. अधिक फायद्यासाठी सकाळी ब्रश करण्याआधी या व्हिनेगरने दात चोळा.

## सरबतं बनवताना लक्ष देण्यासारख्या काही गोष्टी...

- ज्याचे सरबत बनवायचे त्याचा रस किंवा काढा १ वाटी, पाणी १ वाटी, साखर २ वाटी घ्यावी.
- पाणी व साखर एकत्र करून उकळावं.
- उकळी येऊन फेस शांत झाला व मिश्रण स्वच्छ दिसू लागलं की गॅस बंद करावा.
- त्यात आधी तयार करून ठेवलेला रस / काढा मिसळावा आणि ढवळावा.
- नंतर हे मिश्रण गाळून स्वच्छ, कोरड्या बरणीत भरून ठेवावं. यालाच सरबताचं 'कॉन्सन्ट्रेट' म्हणतात.

### चंदनवाळा सरबत

**घटक** - चंदन पूड १० ग्रॅम, वाळा पावडर १० ग्रॅम, पाणी १०० मिली. साखर २०० ग्रॅम.

**कृती** - पाणी उकळल्यावर गॅस बंद करावा. उकळलेल्या पाण्यात चंदन व वाळा पावडर टाकून ते झाकून ठेवावं. दोन तासानं मिश्रण चांगलं ढवळून घ्यावं. नंतर ते गाळून घेऊन मोजावं. १ वाटीच्या मिश्रणास दोन वाटी साखर आणि एक वाटी पाणी घ्यावं. पाणी व साखर एकत्र उकळून घ्यावं. उकळी येऊन फेस शांत झाला आणि मिश्रण स्वच्छ दिसू लागलं की गॅस बंद करावा. त्यात चंदन वाळ्याचं तयार केलेलं मिश्रण टाकून ते चांगलं ढवळावं. सरबताचं हे सिरप गाळून कोरड्या बरणीत भरून ठेवावं.

**उपयोग**- दाहशामक, डोळ्यांची आग, लघवीची आग कमी करतं. सतत तहान लागणं, ज्वर यासारख्या उन्हाळ्यातील तक्रारीत उपयुक्त.



## आला उन्हाळा, हे विसरला तर नाही

- **उन्हाळा** आल्यावर अनेकदा शरीराला नवीन तापमानाशी जुळवून घेण्यात वेळ लागतो. अशात काही लहान आणि सामान्य गोष्टी असतात ज्यांचा आम्हाला विसर पडत असतो तर त्यांना रिकॉल करायला कुठलीच हरकत नसावी.
- आता गरज आहे घरातून बाहेर निघताना सन स्क्रीन लोशन लावण्याची आणि स्कीन झाकून निघण्याची. सोबत पाण्याची बॉटल किंवा ग्लूकोज असणे उत्तम. कॉटनचे हलक्या रंगाचे कपडे परिधान करणे योग्य ठरेल.
- आहार बदल सर्वात महत्त्वाचे पाऊल आहे. म्हणून आता मसालेदार, स्पाईसी, तळकट खाणे टाळा. लिक्विड डाइट अधिक घ्या. घरातून बाहेर पडण्यापूर्वी लिंबू पाणी, ताक, किंवा फ्रूट ज्यूसचे सेवन करणे विसरू नका.
- उन्हाळ्यातील फळं कलिंगड, काकडी, खरबूज, द्राक्ष, संत्री, स्ट्रॉबेरी, नारळ पाणी, आंबा आपल्या आहारात सामील करा.
- उन्हाळ्यात रॉक साल्ट, जिरं, बडीशेफ आणि वेलची सारखे मसाले वापरून दही, कैरीचं पना, पुदिना, थंडाई, सातू हे सेवन करणे शरीरासाठी अनुकूल ठरेल.
- अती तापमान असल्यास शक्योतर 11 ते 4 या दरम्यान घरातून किंवा ऑफिसातून बाहेर पडणे टाळावे.



## स्वस्थ झोपा, मस्त राहा

**झोपण्यामुळे** केवळ दिवसभराचा थकवा दूर होत नाही तर मन आणि मेंदूही शांत राहतो. झोप पूर्ण न झाल्याने हृदयाचे आजार, स्ट्रोक, ब्लड प्रेशर, मधुमेह, वजन वाढणे यांसारखे आजार होऊ शकतात. वाढलेले वजन कमी करण्यासाठी व्यायाम आणि डाएटसह पुरेशी झोपही तितकीच महत्त्वाची आहे.

बदलती जीवनशैली आणि दररोजच्या स्पर्धेच्या जगात धावत असताना कमी झोप घेणे माणसाला रोगी बनवत आहे. सतत कॉम्प्युटर आणि मोबाईलचा वापर युवकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम करत आहे. अनेकजण झोप न येण्याच्या आजाराने त्रस्त आहेत. 16 ते 30 वर्षापर्यंतचे तरूण या आजाराने सर्वाधिक त्रस्त आहेत. अनेक तरूण व्हिडिओ गेम, सतत मोबाईलच्या वापराने झोप पूर्ण करू शकत नाही. त्यामुळे अनेक आजारांना आमंत्रण दिले जात आहे. झोप पूर्ण न झाल्यास शारीरिक आजारासह मानसिक आजारही बळावत आहेत.

कमी झोप घेतल्याने शरीरातील घ्रेलिन आणि लेप्टिन हार्मोन्सवर परिणाम होतो. शरीरातील घ्रेलिन हार्मोन्समुळे अधिक भूक लागते. हे हार्मोन मेटाबॉलिज्मला कमजोर करते आणि शरीरात अधिक फॅट जमा करतात. लेप्टिन हार्मोनही वजन वाढवण्याचे काम करतात. झोप पूर्ण न झाल्याने शरीरात लेप्टिन हार्मोनचा स्तर कमी होतो तर घ्रेलिन हार्मोनचा स्तर वाढतो. त्यामुळे अधिक भूक लागते. परिणामी जास्त खाण्यामुळे वजन वाढते.

पुरेशी आणि योग्य झोप व्यक्तीची निर्णयक्षमता, स्मरणशक्ती आणि सर्जनशीलता वाढवते. झोप पूर्ण झाल्याने मेंदू सुरळित काम करतो. थकवा दूर होतो. रोगप्रतिकारशक्ती वाढते. अनेक आजारांपासून बचाव होतो.

- आरोग्यदायी आणि उत्तम स्वास्थासाठी 7 ते 8 तास झोप घ्या.
- रिकाम्या पोटी झोपू नका.
- झोपण्याच्या आणि खाण्याच्या वेळेत 1 ते 2 तासांचे अंतर ठेवा.
- झोपण्याआधी कोणतेही व्यसन करू नका.
- झोपण्याचे ठिकाण आरामदायी आणि शांतता असावी.

